

# शब्द रुची

सप्टेंबर २०१८
मूल्य १० रुपये
पृष्ठे ५२












फ्रान्सिस डिमेलो लिखित
'लाखो इथले गुरू' पुस्तकप्रकाशनसमयी
आमदार अजय चौधरी, मो.स. गोसावी,
किरण शांताराम, सुहास पेडणेकर (कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ), शिवसेना पक्षाध्यक्ष उद्धव
ठाकरे, संजय राऊत (सामना, कार्यकारी
संपादक व खासदार), अरविंद सावंत
(खासदार), लेखक फ्रान्सिस डिमेलो,
सुदेश हिंगलासपूरकर
आणि
पत्रकार प्रतिमा जोशी



वर्षा पवार लिखित 'स्मृतिगंध'
पुस्तकप्रकाशनसमयी
चांगदेव काळे,
वर्षा सिनकर,
लेखिका वर्षा पवार,
मधुरा प्रभू,
धनश्री धारप,
सुदेश हिंगलासपूरकर
आणि
नंदिनी पाटील



'झी मराठी उत्सव नात्याचा दिवाळी अंक पुरस्कार' देताना
लक्ष्मीकांत देशमुख (साहित्यसंमेलनाध्यक्ष)
दिनेश गुणे (पत्रकार)
रवींद्र मालसुरे (कार्याध्यक्ष, मराठी वृत्तपत्र संघ)
आणि
पुरस्कार स्वीकारताना
सुदेश हिंगलासपूरकर



गायिका वैशाली माडे यांची
'ग्रंथाली' ऑफिसला सदिच्छा भेट.
सोबत ग्रंथाली परिवार

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

४३ ग्रंथाली

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**सप्टेंबर २०१८, वर्ष सहावे**
**अंक पाचवा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**निमित्त : बलुतंची चाळिशी**
- एक दु:खानं गदगदलेलं झाडं / ६
  **पु. ल. देशपांडे**
- बलुतं आणि मी / १०
  **डॉ. मनोहर जाधव**
- आठवणींची ऊबदार गोधडी / १३
  **सुदेश हिंगलासपूरकर**

**स्मरणस्वर**
- आदमी अच्छा था... / १४
  **वैजयंती आपटे**
- चित्रकार-कवी षांताराम पवारांच्या दृश्यकलेतून तयार झालेली माझी दृक्साक्षरता! / १८
  **रंजन जोशी**

**व्यक्तिचित्र**
- हायकूऽऽऽ तू आलास? की हा भास? / २२
  **प्रतिभा सराफ**
- कर्मवीरांचे शैक्षणिक योगदान / २६
  **द.ता. भोसले**

**मी आणि माझी कविता**
सतीश सोळांकुरकर / २९

**पत्र**
संदेश ढगे / ३१

**प्रतिभेचे चांदणे**
- नायपॉल / ३२
  **धनंजय गांगल**

- ट्रंप व प्रसारमाध्यमं : एक खडाजंगी / ३६
  **डॉ. अनंत लाभसेटवार**
- **रंग 'झी' मालिकाविश्वाचे** / ४१
- **पुस्तकप्रकाशन वृत्तांत** / ४४
- **मेहता पब्लिशिंग हाऊस ग्रंथपान** / ४६
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ३७

## संपादकीय...

हळूहळू तिला आपल्या शरीरात बदल होताहेत हे जाणवू लागले. बाईंनी एकदा सर्व मुलींना हॉलमध्ये गोळा व्हायला सांगितले आणि कुणी डॉक्टर्स आले होते. पाळी येणे म्हणजे काय हे त्यांनी सांगितले. तिला हे नवंच होतं. म्हणजे ती मोठी होणार होती तर... लहानपणापासून तिचा वर्ग एकच, म्हणजे वर्गातली मुलं-मुली तीच पण मोठं व्हायला लागल्यावर तिला जाणवू लागलं की त्यांच्यात ग्रुप्स निर्माण होऊ लागलेत. ती कधी या गटात तर कधी त्या गटात ...पण कुठल्याच गटात ती सामावली जाईना. ती एकटी पडू लागली किंवा तिला एकटं पाडलं जाऊ लागले. हे एकटं पाडणं अतिशय क्रूर असतं. या एकाकीपणाच्या अंधारात अनेक वाढत्या वयातली मुलं आज अडकत चालली आहेत. आपल्याला कुणी सामावून घेत नाहीय हे जाणवायला लागलं की मग त्याविरुद्ध करायचं काय हे कळेनासे होते. आपण बोलायला लागलो की आपल्याकडे कुणी लक्ष देत नाहीयत. ऐकलं न ऐकल्यासारखं करतायत वा एखाद्या चर्चेत आपल्याला घेतलंच जात नाहीय, हे ठळकपणे जाणवू लागलं की ती व्यक्ती गप्प होते. काही वेळा कठोरपणे तिला गप्प केलं जातं. हे केवळ मुलींच्याच बाबत होतं असं नाही. मुलांनाही त्यांच्या 'पिअर ग्रुप्स'मध्ये या एकटेपणाचा अनुभव येतो. यातून वाट्याला आलेल्या मौनाचा फार मोठा परिणाम त्या व्यक्तीच्या अभिव्यक्तीवर आणि भाषेवर होत असणार. कारण एकटी पडत असलेली व्यक्ती हळूहळू मिटत जाते. माणसांशी संवाद करण्याची आंतरिक ताकद गमावून बसते. आजच्या काळात 'संवादकौशल्य' हा शब्द वारंवार वापरला जातो. त्याचे क्लासेस-कोर्सेस यांचेही आज मार्केट वाढते आहे. नव्या नोकऱ्या वगैरेंकरता कौशल्यपूर्ण संवाद गरजेचा आहेही पण मला नेहमी वाटतं की माणसा-माणसांमधला संवाद नैसर्गिकपणे व्हायला हवा. अशाप्रकारच्या संवादातूनच स्वत:बद्दलचा नि आसपासच्या समूहाबद्दलचा विश्वास वाढीस लागतो. या उत्स्फूर्त संवादाचे खच्चीकरण उमलत्या वयात होत जाण्याचे प्रमाण आज वाढते आहे. यातून येणारी निराशा-वैफल्य केवळ आपल्यापुरते राहात नाही. ते आपल्यापलीकडे झिरपत जाते. गुरुनाथ धुरींच्या कवितेतल्या ओळींत सांगायचं तर

मी पुरून टाकली माझी निराशा
मनातच खूप खोल खड्डा खणून.
वाटलं... निराशा सडेल, झडेल, नष्ट होईल.
पण निराशा सडली नाही
वाढली, तिला पानफुलं आली काळीकुट्ट!

निराशेचे धारदार टोक सौम्य करण्याचे मार्ग अनेक पण 'पुस्तकांचे जग' हा त्यापैकी एक प्रभावी मार्ग मात्र तो नव्या पिढीला किती आपलासा वाटतो हा प्रश्नच आहे. 'कट-पेस्ट' करणे ज्ञानप्राप्तीची दिशा आहे असे मानणारी ही पिढी पुस्तकांपासून दुरावते आहे का? त्यातून गवसणारा विवेक-तारतम्य आणि विचारांचा खुलेपणा या गोष्टींना ती मुकते आहे काय? यातून उद्भवणारे दुष्परिणाम आता चांगलेच दिसू लागले आहेत. भारतीय प्रज्ञाशोध परीक्षेतलं आपल्या विद्यार्थ्यांचं अपयश ही नुकतीच समोर आलेली बातमी काय सांगतंय? महाराष्ट्रातील प्रज्ञावंतांची संख्या खरोखरच कमी होते आहे काय? या मागच्या कारणांचा शोध गंभीरपणे घ्यायला पाहिजे. एका बाजूला स्वत:ची भाषा नाकारणे आणि दुसऱ्या बाजूला ज्ञानाची कास धरण्याची अवघड वाट सोडून सोप्या-रेडिमेड मार्गांचा अवलंब करणे. यातून महाराष्ट्राच्या पुढच्या पिढीला काय सोसावे लागणार आहे याचा विचार केला करणार आहोत आपण?

नवी-नवी माध्यमे आली तरी पुस्तकांची जागा सर्वस्वी हिरावून घेणं कठीण आहे नि त्यातही काही पुस्तके तर मानदंड बनून राहतात. काळाच्या कसोटीवरही ती आपल्या अस्सलपणाने टिकून राहतात; असेच पद्मश्री दया पवार यांचे 'बलुतं' हे आत्मकथन 'ग्रंथाली'ने २४ डिसेंबर १९७८ रोजी प्रकाशित केले. त्याला यंदा चाळीस वर्षे होत आहेत. 'ग्रंथाली'ने आजवर बलुतंच्या अनेक आवृत्त्या प्रकाशित केल्या. या अर्थाने या पुस्तकाने भरभरून दिलं हे तर खरंच! वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून बलुतंकडे पाहिलं गेलं. कौतुक आणि टीका दोघांचाही 'बलुतं'वर वर्षाव

झाला. वाचकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांचा प्रचंड कोलाजच नंतर 'बलुतं : एक वादळ'मधून समोर आला. सामाजिक, सांस्कृतिक वास्तवाचे अनेक पापुद्रे 'बलुतं'विषयीच्या चर्चेतून उकलले गेले.

या महिन्यातच १५ सप्टेंबर रोजी दया पवार यांचा जन्मदिवस असतो! त्यांचा (दादांचा) लोभस स्नेह माझ्याही वाट्याला आला. 'बलुतं'च्या चाळिशी निमित्ताने त्यांना विनम्र अभिवादन! 'बलुतं'च्या पहिल्या आवृत्ती १९७८ साली प्रकाशित 'बलुतं'ची मुखपृष्ठे चित्रकार षांताराम पवार यांनी केली आहेत. गेल्याच महिन्यात त्यांचे दु:खद निधन झाले. 'ग्रंथाली'शी त्यांचे बंध कायम दृढ राहिले.

दिव्यांग व्यक्तींनीही क्रिकेटचा आनंद घ्यावा याकरता क्रिकेटपटू अजित वाडेकर यांनी कष्ट घेतले. अपंगत्वावर मात करून क्रिकेटच्या मैदानावर पाऊलखुणा उमटवणाऱ्या खेळाडूंच्या कौतुक सोहळ्यात वाडेकरांची ही बाजू जवळून पाहता आली. हे उमदे व्यक्तिमत्त्व नेहमी स्मरणात राहील.

हार में क्या जीत में  
किंचित नहीं भयभीत मैं  
कर्तव्यपथपर जो भी मिला  
यह भी सही वो भी सही  
वरदान नहीं मागूँगा...

हा 'अटल' स्वर व्यक्त करणाऱ्या कविमनाच्या अटलजींनाही 'शब्द रुची'ची विनम्र भावांजली.

**– डॉ. वीणा सानेकर**  
सी–१२, सुयोग सोसायटी,  
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई–४०० ०८१  
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६  
veenasanekar2018@gmail.com

**पुढला अंकहा दिवाळी अंक आहे, त्यामुळे तो ऑक्टोबर-नोव्हेंबर' असा जोडअंक असेल याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


**ग्रंथाली**

**'ग्रंथाली' व 'चेतना महाविद्यालय'**  
**यांच्या संयुक्त विद्यमाने**

**'पहिला स्मृतीदिन'**

**अरुण साधू यांच्यावरील चित्रफीत**  
**आठवणी – पत्रकार/मित्र/आप्तेष्ट**  
**पुस्तक प्रकाशन –**

**– स्थळ –**  
**चेतना महाविद्यालय, गर्व्हमेंट कॉलनी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१.**

**दिनांक : २५ सप्टेंबर २०१८**  
**वेळ : सायंकाळी ६ वाजता**

**अवश्य यावे,**

**आपले**  
सुदेश हिंगलासपूरकर (विश्वस्त), धनश्री धारप (उपक्रम संयोजक)

उत्तुंग परिवार आणि 'ग्रंथाली' सहयोग सादर करीत आहे  
**विख्यात कविवर्य सदानंद डबीर** लिखित

**'अलूफ'**

**या गझल काव्यसंग्रहाचे प्रकाशन आणि सुश्राव्य गझलगायन**

शुभहस्ते : **दिनकर गांगल, डॉ. राम पंडित, प्रा. सुखमणी रॉय**

**गायक : मिलिंद जोशी/मनिषा जोशी, माधव भागवत, सुचित्रा भागवत आणि सहकारी**

**– स्थळ –**  
**लोकमान्य सेवा संघाचे गोखले सभागृह, विलेपार्ले (पूर्व), मुंबई – ४०००५७**

**दिनांक : २९ सप्टेंबर २०१८**  
**वेळ : सायंकाळी ४.३० वाजता**


निमंत्रक : **आशा खाडिलकर, माधव खाडिलकर, सतीश सातपुते, ओंकार खाडिलकर, वेदश्री खाडिलकर–ओक, उत्तुंग विश्वस्त मंडळ**

सुदेश हिंगलासपूरकर (विश्वस्त), धनश्री धारप (उपक्रम संयोजक)

# एक दुःखानं गदगदलेलं झाड!

## पु. ल. देशपांडे

**येत्या नोव्हेंबरपासून पु. ल. देशपांडे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होते आहे. लेखनातला अस्सलपणा जेव्हा जेव्हा भिडला तेव्हा पुलंनी मन:पूर्वक दाद दिली. त्यांचा दया पवारांच्या 'बलुतं'वरील लेख प्रचंड गाजला होता, तो लेख 'शब्द रुची'च्या वाचकांसाठी आम्ही पुनर्मुद्रित करीत आहोत.**



**म**नुष्यसमाज, निसर्ग आणि नियती यांनी निर्माण केलेल्या नाना प्रकारच्या दु:खांनी गदगदलेल्या दगडू मारुती पवार नावाच्या माणसाची 'बलुतं' ही एक आत्मकथा आहे. महार जातीच्या आई-वडिलांपोटी त्यांचा जन्म झाला हा त्याचा मुख्य अपराध. ह्या देशातल्या माणसांवर जातीचा अदृश्य शिक्का जन्मकाळीच उठवलेला असतो. हिंदू धर्मात तर तो शिक्का पुसून दुसऱ्या जातीचा शिक्का उठवून घेण्याची हिंदूंच्या तेहतीस कोटी दैवांपैकी एकाही देवाचीसुद्धा प्राज्ञा नाही. ब्राह्मणाला कायस्थ होता येत नाही आणि साळ्याला माळी होता येत नाही हे तर जाऊच द्या, पण बालपणीच 'बाबा ब्लॅकशीप'ची संथा मिळालेल्या ब्राह्मणाच्या पोराने चारही वेदांतला एकही पाहिलासुद्धा नसला तरी जन्मकाळीच त्याच्यावर ऋग्वेदी ब्राह्मण, यजुर्वेदी ब्राह्मण यांसारखी मुद्रा चिकटली की तीदेखील मरेपर्यंतच काय, पण मरणोत्तरही कायम. ती पुसायचा एकमेव मार्ग म्हणजे त्याने हिंदू धर्म सोडून ख्रिस्ती किंवा मुसलमान व्हायचे. एकपत्नी व्रताच्या हिंदूंच्यावरील कायदेशीर सक्तीमुळे देवा-ब्राह्मणांच्या साक्षीने स्वीकारलेली पहिली बायको जिवंत असताना दुसरी करण्यासाठी काही मर्द शंकररावांचे शहाबुद्दिन वगैरे होतात तसे हिंदूंच्या जातीच्या कप्प्याचा 'व्हॉल्व' बाहेरच्या बाजूने उघडत नाही. जन्मकाळीच त्याला पेटीत टाकले जाते. त्याच क्षणी ते बालक सवर्ण की अवर्ण हे ठरते. हिंदू समाजात सवर्णपणाचा डाग निदान त्या बालकाचे पुढले जीवन संपूर्णपणे विद्रान करीत नाही. पण अस्पृश्य जातीच्या आई-बापांपोटी जन्माला यायचा अपघात घडला की सारे संपलेच. ते जीवन किडामुंगीसारखे कसे जगावे लागते आणि ते जगावे लागणाऱ्या जिवाला जर शिक्षण, बुद्धिमत्ता आणि संवेदनाशील मन लाभलेले असेल तर त्याचा रोजचा श्वाससुद्धा प्राणघातक विषारी वायूच्या श्वासासारखा असह्य कसा होतो याची चित्रे दया पवार यांनी लिहिलेल्या 'बलुतं' ह्या आत्मकथेच्या पानापानांवर आढळतील.

'दगडू मारुती पवार' ह्याच्या वाट्याला आलेले हे दु:खाचे बलुते भारतीय समाजव्यवस्थेने त्याच्या जन्मकाळीच त्याच्या पदरात बांधले. दया पवार नावाच्या-आज लोकांपुढे कवी, साहित्यिक, विचारवंत म्हणून प्रसिद्धीस आलेल्या माणसातच हा दगडू मारुती पवार वसलेला आहे. एकाच देहात नांदणारी ही जुळी व्यक्तिमत्त्वे आहेत. सुखाच्या क्षणीही दयाला सुखासीन होऊ न देता, सतत टोकरीत राहणारा हा दगडू. तो ह्या आत्मकथेचा लिहविता धनी. दयाला अस्वस्थ करणारा आतला नुसता आवाज नव्हे तर आतला आक्रोश. सत्य सांगून भार हलका करू इच्छिणारा. (तो भार हलका होत नाही ही आणखी एक शोकांतिका.) दया पवार त्या दगडूची लेखणी झाला. आणि अतिशयोक्ती न करता बोलायचे म्हणजे त्यातून एका असामान्य आत्मकथेचा जन्म झाला.

ह्या पुस्तकाला अनेक ठिकाणी फाटलेल्या आणि ठिगळा-ठिगळांनी जोडलेल्या गोधडीचे वेष्टनचित्र आहे. अन्न, वस्त्र, निवारा या बाबतीतच नव्हे तर क्षणोक्षणी भावनांच्यासुद्धा चिंध्याचिंध्या होत जाणारे आयुष्यच जिथे ठिगळाठिगळांनी जोडत जावे लागते अशा जीवनाची ही सत्यकथा आहे. असली ही जीवनपोथी उत्तम भोजनोत्तर किंवा उत्तम भोजनाची खात्री असल्यामुळे श्रवणसौख्यात भर घालणाऱ्या देव-देवतांच्या लीलामृतांच्या धार्मिक पोथ्यांना असतात तसल्या रेशमी सोवळ्यात कशी बांधली जाणार? तिला गोधडी-बांधणीतच गुंडाळणे शक्य आहे. वेष्टनावरची ती गोधडीच पहिला धक्का देऊन जाते. स्वत:ला स्पृश्य किंवा सवर्ण समजणारा समाज अस्पृश्यतेचा शिक्का उठवलेल्या सोन्यासारख्या मानवी जीवनाच्या किती प्रकारांनी चिंध्या करत असतो याचे ह्या वेष्टनापासूनच सूचक दर्शन घडायला लागते, पण हे दर्शन घडवणारा दगडू कुठेही स्वत:बद्दल अनुकंपा निर्माण करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत नाही. हे ह्या कहाणीचे सर्वांत मोठे यश आहे, हे

सुरुवातीलाच नमूद करून ठेवायला हवे. दगडू पवार शिष्ट समाजाच्या करुणेची भीक मागायला उभा राहिलेला नाही. उलट, ही कथा वाचून संपल्यावर आपण देश, धर्म, संस्कृती, समाज, सुधारणा, प्रबोधन वगैरे शब्द किती क्षुद्र मर्यादेच्या रिंगणात वापरत असतो याचाच पुन्हा एकदा अधिक तीव्रतेने प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही आणि आपले जगणे आपल्यालाच ओशाळवाणे वाटायला लागते.

दगडू कधी खेड्यात तर कधी मुंबईत असा लहानाचा मोठा होत गेला. खेड्यातला तो महारवाडा आणि मुंबईतला दगडू जगत होता तो विभाग स्वत:ला सुसंस्कृत, सुशिक्षित, सुप्रतिष्ठित, सभ्य वगैरे समजणाऱ्यांना त्याच्या अस्तित्वाची दखल घेण्याच्याही लायकीचा वाटत नाही. पूर्वी दादर टी.टी. ते काळा घोडा असा सहा नंबरच्या ट्रामचा रस्ता होता. एकदा त्या ट्रामने गिरणगाव ओलांडले की चर्नीरोड नाका येईपर्यंत वाटेत लागणारे फोरासरोड, नागपाडा वगैरे भाग, देवळाच्या दारातल्या महारोग्यांची पंगत ज्या कातडे ओढलेल्या डोळ्यांनी ओलांडायची असते, अशा रीतीने ट्राममधल्या सभ्य पाशिंजरांनी त्या बाजूला न पाहता आणि त्या दैन्य-दारिद्र्याचा मनावर संस्कार करून न घेता ओलांडायची असे. तिथली माणसे ही माणसेच नव्हेत असे मानणे म्हणजे सुसंस्कृतपणा ही शिकवण असे. एकदा चर्नीरोडची पारशी अग्यारी लागली की मग भारतीय संस्कृती सुरू. हा मधला पट्टा जिवंत माणसांचा उकिरडा असल्यासारखा आपले सारे अभागीपण दाखवत असायचा. त्या वस्तीतल्या 'कावाखान्या'पाशी दगडू वाढला. आजूबाजूचा चोरबाजार, कामाठीपुरा, गोलपिठा ह्या विभागांतच 'छोटी छोटी बेटं' करून महार मंडळी राहत. (त्यांतच देशस्थ महारांचे निराळे, कोकणस्थ महारांचे निराळे.) दगडूच्या 'आयुष्याची कितीतरी उमेदीची वर्षे ह्या खचरात गेली.' पण त्या खाचरातही दगडूचे वडील राजाच्या ऐटीने राहायचे. दगडूच्या स्वाभिमानी आजीने आपल्या दोन लेकरांसकट गावातल्या हलकट संभावितांच्या जाचापासून मुक्ती मिळवण्यासाठी 'ममई' गाठली होती. मुले वाढवून मोठी करून उद्योगाला लावली होती. दगडूचे वडील मुंबईच्या गोदीत चाकरी करत होते. 'पांढरंशुभ्र मसराईचं उंची धोतर, वुलन कोट, गंधर्व छाप काळी टोपी, दातावर सोन्याची मेख' असा त्यांचा थाट होता. त्यांना गाण्याचे अंग होते. कुटुंबात वाद्ये वाजवणारे काका, मामा होते. (त्यांत वाजंत्र्याच्या ताफ्यात तरबेजपणानं कांडे वाजवणारा सखामामा होता. सवर्णांच्या लग्नात त्यांना उष्ट्या पत्रावळीवर जेवायला लावणाऱ्या उद्दाम तालेवारांना त्या कांड्यातून तो शिव्याही वाजवत होता. वरपांगी 'धिक्कट धिम् तिक्कड तिम्' ऐकू आले तरी सखामामा आणि त्याचा हा असल्या अपमानास्पद वागणुकीने डिवचला गेलेला भाचा त्यांना त्या धिक्कड् दिममध्ये दडलेल्या शिव्या ऐकू येत होत्या.) पुढे दगडूचे रसिक वडील दारूच्या नादाला लागले. बाटलीबरोबर बाई आली. गोदीतून तांबे-पितळ चोरून आणू लागले. दगडूला चोरीचा माल विकायचे शिक्षण मिळू लागले. त्याच काळात दगडू शाळेत 'बरे सत्य बोला' शिकत होता. 'वास्तवाच्या जगापेक्षा शाळेचे जग खूपच नकली वाटायचे. जसे तसबिरीत नयनमनोहर चित्र टांगावं तसं.'

हे आत्मकथन वाचताना घडणाऱ्या त्या वास्तवाच्या दर्शनाने दगडूसारख्यांना आपण 'तसबिरी'तली माणसे का वाटत असतो याची जाणीव पांढरपेशांना झाल्याशिवाय राहणार नाही. हा केवळ आर्थिक दारिद्र्याचा प्रश्न नाही. नुसत्या दारिद्र्यामुळे सोसाव्या लागणाऱ्या ओढाताणीचा अनुभव मध्यमवर्गीयांनाही असतो. पण भयानक दारिद्र्याच्या जोडीला हिंदू समाजव्यवस्थेने अस्पृश्यांवर जन्मकाळापासून ते प्रेतदहन किंवा दफनापर्यंत जनावरांपेक्षाही भयंकर असे हे हीनत्व लादलेले आहे आणि त्यामुळे क्षणोक्षणी ज्या भयाखाली त्यांना थरथरत्या अवस्थेत जगावे लागते त्याचा हा आत्मकथेतून येणारा प्रत्यय वाचकाला हादरून टाकणारा आहे. आणि ह्या कथेचे मोठेपण असे की वाचकाने असे हादरावे म्हणून जाणूनबुजून कसलाही प्रयत्न इथे केलेला नाही. चमकदार भाषाशैली वापरून परिणाम साधायचा इथे यत्किंचितही अट्टाहास नाही. मराठी भाषेचे एक अत्यंत सुबोध, सरळ रूप पाहण्यासाठीसुद्धा 'बलुतं' वाचावे. वास्तवाच्या दर्शनाला अलंकाराची गरज नसते. घाव बसल्यावर रक्त भळभळ वाहत जावे तशी ह्या पुस्तकातली वाक्ये वाहत चाललेली आहेत. मनावर झालेले वयाच्या वेगवेगळ्या काळातले घाव परिणामकारक करायला दगडूला कुठल्याही कृत्रिम नाटकीपणाचा आश्रय घ्यावा लागलेला नाही.

पांढरपेशांच्या जगाने झिडकारलेली, नाकारलेली कितीतरी माणसे इथे भेटतात. देवाधर्माच्या नावाखाली यल्लामा देवाला दरिद्री आईबाप पोटची पोरे वाहतात. मुलींची पुढे वेश्यांच्या बाजारात विक्री होते. आजही यल्लामाच्या जत्रेत हजारो मुलींची त्या देवीच्या साक्षीने विक्री होते. दगडूच्या जमनामावशीच्या नशिबी हा भोग आलेला होता. फोरासरोडवर पिंजऱ्यात वेश्या करून डांबलेली जमनामावशी ह्या भाच्यासाठी खाऊ आणून वाट पाहत असते. घोडागाडीतून फिरवते. त्याला छान कपडे घेऊन देते. ह्या भाच्यावर माया करून आपली अतृप्त वात्सल्याची भूक ती भागवत असते. वेश्यावस्तीच्या त्या नरकवासातल्या कोठडीच्या भिंतीवर यल्लामाच्या देव्हारा असतो आणि बाबासाहेब आंबेडकरांची तसबीर. हे सारे काल्पनिक वाटावे इतके आम्हाला दूरचे आहे. त्या जमनामावशीची गोष्ट इथेच संपत नाही. काही वर्षे लोटतात. आता मोठा झालेला दगडू सांगतो- ''अगदी अलिकडची गोष्ट. मी दादरच्या पुलाखालून चाललो होतो. माझ्या सोबत काही बडी लेखक मंडळी. तिथे भिकाऱ्यांच्या घोळक्यात दीनवाणी मुद्रेची, लक्तर फाटलेली, झिंज्या सोडलेल्या अशा अवस्थेत मी जमनाला ओळखतो. जमनाच ती. तिनेही एवढ्या वर्षानंतर मला ओळखलेले असते. ती एकटक माझ्याकडे बघत असते. तिच्याशी साधा संवादही मी करू शकलो नव्हतो. वाटलं, टेरिलिनच्या कपड्यांत आपण किती पांढरपेशे झालोय.'' दगडूचे जीवन आता वरपांगी यशस्वीही म्हणण्यासारखे. पण त्या यशाच्या वस्त्रांना आतून काट्यांचे अस्तर जोडल्यासारखे सतत टोचण्या देणारे.

शिक्षणाशिवाय दलित समजाला मुक्ती नाही हे ओळखून

बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांसाठी शिक्षणसंस्था उभारल्या. अन्यायाविरुद्ध दंड थोपटून उभे राहिल्याशिवाय ह्या गुलामगिरीतून सुटका नाही याची जाणीव झालेला शिक्षित दलित समाज नव्या निर्धाराने त्या दिशेने झुंजही घेऊ लागला. पण त्यातच एक नवा पांढरपेशा दलित तयार झाला. त्याचे खेड्यातल्या अशिक्षित आणि सर्वार्थाने दलितावस्थेत राहणाऱ्या आपल्याच बांधवाशी नाते तुटत गेले. ह्या नव्या वास्तवाचे चित्रणही 'बलुत्या'त पाहायला मिळते. ही एक निराळीच, ना अरत्र ना परत्र अशी अवस्था. ''आपल्याला जीवनात काय हवे? आपले काय बरं हरवलंय? ही नुसती धावपळ काय आहे?'' अशांसारख्या मूलभूत प्रश्नांचे मोहोळ आता उठते. दगडूला त्या प्रश्नांच्या गांधीलमाशा डंख मारू लागतात. जीवन निराळ्याच दृष्टीने असह्य करतात. रोज नव्या भ्रमनिरासांचा अनुभव येतो. स्वत:ला डावे म्हणवणाऱ्यांतला उजवेपणा आणि ज्यांना प्रतिगामी उजवे मानले त्यांच्यातला डावेपणा अनुभवाला येतो आणि गोंधळ वाढतच जातो. कुठल्याही एका तत्त्वज्ञानाची रेडीमेड झापडे न बांधता जगू पाहणाऱ्यांची ही नेहमीचीच कुचंबणा आहे. असंतुष्ट सॉक्रेटिसाचेच जिणे त्यांच्या वाट्याला येते. 'देव आहे ऐसी वदवावी वाणी नाही मनी ओळखावे' ही प्रचीती तुकोबांनाही आली होती. दीनांचा वाली म्हणून ज्या देवाचे गोडवे आपण गातो तो तसा वालीबिली नसल्याचे पदोपदी अनुभवाला येऊ लागल्याने तुकारामबुवांनाही पायाखालची वाळू सरकल्यासारखे वाटणे स्वाभाविक होते. 'राजकारणाच्या लढाईत बाजारबुणगीही चालतात' असे म्हणून बाजारबुणग्यांना जवळ करून प्रामाणिक लढवय्यांशी जिवघेणा खेळ खेळणारे मान्यवर पुढारी दगडूला भेटतात आणि गोंधळ वाढत जातो. 'तळाच्या माणसाशी आपण एकनिष्ठ राहावं' असे दगडूला प्रामाणिकपणाने वाटत असते, पण असा नुसता डांगोरा पिटून त्या तळातल्या माणसांना 'भांडवाला'सारखे वापरून स्वत:ची पोळी पिकवणारे नेतेही त्याला दिसत असतात. मासिक हजार-बाराशे रुपयांची प्राध्यापकी आणि उच्चवर्णीयांच्या वस्तीतला आपला फ्लॅट सजवून परिसंवाद 'संपन्न' करणारे पांढरपेशे पुरोगामी, क्रांतिकारक इत्यादी विद्वान आणि विदुषी इतरांना 'प्रस्थापित' म्हणून हिणवण्यात धन्यता मानताना आढळतातच की! तेच ढोंग दलित नेते म्हणवणाऱ्यांत झिरपलेले दिसते.

शिकलेल्या दगडूला पहिली नोकरी लागते ती व्हेटर्नरी कॉलेजात. 'क्लार्क-कम्-लॅबोरेटरी ॲसिस्टंट' असा दणकेबाज हुद्दा, पण ती नोकरी मिळण्याचे कारण निराळेच. साऱ्या महाराष्ट्रातून येणाऱ्या रोगी जनावरांच्या शेणाचे नमुने बरण्यांत भरून काचेच्या रॉडने घुसळणे, मेलेल्या जनावरांची कातडी सोलून ती नासू नयेत म्हणून त्यांच्या नसानसांतून अल्कोहोल भरणे हे काम करायला कुणीही उच्चवर्णीय माणूस तयार नसायचा. दगडू म्हणतो, ''साले आपण एवढे शिकलो तरी शेवटी आपल्या वाट्याला बापजाद्यांचा धंदा का बरं यावा?...समाजातल्या व्यवस्थेविरुद्ध खरी चीड निर्माण झाली ती या वेळी. आज माझ्या मनात जो विद्रोही कल्लोळ आहे त्याची बीजे ह्या अनुभवात सापडतील. वाटायचं, मुडदेफरासांनी उकरलेल्या मातीसारखी उलथापालथ व्हावी.''

ह्याच काळात दगडू रुपारेल कॉलेजात शिकायला जात होता. तिथे कालिदासाचे मेघदूत शिकावे लागे. मेघदूतातल्या शृंगारिक ओळींनी महिरून जाणाऱ्या पांढरपेशा घरातल्या यक्षिणीही वर्गात असत आणि त्या काळी दगडूचे लग्न होऊनही बायकोशी एकान्त करायला अशक्य असा पत्र्याचा आडोसा. तसल्या त्या आडोशात माणसांची गर्दी. काकूच्या पलंगाखालच्या अडगळीत दगडूची शृंगारशय्या. कल्पनेत कालिदासाचे मेघदूत आणि वास्तवात शेणाचा नरक. त्यातही पुन्हा सासू-सुनेच्या भांडणाचे घरात ''विषारी चुबू काटे पसरलेले. सकाळी झाडावं तर संध्याकाळी पुन्हा उगवणारे.''

अशा दोन्ही बाजूंनी फाटलेल्या अवस्थेत जगणारा दगडू वैयक्तिक दु:खे जोजवीत न बसता दलितांच्या चळवळीत पडतो. तिथेही जन्माला आल्याबरोबर पार्टीचे कार्ड चिकटलेले. ''सोशल फोर्सच एवढा होता की तुम्हाला वेगळी पार्टी इच्छा असूनही निवडता येत नव्हती. ज्यांनी निवडली ते बहिष्कृत झाले. त्यांच्या प्रेतयात्रेला जात हजर राहिली नाही. (इथेही पुन्हा जात आहेच!) विंचूरचे रणखांबे, बाबासाहेबांचे चरित्र लिहिणारे खैरमोडे, कॉ. मोरे ही ठळक उदाहरणे.'' दलित पुढारी म्हणवणाऱ्यांनादेखील आपल्या फाटक्यातुटक्या कपड्यांतल्या अनुयायांनी मोर्चा मिरवणुकीत आपल्या बरोबरीने चालावे हे मान्य नसायचे याहून आणखी भयंकर भ्रमनिरास दुसरा कुठला व्हायला हवा?

जन्मापासून छळणारा अस्पृश्यतेचा शिक्का तो आपल्या सामाजिक जीवनातून नष्ट व्हावा म्हणून चालवलेल्या चळवळीत आपमतलबी नेत्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाला आलेल्या प्रसंगामुळे वाढत जाणारी निराशा, निर्मितिशील, पण अशा परिस्थितीत शापासारखे ठरणारे मन, ज्या आईने आपल्यासाठी एवढे डोंगराएवढे कष्ट उपसले तिला ''उभ्या हयातीत मी काय सुख दिलं?'' ही टोचणी. बायकोने एकाएकी घर सोडून एका म्हाताऱ्याशी लग्न करून संसाराचा पट उधळलेला. संगमनेरच्या बाजारात अंगावर विटके लुगडे, डोक्यावर गवताचा भारा आणि पाठीला धोतरात बांधलेले तान्हे लेकरू हे तिचे अनपेक्षितपणे घडलेले दर्शन. स्वत:च्या एकलकोंड्या प्रवासात तीव्र आठवण व्हावी असा एकच, पण दगडूपासून तोडून नेलेला दुवा म्हणजे लाडकी लेक बकुळा. तिलाही तिच्या आईने 'खाचरा'त ठेवलेले. फाटत फाटत जाणाऱ्या जीवनाला कुठे कुठे आणि किती ठिगळे जोडायची?

'मडकं असतं तर बोलताना तोंड फुटलं असतं' अशा तीव्र आवेगाने ही कथा सांगून संपवताना दगडू म्हणतो-

''मी आयुष्यभर घाबरतच आलोय. त्याला कारणं जशी वैयक्तिक आहेत तशी ज्या अभावग्रस्त समाजात मी जन्माला आलोय त्यातही सापडतील.''

शेवटी दयाने असा हा आपल्यातला दगडू पाहिला म्हणजे काय पाहिले हे त्याच्या कवितेतूनच सांगितले आहे :

दु:खान गदगदताना
हे झाड मी पाहिलेलं...


...धमनी-धमनीत फुटू पाहणाऱ्या
यातना
महारोग्यांच्या बोटांसारखी
झडलेली पानं
हे खोड कसलं?
फांदी-फांदीला जखडलेली
कुबडी.
मरण येत नाही
म्हणून मरणकळा सोसणारं...

दु:खाने गदगदलेले झाड आता 'बलुतं' नावाचे पुस्तक होऊन आले आहे. पूर्वी धार्मिक ग्रंथाच्या वाचनाने 'निपुत्रिकाला पुत्र होतील, निर्धनाला धन लाभेल...' असे शेवटी फलित असायचे. तसे ह्या ग्रंथाचे फलित सांगायचे तर असेच म्हणावे लागेल : ''ह्या ग्रंथाच्या वाचनाने आपल्या निबर डोळ्यांना चिकटलेले आंधळ्या रूढीजन्य श्रद्धांचे सत्यदर्शनाला पारखे करणारे मोतीबिंदू गळून पडतील आणि हे भयानक वास्तव पाहता पाहता डोळ्यांत दाटणाऱ्या अश्रूंत नवी किरणे उतरल्याचा साक्षात्कार होईल. माणुसकीच्या अधिक जवळ जाऊन जगायची ओढ लागेल. साऱ्या चांगल्या साहित्याचा हेतू नाहीतरी दुसरा काय असतो? माणसामाणसांत नवे जिव्हाळे जोडून समाजाला कृत्रिम आणि जाचक बंधनातून मुक्त करण्याचाच ना?''

('महाराष्ट्र टाइम्स'मध्ये प्रकाशित, १८ मार्च १९७९)

**- पु. ल. देशपांडे**

## मी देणं लागते तुला



खरं सांगते
तू सापडला नाहीस, कुठेही

अख्खाच्या अख्खा
कधी मधी सरकून गेली
तुझी सावली,
चट चट उन्हात एकाकी चालताना.
कधी चमकले
तुझे मायाळू डोळे,
रात्रीच्या निरव अंधारात.
कधी पकडून ठेवली मी
अकस्मात सापडलेली
तुझी कोवळीशार तिरीप

मुठीत घट्ट बंद करताना
तडकाफडकी निघून गेलास तू
सगळं अर्ध्यावर सोडून
कायमचा.
वाचून दाखवायची होती तुला,
तुझ्यावर लिहिलेली
जैविक बिंदूच्या पार जाणारी,
पहिली वहिली कविता
मी देणं लागते तुला
दोन ओळींमधल्या विस्तिर्णतेचं.
अदृश्यामधल्या
दृश्यतेचं.

मी देणं लागते तुला
कोंडवाड्यापल्याडच्या
आर्त
खुल्या अंतराळाचं.
मी देणं लागते तुला

आणि वाचवू पाहते
भयंकर वेगाने
चालत्या बोलत्या धडधाकट माणसांचं
जिवाश्मात रुपांतर करणाऱ्या
निर्ममतेपासून
आपल्या वर्तमानाला.

तुझ्या अमीट शब्दांचं वंगण
मुरवून घेते मी
माझ्या टोकदार लिपीत
आणि सामोरी जाते
सांस्कृतिक अजेंड्याला
ग्लोबल नावाच्या.

'दृश्यांचा ढोबळ समुद्र' (२०१३, पॉप्युलर प्रकाशन) या संग्रहातून

**- प्रज्ञा दया पवार**
pradnyadpawar@gmail.com

# बलुतं आणि मी

**डॉ. मनोहर जाधव**

**२४ डिसेंबर १९७८ रोजी 'बलुतं' हे दया पवार यांचं आत्मकथन प्रकाशित झालं,
आज त्याला चाळीस वर्ष होत आहेत.
मागे वळून पाहात जागवलेल्या या 'बलुतं'च्या आठवणी.**


**१९७८** मध्ये 'बलुतं' प्रसिद्ध झालं तेव्हा मी बारावी उत्तीर्ण होऊन कॉलेजमध्ये दाखल झालो होतो. वाचनाचा नाद तसा सहावी-सातवीपासूनच लागलेला. अर्थात वाचन शिस्तशीर नव्हतं. त्या वयात तसं शिस्तशीर तरी कसं असणार? मिळेल ते पुस्तक वाचायचो. वडील रेल्वेत स्टेशन मास्तर. बालपण आणि किशोरवय गेलं ते नांदगावमध्ये. नांदगाव हे मुंबईहून-भुसावळकडे जाताना मनमाड जंक्शननंतर एक्सप्रेस गाड्या थांबण्याचा एक महत्त्वाचा थांबा. इथे रेल्वेचे एक मोठे ग्रंथालय-वाचनालय-क्रीडाकेंद्र होते. त्या संस्थेचे माझे वडील जनरल सेक्रेटरी होते. त्यामुळे मला हवे ते पुस्तक मिळत असे. श्रीकांत सिनकर, एस. एम. काशीकर, बाबूराव अर्नाळकर, गुलशन नंदा, रानू, ओमप्रकाश शर्मा, जेम्स हेडली चेस असं काय हातात मिळेल ते वाचत होतो. या वाचनानं मनाची एक मशागत झालेली. कॉलेजला गेल्यावर मग उद्धव शेळके, व्यंकटेश माडगूळकर असे अनेक लेखक आणि सत्यकथा, अनुष्टुभ, युगवाणी, पंचधारा ही नियतकालिकं असं हातात जे पडेल ते वाचत होतो. तर मी सांगत होतो 'बलुतं'बद्दल. (ही दया पवारांची 'बलुतं'मधील निवेदन शैली. मला ती आवडली होती.) 'बलुतं' प्रसिद्ध झाल्यानंतर पु. ल. देशपांडे यांनी 'महाराष्ट्र टाइम्स'च्या रविवार पुरवणीत 'दुःखानं गदगदलेलं झाड' या शीर्षकाचा लेख 'बलुतं'वर लिहिला होता. तो मी वाचलाही होता, या लेखामुळे 'बलुतं'कडे वाचकांचं झपकन् लक्ष गेलं आणि 'बलुतं'ची भन्नाट चर्चा सुरू झाली.

मी म्हटलं तर तसा कोवळ्या वयातलाच पोरगा होतो, पण त्या वयात मी 'बलुतं' मिळवलं अन् अधाशासारखा वाचत सुटलो. कसं मिळवलं मी 'बलुतं', तेही सांगतो. 'ग्रंथाली वाचक चळवळ' जोमात आली होती. 'ग्रंथाली'च्या त्या काळात वेगवेगळ्या लोकांनी महाराष्ट्रातील जिल्ह्याजिल्ह्यात जबाबदाऱ्या घेतल्या होत्या. माझ्या वडिलांची जळगावला बदली झाली होती. जळगावला प्रा. वसंत चव्हाण यांच्याकडे 'ग्रंथाली'ची वितरण व्यवस्था होती. ते कविता लिहीत असत आणि मीही नुकताच लिहू लागलो होतो. त्यामुळे त्यांच्या काही भेटी झाल्या होत्या. त्यांच्या घरी जाऊन मी 'ग्रंथाली'ची पुस्तकं विकत घेत असे. 'ग्रंथाली' त्यावेळी सभासदांना घसघशीत सूट देत असे. त्यामुळे मी 'ग्रंथाली'चा सभासद झालो होतो. त्याच काळात मी त्यांच्याकडून 'बलुतं' विकत घेतलं आणि अक्षरशः त्याची पारायणं केली. हे पुस्तक मला फारच आवडलं होतं. एकतर या पुस्तकाची वर्तमानपत्रात चर्चा होती. सुजाण वाचकांमध्ये या पुस्तकाचा उल्लेख होत असे, पण मला या पुस्तकात माझंच भावविश्व प्रतिबिंबीत झालं आहे की काय असं वाटू लागलं होतं. त्याचं कारणही तसंच होतं. 'बलुतं'मध्ये धामणगाव येथील महारवाड्यातील ज्या व्यक्तिरेखा दया पवारांनी चित्रित केल्या आहेत, त्यांचा अनुभव माझ्या वाट्याला आला नाही पण मी त्या त्या काळात पाहिलेल्या होत्या. उन्हाळ्याच्या किंवा दिवाळीच्या सुट्टीत आम्ही आई-बाबांसोबत आणि चुलत बहिण-भावंडासोबत खानदेशातील आमच्या गावी जात असू. महिना-पंधरा दिवस मुक्काम असायचा. या मुक्कामात मतलबी-बेरकी-स्वार्थी-सज्जन लोकांचा महारवाड्यात सहवास मिळायचा. 'बलुतं' वाचताना या लोकांची आठवण स्वाभाविकपणे होत होती. म्हणजे मी दया पवारांच्या पिढीनंतरचा असूनही, त्यांचा मुलगा शोभावा असा त्या वयाचा असूनही मला हा अनुभव आलेला होता, त्यामुळे मी मानसिक आणि भावनिकरित्या 'बलुतं'मध्ये गुरफटलो होतो.

'बलुतं'मधील सई, सलमा, बानू या स्त्री व्यक्तिरेखा माझ्या मनात कायम वसतीला आल्या. सई तर दया पवारांची पत्नी. देखणी स्त्री. एकदा पवारांचा एक मित्र घरी भेटायला आला तेव्हा सईनं त्याला ग्लासमध्ये पाणी दिलं, पाणी घेताना त्या मित्रानं नकळत चिमटा घेतला. त्यामुळे ती दुखावली होती. पवारांच्या मनात सईबद्दल सतत संशय होता. या संशयाच्या भुतामुळंच, अब्दुल सायकलवाल्यासोबत सई बोलताना दिसल्यामुळे पुढं संशयाचं प्रकरण वाढत गेलं आणि पवारांनी सईसोबत घटस्फोट घेतला. 'बलुतं' प्रसिद्ध झाल्यानंतर या सईनं पवारांवर कोर्टात खटला दाखल केल्याचं मी ऐकलं होतं, पण पुढचा तपशील मला समजला नाही.

मुंबई महानगरातील झोपडपट्टीत म्हणजे कावाखाना परिसरात निराश अवस्थेत राहत असताना त्या वस्तीतील सलमाचा पवारांवर जीव जडला. स्वभावानं ती धीट होती. नळावर पाणी भरायला आली की पवारांकडे बघत असायची. सिनेमातली गाणी म्हणायची. धाडसीपणाने बोलायचीही. निराश आणि बेरोजगार

अवस्थेतील पवार मनातून सुखावत असले तरी तिला झडझडून प्रतिसाद देत नसत. एकदा तर सलमाने पळून जाण्याचा प्रस्ताव पवारांसमोर ठेवला, पवार गांगरले. घाबरले. त्यांनी प्रतिसाद दिला नाही. पुढे सलमाचे लग्न झाले आणि तिने वस्ती सोडली. पुढे कधी तरी रस्त्याने जाताना एका इमारतीच्या वरच्या मजल्यावरून पवारांना कोणीतरी हाक मारली. ते वळून वर पाहतात तर सलमा त्यांना दिसली. ती धावतच खाली आली. एकमेकांनी ख्याली खुशाली विचारली. पवारांच्या लक्षात आले की, सलमा गर्भवती आहे. त्यांनी तिच्या पोटाकडे हाताने निर्देश करीत मिस्कीलपणे विचारलं, ''इसमें मेरा भी हिस्सा है ना?'' सलमा हजरजबाबीने उत्तरली, ''जा अब मुँह धोके आ.''




शालेय मैत्रीण बानूनेही पवारांना आकर्षित केलेले दिसते. पण ती मराठा कुटुंबातील असल्यामुळे भावबंधाचा विषय पुढे जाऊ शकत नाही याची पवारांना खात्री होती. पण मित्रांमध्ये बभ्रा झाला होता. पुढे 'बलुतं' प्रसिद्ध झाल्यावर बानूचे नातेवाईक पवारांच्या रेल्वेतील ऑफिसमध्ये वाद घालायला आले होते, असं वाचल्याचं आठवतं. एक खट्याळ आज्या धामणगावच्या महारवाड्यात होता. पवारांचे वडील निवर्तण्याआधी त्यांच्या आईच्या लक्षात आले होते की, आपण गर्भवती आहोत. पण वडील गेल्यानंतर या इरसाल आज्याने पवारांचे कान फुंकले, ''तुझा बाप गेल्यावर तुझी आई पोटुशी कशी काय राहिली'', असा त्यानं प्रश्न विचारला आणि पवारांच्या मनात आईबद्दल चीड निर्माण झाली. त्यांनी आईला जाब विचारला. ती भांबावली. हरतऱ्हेनं पवारांची समजूत काढू लागली. महत्प्रयासानं पवारांची समजूत काढण्यात तिला यश आलं. आईची आणि बहिणीची गावाकडं आबाळ होते म्हणून पवार शिक्षणासाठी ज्या वसतिगृहात राहत होते तिथं आईला आणि बहिणीला घेऊन आले होते. हेतू हा की मुलांच्या खानावळीत त्या काम करतील. दोन पैसे मिळतील आणि त्यांच्या जेवणाचा प्रश्नही सुटेल. व्यवस्थापनाकडून त्यांनी तशी परवानगी मिळवली होती, पण तिथेही त्यांच्या वाट्याला अपमान आणि मनस्तापच आला. एक दिवस ते बाहेरून वसतिगृहात आले तर एका खोलीत गाणे बजावण्याचा आवाज येत होता. दार उघडून त्यांनी पाहिले तर त्यांची बहीण ''राया मला घोड्यावर फिरवा'' हे गाणं गात नाचत होती, आणि मुलं हातात येईल ते डबडे वाजवत होते. एकदा तर मुलांनी जेवणावर बहिष्कार घातला आणि ते गोंधळ घालू लागले. त्या गोंधळात काही मुलं ''पचका झाला रे, पचका झाला'' असं ओरडत होते. पवारांनी माहिती घेतल्यावर त्यांना कळले की, निसर्गनियमानुसार आपल्या आईला मासिक पाळी आली आहे. ही बातमी मुलांपर्यंत पोचल्यामुळे हा गोंधळ झाला होता. धरणीनं आपल्याला पोटात घेतलं तर बरं, असं पवारांना वाटून गेलं. अशीच चंदर नावाची व्यक्तिरेखा माझ्या लक्षात राहिली. प्रतिभावंत चित्रकार असलेल्या चंदरची पुढे शोकांतिका झाली. नात्यातील एक मावशी दादरच्या पुलाखाली निर्वासित अवस्थेत पवारांना दिसली. पण सोबत लेखक मित्र असल्यामुळे पवार तिच्याशी बोलले नाहीत. आपल्या अशा वागण्याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

दया पवारांनी चित्रित केलेला एक प्रसंग मला लख्ख आठवतो. ते जेवायला बसले की, त्यांची आजी जवळ येऊन बसायची आणि पवार जेवत असताना त्यांच्या पाठीवर हात फिरवत ''लेका गबागबा खा'' असं म्हणायची. किशोरवयातील पवारांना याचा अर्थ कळायचा नाही पण आजीचं प्रेम अणि भावना लक्षात यायची. आपण जेवायला बसलो की, आजी असं का वागते हा प्रश्न त्यांना पडायचा. तात्या म्हणजे दया पवारांच्या काकासोबतही पवार जेवायचे, असंच एकदा दया पवार आणि त्यांचे काका, जेवायला बसले न् आजी आली, त् दोघांनाही म्हणायला लागली की, ''लेको, गबागबा खा'' याचा तात्यांना राग आला, त्यांनी नेहमीची कटकट म्हणून ताट लाथाडलं न् घराबाहेर पडले. मला प्रश्न पडला की पवारांची आजी असं का म्हणत असावी? त्या काळात अस्पृश्य समाजाची खाण्याची विवंचना, पाणी नाही न् जेवणही नाही, अशा परिस्थितीत आपल्या मुलाला न् नातवाला जर पोटभर जेवण मिळत असेल तर आजीला अप्रूप वाटणारच, किंबहुना आजीला आनंद देणाऱ्या ह्या घटना होत्या, म्हणून आपल्या लेकरा-नातवंडाला जेवताना बघून त्यांच्या म्हणजे पवारांच्या आजीच्या भावना दाटून येत असणार.

'बलुतं'बद्दल लिहिताना जे जे आठवलं तसं मी इथं लिहिलं. काही संदर्भ मागे पुढे झाले असतीलही. चूकभूल द्यावी घ्यावी, पण 'बलुतं'मध्ये जे अनुभवविश्व प्रकट झालं, ते सत्यकथन होतं. पवारांनी हातचं राखून लिहिलं नाही. प्रामाणिकपणे आणि पारदर्शीपणे त्यांनी लिहिलं. त्याची किंमतही त्यांना चुकवावी लागली. प्रसिद्धी मिळाली. टीकाही झाली. ही टीका स्वकीयांकडून तशी इतरांकडूनही झाली, पण त्यांच्या नावाला साहित्यविश्वात वलय निर्माण झालं. 'बलुतं' हिंदीत, इतर भारतीय भाषेत, अनेक विदेशी भाषेत गेलं. लेखक म्हणून पवारांचं नाव झालं. 'फाय फाउंडेशन'चा पुरस्कार मिळाला. परदेशवारी झाली, पद्मश्री मिळाली. नगर येथे होणाऱ्या अ. भा. म. साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदासाठी ते उभे राहिले. निवडणुकीची दगदग त्यांना मानवली नाही. दिल्लीच्या दौऱ्यावर असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यातच ते गेले. मराठी साहित्यविश्वाला हा धक्का होता.

मी 'बलुतं'मधील काही घटना-प्रसंग वर सांगितले, काही व्यक्तिरेखांचा उल्लेख केला, त्यामागे 'बलुतं'चं संक्षिप्त कथानक किंवा 'बलुतं'चं स्वरुप सांगावं हा हेतू नाही. एखाद्या अभावग्रस्त समाजातीलं, जातव्यवस्थेनं बळी घेतलेल्या समाजातील संघर्ष

करणाऱ्या व्यक्तीच्या आयुष्यात किती अकल्पित गोष्टी घडतात, याचा अंदाज सर्वसामान्य माणसाला येऊच शकत नाही. ते 'बलुतं'मुळे निदर्शनास आलं. 'बलुतं' प्रकाशित झालं त्याआधी कुमुद पावडे, प्र. ई. सोनकांबळे सारख्या लेखकांचं आत्मकथनपर स्फुट लेखन 'अस्मितादर्श'सारख्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालं होतं, पण 'बलुतं'ने कोंडी फोडली. 'बलुतं'नंतर झपाट्यानं एका वेगात अनेक आत्मकथनं प्रसिद्ध झाली आणि दलित साहित्यप्रवाहातील आत्मकथनांची जोरदार चर्चा सुरू झाली. या पुस्तकांना आत्मकथन म्हणावे की आत्मचरित्र अशीही अभ्यासकांमध्ये चर्चा झडू लागली. वयाच्या चाळीसाव्या वर्षी पवारांनी 'बलुतं' लिहिलं, त्याआधी असा प्रयोग कोणी केला नव्हता. त्यामुळेच पुढे दलित आत्मकथने अशी संज्ञा पुढे रूढ झाली. त्यावर विद्यापीठीय स्तरावर पदवीसाठी प्रबंधरूपाने अभ्यास सादर झाले. ते आजही सुरू आहेत.

'हा दगड इमारतीच्या बांधकामातून निकामी केलेला' हे जॅक लंडन यांचं आणि 'आई तुझ्यामुळेच दलितांच्या या विराट दुःखाचं दर्शन झालं' हे वाक्य 'बलुतं'च्या सुरुवातीच्या पानांवर आहे. शिवाय 'या पुस्तकातील घटना सत्य असून कोणाला त्या काल्पनिक वाटल्या तर तो योगायोग समजावा' असाही उल्लेख वाचायला मिळतो. त्यामुळे वाचकाची जिज्ञासा चाळवली जाते. लेखकाच्या भूमिकेचा आणि दृष्टिकोनाचाही त्यामुळे परिचय होतो. त्या काळात सार्वजनिक वाचनालयातून पुस्तके मिळवून वाचायची प्रथा होती. अनेक वाचक वाचनालयाच्या काऊंटरवर येऊन 'बलुतं'ची चौकशी करत. कोणी वाचायला नेलं असेल तर ते परत आलं का? असं विचारत असतं. काही वाचक तर 'दया पवार आलेत का?' अशी संक्षिप्त आणि अर्थपूर्ण विचारणा करीत असत. अर्थात हे मला कळलं तेव्हाच्या वर्तमानपत्रात छापून आल्यावर. काहींना तर दया पवार ही स्त्री आहे की पुरुष असाही प्रश्न पडत असे. ते स्वाभाविक होतं अन् मजेशीरही.

'बलुतं'मधील निवेदनशैली (Naration) मला आवडली होती. पूर्वाश्रमीचा दगडू पवार हा लेखक झालेल्या, मध्यमवर्गात स्थिरावलेल्या दया पवारला आपली जीवनकहाणी सांगतो असं त्याचं स्वरूप होतं. ती संवादीशैली होती. एखादी घटना सांगता-सांगता निवेदक ओघात दोन-तीन घटना सांगतो आणि मग आपण मगाशी कोणती घटना सांगत होतो, हे आठवून तो म्हणतो, 'हा, तर मी काय सांगत होतो?' असं म्हणून तो पुन्हा मूळ घटना निवेदनाकडे वळतो. म्हणजे वाचकाला विश्वासात घेऊनच निवेदक कथन करत राहतो. त्यामुळे वाचक त्यात नाही म्हटलं तरी गुंतत असे. पुढे विश्राम बेडेकरांनी 'एक झाड दोन पक्षी' लिहिताना अशा प्रकारचं निवेदन केलेलं आठवतं.

'बलुतं' प्रसिद्ध झाल्यावर पत्रांचा पाऊस पडला. पवारांनी ही पत्रं जपून ठेवली. नंतर या पत्रांच्याच आधारे त्यांनी 'बलुतं : एक वादळ' हे पुस्तक प्रसिद्ध केलं. ही पत्र वाचतानाही आपण स्तंभित होतो. त्यात सर्व प्रकारची पत्रं होती. त्यात असूया, द्वेष, आरोप, स्तुती, टीका, आक्षेप असं काय-काय होतं. एखादी साहित्यकृती समाजाला कशा प्रकारे हादरवून सोडते, अंतर्मुख करते आणि कशा प्रकारे प्रतिक्रिया द्यायला उद्युक्त करते, हे त्या पुस्तकातून निदर्शनास येतं.

दया पवारांची माझी दोन वेळा भेट झाली. पहिली भेट जळगावला भरलेल्या अ. भा. म. साहित्यसंमेलनाच्या वेळी. जळगाव आमचाच जिल्हा. तेव्हा मित्रांसोबत मी संमेलनात उत्सुकतेपोटी भटकायला गेलो. कॉलेजच्या पहिल्या वर्षालाच होतो. आम्ही मुख्य मंडपात शिरताना पवारांना मंडपाबाहेर पडताना पाहिलं. एकटेच होते. लगबगीनं चालले होते. अंगात सफारी. शरीराने बऱ्यापैकी सुटलेले. मी त्यांना तत्काळ ओळखलं. त्यांच्या जवळही गेलो पण ते इतके घाईत होते की त्यांना थांबवणं मला योग्य वाटलं नाही. त्यांना पाहिलं पण बोलणं झालं नाही. दुसरी भेट पुणे विद्यापीठाच्या (आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) मराठी विभागात ते काही कामासाठी आले होते. मी नुकताच रुजू झालो होतो. मी कॅम्पसमध्ये कुठल्यातरी कामासाठी बाहेर पडलो होतो, मागे नजर गेली तर दया पवार. मग यावेळी मी त्यांच्याशी बोललो. रस्त्यावर उभे राहून दहा मिनिटं ते माझ्याशी बोलले, नंतर आपल्या कामासाठी निघून गेले.

'बलुतं'चं मुखपृष्ठ, त्याची वाचनीयता, त्याला मिळालेले पुरस्कार, लेखक म्हणून दया पवारांच्या वर्तमानपत्रात आलेल्या मुलाखती, वाङ्मयविश्वातील सार्वजनिक जीवनातील त्यांचा वाढलेला वावर, असं सगळं त्या काळात आम्हा मित्रांना आकर्षित करणारं, चर्चेसाठी उद्युक्त करणारं होतं. ४-५ वर्षांपूर्वी मी अकोले महाविद्यालयात व्याख्यानासाठी गेलो होतो. खांडगे बंधू तिथे होते. एक प्राचार्य तर दुसरे प्राध्यापक. त्यांच्याशी माझे मैत्रीपूर्ण संबंध. मुद्दामहून एक दिवस आधी संध्याकाळी गेलो. रात्री कॉलेजच्या गेस्ट हाऊसवर थांबलो आणि सकाळीच गाडी आणि ड्रायव्हर घेऊन जवळच असलेल्या धामणगावला गेलो. हेतू हा की पवारांचे समवयीन कोणी भेटले तर त्यांच्याशी बोलावे. माहिती घ्यावी. ज्या महारवाड्यात पवारांचं बालपण गेलं तो वाडा, परिसर पाहावा, पण पदरी निराशा पडली. नव्या पिढीतील तरुणांना दया पवार हे नावही माहित नाही. 'बलुतं'ही माहीत नाही. मराठीतील इतका मोठा लेखक आपल्या गावात होऊन गेला, याची पुसटशी गंधवार्ताही नाही. महारवाडा तर पार नामशेष झालेला. घराच्या भिंती तर सोडा साधे दगड गोटे तिथं नाही. एकदम भकास वातावरण. गावात एक फेरी मारून मी परत फिरलो. त्याच अवस्थेतेत 'दया पवारांच्या गावात' असा एक लेख लिहिला. तो 'परिवर्तनाचा वाटसरू'मध्ये प्रसिद्धही झाला. चाळीस वर्षांनंतर 'बलुतं'कडे पाहताना वाटतं, आपलं सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरण किती बदललेलं आहे. हा बदल या समाजाची बौद्धिक, सांस्कृतिक कुवत दाखवण्यासाठी पुरेसा आहे.


**- डॉ. मनोहर जाधव**
भ्रमणध्वनी : ९८२२८५०२९०
manohar2013@gmail.com

# आठवणींची ऊबदार गोधडी

**सुदेश हिंगलासपूरकर**

**‘ग्रं**थाली’त कामास लागून दोन वर्षे झाली होती. ‘ग्रंथाली’ने दया पवार यांचे ‘बलुतं’ हे आत्मकथन प्रसिद्ध केले होते. या पुस्तकाच्या निमित्ताने दादर चौपाटी, चैत्यभूमी येथे वाळूवर टेबल टाकून ‘बलुतं’ हे पुस्तक लेखकासोबत विकण्याचा सिलसिला सुरू झाला. त्यानंतर वाळूवरून आम्ही रोडवर स्टॉल लावला व आता शिवाजी पार्क मैदानात स्टॉल लावतो. नागपूर येथील ‘दिक्षाभूमी’च्या पटांगणात टेबल टाकून पुस्तके विकण्याची दोन्ही ठिकाणांची तीन वेळा स्थित्यंतरे पाहिली आहेत. आज या गोष्टीला चाळीस वर्षे होत आहेत. आजही या पुस्तकाला दोन्ही ठिकाणी मागणी असते. या पुस्तकाच्या निमित्ताने मला दलित व विद्रोही साहित्य संमेलने पाहता आली. आजही तिथे जमणाऱ्या समुदायातील सर्व विक्रेते व भेट देणारी मंडळी आवर्जून भेटत असतात. यानिमित्ताने चैत्यभूमी व दीक्षाभूमीचे दर्शन घडते. गेली चाळीस वर्षे मला चैत्यभूमी व दीक्षाभूमीचे दर्शन घडते आहे. लेखक आणि लेखकाने रंगवलेला समाज समजून घेता आला ही भाग्याची गोष्ट! आजही मला या दोन्ही ठिकाणी पुस्तके विकताना जाणवते की माणसे वैचारिक लिखाण व चरित्र वाचतात. पुस्तकांची विक्रीही मोठ्या प्रमाणात होते. ‘बलुतं’ ही ‘ग्रंथाली’ची ओळख झाली आहे. ‘बलुतं’ म्हणजे दलित साहित्य, वाचक व ‘ग्रंथाली’करिता एक ऊबदार गोधडी झाली आहे.

‘ग्रंथाली’च्या यात्रेच्या निमित्ताने, आर्टवर्क डिझाईन आणण्याच्या निमित्ताने षांताराम पवार यांच्याकडे जाण्याचा योग










आला. आजही मी ज्यावेळी पुस्तक यात्रेच्या निमित्ताने भटकतो त्यावेळी त्यांनी केलेली यात्रेतील पोर्स्टर्स डिझाईन व त्यांचे वेगळेपण मला प्रकर्षाने जाणवते. त्यांनी केलेले ‘बलुतं’चे कव्हर व पोस्टर्सची डिझाईन मला आवडली होती. ‘ग्रंथाली’चे ऑफिस ‘मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया’त होते. त्यावेळी कट्ट्यावर मनोहर ओक यायचा. त्याने ‘चरसी’ नावाने वेगळे लिखाण केले होते. ते मी प्रसिद्ध करण्याचे ठरवले होते. मनोहर ओक हा षांताराम पवार यांचा मित्र. ‘ग्रंथाली’मुळे पवार मला ओळखत होते. मी कव्हर त्यांच्याकडून करून घेण्याचे ठरवले. ‘सुदेश तू त्याचे पुस्तक काढणार, अरे तो तर तुला दरोजच छळणार!’ ‘तुम्ही कव्हर करणार ना? मी हे पुस्तक काढणार.’ ‘तुला पुस्तक कळले आहे का? आपण वेगळ्या रंगाचा कागद घेऊ व त्यावर डिझाईन प्रिंट करू. तुला दोन्ही गोष्टी कळत नाहीत.’ असा आमच्यात संवाद घडला. पुढे आमचा मार्केटमध्ये जाऊन कागद खरेदीचा प्रवास सुरू झाला व पुस्तक प्रसिद्ध झाले. ‘ग्रंथाली’ व्यतिरिक्त त्यांनी माझ्या तीन पुस्तकांची मुखपृष्ठे केली आहेत. ‘ग्रंथाली’साठी त्यांनी केलेल्या पुस्तकांच्या मुखपृष्ठांचे वेगळेपण उठून दिसते. उदाहरणार्थ, मला भावलेले ‘बाइंडरचे दिवस’, ‘कार्यकर्ता’, ‘आणीबाणीचे दिवस’, ‘आदिमाया’... ‘कविथा’ हे पुस्तक फ्लोरोसंट पेपरवर प्रसिद्ध करण्याचा त्यांचा अट्टाहास व ‘दीपस्तंभ’साठी कव्हरवर पुस्तक व लेखकाचे नाव नाही, हे सर्व माझ्यासाठी अनाकलनीय होते. ते आधी माझे व्यक्तिगत मित्र होते. नंतर ते माझ्या मित्रांचेही मित्र झाले.

# आदमी अच्छा था...

## वैजयंती कुलकर्णी-आपटे

**अर्ध्या शतकापेक्षा जास्त काळ राजकारणात वावरलेले अटलबिहारी वाजपेयी साक्षेपी संपादक, संवेदनशील कवी आणि भावुक मनाचे रसिकही होते. त्यांच्या या पैलूंवर प्रकाश टाकणारा हा लेख.**

*मैं जी भर जिया, मैं मनसे मरूँ,*
*लौटकर आऊंगा, कूच से क्यो डरूँ?*

**अ**टलबिहारी वाजपेयी ह्यांच्या ह्या काव्यपंक्ती. मृत्यूला देखील त्यांनी एका कवितेत बजावून सांगितले की, चोर पावलांनी येऊ नकोस. उघड उघड समोर ये. आणि ह्याच कवितेत आपल्या प्रवृत्ती आणि निवृत्तीकडे बघण्याचा समदृष्टीचा परिचय ते देतात. ह्या कवितेत 'मैं लोटकर आऊँगा' असे ते म्हणतात. खरोखरच ते परत यावेत असेच जनसामान्यांना वाटत आहे. त्यांच्या जाण्याने आज देशातील प्रत्येकजण हळहळत आहे, आपल्याच घरातले कुणीतरी गेले असेच सगळ्यांना वाटत आहे. ह्याचे कारण आहे अटलजींचे व्यक्तिमत्व. त्यांच्यातल्या उदारतेचे, लोभस संवादाचे आणि अपार माणुसकीचे अप्रूप सगळ्यांनाच आहे. अटलजी होतेच तसे. कवी हृदयाचे. दिलदार वृत्तीचे, शालीन, सभ्य, हळुवार आणि मुलायम. त्यांच्या बोलण्यातली, भाषाणातली ऊब आश्वासक होती. शत्रूलाही त्याचं ऊबदार आलिंगन हवे होते. हे काय रसायन होतं? वाजपेयी नावाचे? ते उत्तम संसदपटू, मुत्सद्दी राजकारणी, संघाचे स्वयंसेवक, उत्तम प्रशासक तर होतेच. पण त्याही पलीकडे जाऊन एक संवेदनशील व्यक्ती होते, कवी मनाचे, पत्रकार, लेखक, साहित्याची जाण आणि आवड जोपासणारे, नाट्यसंगीताचा आस्वाद घेणारे, कलाकारांबद्दल हृदयात स्थान असणारे, त्यांचा आदर करणारे एक विलोभनीय कलोपासक व्यक्ती होते.

अटलजींचे ओजस्वी वत्कृत्व, त्यांची प्रतिभाशाली लेखणी आणि काव्य, शास्त्र, विनोदात रमण्याचा त्यांचा स्वभाव, ह्यामुळे त्यांचा सहवास नेहमी हवाहवासा वाटे. पांढरेशुभ्र धोतर, पांढरा झब्बा आणि जाकीट असा त्यांचा पेहराव असे. कधीतरी पठाणी ड्रेस, परराष्ट्रमंत्री झाल्यावर त्यांनी सूटही घातला, पण त्यांचे प्रसन्न व्यक्तिमत्व, दिलखुलास हास्य आणि मनमोकळे बोलणे ह्याने ते अर्धी सभा जिंकत. त्यांची भाषणे ऐकणे ही एक मेजवानीच ठरत असे. लोक दुरून-दुरून केवळ यांची भाषणे ऐकण्यासाठी येत. त्यांच्या शब्दांना धार होती कारण त्यामागचे विचार अस्सल होते. लोकांशी थेट संवाद साधण्याची कला होती. त्यांचा देशभर संचार असे. आसेतुहिमाचल ते संवाद साधत असत. कुठेही गेले,



कुठल्याही शहरात, खेड्यात गेले तरी ते हॉटेलमध्ये न राहता स्थानिक कार्यकर्त्यांच्या घरी राहायचे. गेल्यावर त्यांच्या कुटुंबियांशी संवाद, त्यांच्या घरातल्या लहान मुलांशी गप्पा असा त्यांचा कार्यक्रम असायचा. आबालवृद्धांशी ते सारख्याच आत्मीयतेने बोलायचे, त्यामुळे प्रत्येकालाच ते आपलेसे वाटायचे. सगळ्यांनाच ते आदरार्थी 'आप' असे संबोधायचे, अगदी घरातल्या त्यांच्या प्रिय अश्या पाळीव कुत्र्यालाही ते 'आप चलिये, उठिये अभी यहाँसे, हमे काम करना है, आप अंदर चलिये' असा संवाद साधायचे.

अमोघ वक्तृत्वशैली ही अटलजींना लाभलेली देणगी होती. भाषेवर प्रभुत्व, योग्य शब्दांचा वापर आणि अर्थपूर्ण पॉझेस. ह्यामुळे त्यांची भाषणे ऐकणे ही बौद्धिक मेजवानीच होती. संपूर्ण देशाला मोहित करणारी त्यांची भाषणे लोक अगदी जिवाचे कान करून ऐकत असत. ते वक्ता दशसहस्त्रेषु तर होतेच पण त्यांच्या भाषणातही नाट्य असे. आवाजातले चढ उतार आणि श्रोत्यांशी थेट संवाद साधण्याची त्यांची शैली, ह्यामुळे ते लोकांच्या मनाचा ठाव घेत. अटलजी जर राजकीय पक्षात नसते तर ते अभिनेता नक्कीच झाले असते असे त्यांचे निकटवर्तीय म्हणत कारण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अभिनेता आणि नेता ह्यांच्यातली अगदी सूक्ष्म रेषा होती. त्यांनी हजारो भाषणे केली, अनेक सभा गाजवल्या, उत्तम संसदपटू म्हणून ख्याती मिळवली. अगदी संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावरही त्यांनी

उत्कृष्ट हिंदीतून भाषण करून भारताची मान उंचावली. पण ह्या त्यांच्या जाहीर भाषणाची सुरुवात लहानपणी व्यासपीठावर झालेल्या फजितीने झाली होती. वाजपेयी ह्यांनीच एका मुलाखतीत अगदी दिलखुलासपणे आपल्या ह्या फजितीची गोष्ट सांगितली होती. ते शाळेत असताना स्नेहसंमेलनात पहिल्यांदा भाषण करायला स्टेजवर आले. तेव्हा ते अवघे ११ वर्षांचे होते. त्यांनी भाषणाची काहीच तयारी केली नव्हती. समोर मोठ्या संख्येने प्रेक्षक बसले होते. ते पाहून अटलजी गांगरून गेले आणि भाषण करू शकले नाही. त्यानंतरही एकदा ग्वाल्हेरला असताना आंतरशालेय वाद-विवाद स्पर्धेत त्यांनी भाग घेतला होता. मागच्या वेळची फजिती लक्षात घेता ह्यावेळी त्यांनी पूर्व तयारी करून भाषण अगदी पाठ केले होते. स्टेजवर गेल्यावर पाठ केलेले भाषण घडा-घडा म्हणताना मध्येच एक वाक्य ते विसरले आणि मग गाडी घसरली. पुढचे काहीच आठवेना. तेव्हाही अर्धवट भाषण सोडून त्यांना स्टेज सोडवा लागला होता. मात्र त्यानंतर भाषण कशीही पाठ करायचे नाही असा निश्चय त्यांनी केला आणि ह्या पहिल्या अपयशावर मात करत उत्स्फूर्त बोलणारे ते एक ओजस्वी वक्ते बनले.

अटलजी विसाव्या वर्षीच कवी म्हणून प्रसिद्ध झाले. मध्य प्रदेशातल्या हिंदी साहित्यिक वर्तुळात एक उभरता कवी म्हणून त्यांच्या नावाची चर्चा सुरू झाली. अनेक ठिकाणी त्यांना कवी संमेलनासाठी आमंत्रणे येऊ लागली. खरे तर अटलजींचे वडील कृष्णबिहारी वाजपेयी हे ग्वाल्हेर येथे शाळेत शिक्षक होते पण ते उत्तम कविता करत. तर त्यांचे आजोबा श्याम्लाली हे हिंदी आणि संस्कृतचे व्याख्याते होते. तोच वारसा अटलजींना लाभला.

त्यांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात मात्र पत्रकारितेतून झाली. साधारण पन्नासच्या दशकात दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'वीर अर्जुन' ह्या वृत्तपत्रात त्यांनी सहाय्यक संपादक म्हणून काम सुरू केले. त्यानंतर तेव्हाचे सरसंघचालक गोळवलकर गुरुजी ह्यांनी सांस्कृतिक राष्ट्रवाद जागवणारे मासिक 'राष्ट्रधर्म' ह्या नावाने काढायचे ठरविले. पंडित दीनदयाळ उपाध्याय आणि तेव्हाचे उत्तर प्रदेशातले प्रांत संचालक भाऊराव देवरस ह्यांच्यावर ह्या मासिकाची जवाबदारी सोपविली. दीनदयाळजींनी अटलजींचे नाव संपादक पदासाठी सुचविले आणि मग वाजपेयी ह्यांची लेखणी खऱ्या अर्थाने बहारली. ह्या राष्ट्रधर्मच्या पहिल्याच अंकात अटलजींची 'हिंदू तन मन, हिंदू जीवन' ही कविता द्यायची असे ठरले. अटलजी मात्र ह्या गोष्टीला तयार नव्हते. पहिल्याच अंकात, मी संपादक असताना माझीच कविता देणे बरोबर होणार नाही असे त्यांना वाटत होते. मात्र देवरसांच्या आग्रहापुढे त्यांचे काही चालले नाही आणि ही कविता पहिल्याच अंकात छापून आली. 'राष्ट्रधर्म'चा पहिलाच अंक हिट झाला. त्यावेळी अंकाचे संपादन अटलजी आणि राजीव लोचनजी करायचे आणि व्यवस्थापकीय संचालक होते दीनदयाळजी, पण हे सगळेजण अंकाचे गठ्ठे बांधण्यापासून, त्यावर पत्ते लिहिण्यापर्यंत सगळी कामे करत होते. नंतर 'राष्ट्रधर्म'साठी स्वत:चा प्रेस दीनदयाळजींनी घेतला. विशेष म्हणजे दीनदयालजी ह्या प्रेसमध्ये स्वत: कंपोझिंग म्हणजेच खिळे जुळविण्याचे काम शिकले आणि त्यांनी अटलजींना आणि राजीव लोचन ह्यांनाही ते शिकायला लावले. प्रेसमध्ये कुणावाचूनही काम अडायला नको, हा उद्देश त्यामागे होता. ह्या अंकाच्या वितरणाचे काम नानाजी देशमुख करत होते. अल्पावधीतच 'राष्ट्रधर्म' मासिक चांगलेच लोकप्रिय झाले, त्याचा खप वाढायला लागला. मग असेच एक साप्ताहिक काढावे अशी कल्पना दीनदयाळजीना सुचली आणि पांचजन्य हे हिंदी साप्ताहिक सुरु करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ते अटलजींवर इतके खुश होते की ह्या 'पांचजन्य' साप्ताहिकाच्या संपादकपदाची धुरा त्यांनी एकट्या अटलजींना दिली.

राष्ट्रधर्मच्याच भारत प्रेसमधून 'पांचजन्य'ची छपाई सुरू झाली. मात्र लगेचच महात्मा गांधींची हत्या झाली आणि संघावर बंदी आली. त्यातच भारत प्रेसलाही टाळे लागले. संघाच्या अनेक स्वयंसेवकांना पकडण्यात आले. त्यात दीनदयाळ उपाध्याय आणि नानाजी देशमुखांचाही समावेश होता. अटलजी मात्र त्यावेळेस भूमिगत झाले होते. त्यानंतर काही काळ भूमिगत असतानाही चेतना आणि इतर काही नियतकालिकांतून अटलजींनी लिखाण केले. गांधीहत्येची चौकशी करणाऱ्या आयोगाने ह्या हत्येत संघाचा हात नसल्याचा निर्वाळा दिला आणि सरकारने ११ जुलै १९४९ रोजी संघावरील बंदी उठविली. तुरुंगात असलेल्या सगळ्या संघ स्वयंसेवकांना सोडून देण्यात आले. दीनदयालजी आणि नानाजी देशमुखांचीही सुटका झाली. भारत प्रेसचे टाळे उघडले आणि 'राष्ट्रधर्म' आणि 'पांचजन्य'चे प्रकाशन पुन्हा सुरू झाले.

मी आणि माझे दोन सहकारी भारतकुमार राऊत आणि सुहास फडके आम्ही काढलेल्या एका 'पत्रकार' ह्याच नावाच्या दिवाळी अंकात वाजपेयींची मुलाखत घेतली होती. त्या मुलाखतीत अटलजी म्हणतात, ''तेव्हा संपादकाचे काम अतिशय जबाबदारीचे मानले जायचे. त्याला प्रतिष्ठाही असायची. पगार आणि अन्य सुविधांकडे कुणाचेही लक्ष नसायचे. मी तर पूर्ण वेळ स्वयंसेवक असल्याने मला पगार वगैरे नसायचाच. जरुरीपुरते पैसे फक्त आम्हाला मिळायचे. पण आपल्या लेखनाचा आनंद काही औरच असायचा.''

खडतर काळातही अटलजींची प्रतिभा फुलत होती. ते लखनौच्या साहित्यिक वर्तुळात महत्त्वाची व्यक्ती बनले होते. त्यांच्या अग्रलेखांना महादेवी वर्मा, अमृतलाल नगर, श्रीनारायण चतुर्वेदी, अशा अनेक ज्येष्ठ साहित्यिकांची दाद मिळत होती. 'राष्ट्रधर्म' आणि 'पांचजन्य'च्या यशाने सगळ्यांनाच उत्साहाचे भरते आले होते. त्यातच दीनदयाळजीनी नवे दैनिक सुरू करण्याचे ठरविले, 'स्वदेस'! त्याचेही संपादकपद अटलजीनाच सोपविण्यात आले. अटलजींची पत्रकारिता बहरात होती, लेख, अग्रलेख, कविता, वृत्तांत अशा अनेक माध्यमातून त्यांचे लिखाण चालू होते. 'पांचजन्य' आणि 'स्वदेस'च्या संपादनात ते अगदी गढून गेले होते. ह्यामुळे त्यांना राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून दिली. त्यांचे अग्रलेख सर्वदूर गाजत होते, पण स्वदेसची आर्थिक स्थिती फारशी चांगली नव्हती. त्यावेळी काँग्रेसचेच सरकार असल्याने त्या

दैनिकाला सरकारी जाहिरातीही मिळत नव्हत्या. त्यामुळे अखेर दोन वर्षानंतर 'स्वदेस'चे प्रकाशन बंद करण्यात आले.

मात्र त्या काळातल्या आठवणी अटलजीसाठी अगदी साठवणीतल्या दिवसांसारख्या होत्या. 'पत्रकार' दिवाळी अंकाच्या मुलाखतीत अटलजी म्हणतात, आधीच्या अंकापेक्षा पुढचा अंक जास्त चांगला कसा निघेल ह्याकडेच सगळे लक्ष असायचे. त्यात अधिक दर्जेदार मजकूर कसा देता येईल, ह्या अंकासाठी लेखन साहित्य मिळवणे, प्रुफे वाचणे, फोटो जमविणे, कार्टून्स काढून घेणे, बंडले बांधणे, ह्या सगळ्या कामात दिवस कसा संपायचा हे कळातही नसे, खाण्या-पिण्याची शुद्ध राहत असे. वाचकांची कौतुकाची पत्रे वाचूनच पोट भरत असे.

स्वदेस बंद पडल्यावर अटलजी दिल्लीत आले. डॉ श्यामाप्रसाद मुखर्जींच्या संपर्कात आले. तेव्हा त्यांनी नेहरूंच्या मंत्रिमंडळातून राजीनामा दिला होता आणि जनसंघ ह्या पक्षाची स्थापना केली होती. अटलजी अशा रीतीने त्यांच्या आवडत्या पत्रकारितेचा त्याग करून राजकारणात आले.

अटलजी जरी पत्रकारिता करत नसले तरीही नंतर त्यांचे लेखन आणि कविता मात्र चालूच राहिल्या. ते बहुश्रुत होते. त्यामुळे त्यांच्या लेखनाला एक वेगळीच धार होती, त्यांच्या कविता त्यांच्या भावुक कविमनाची प्रचीती देणाऱ्या तर होत्याच पण प्रसंगी काही कविता त्यांच्या कणखर बाण्याची साक्ष देणाऱ्या होत्या. कवितांची साथ तर त्यांनी तुरुंगातही सोडली नाही. १९७५ च्या पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी पुकारलेल्या आणीबाणीत अटलजींना अटक करून त्यांची रवानगी तुरुंगात करण्यात आली होती. ह्या १९ महिन्यांच्या काळात त्यांनी तुरुंगातही कविता केल्या. त्यानंतर 'कैदी कविराय' ह्या नावाने प्रसिद्ध झाल्या. ते म्हणत, ''माझ्यातला कवी जिवंत ठेवण्याचे सारे श्रेय माझ्या जेल यात्रांना आहे. तिथे मी भरपूर वाचन करतो आणि स्फुरलेल्या काही ओळी मी लिहून ठेवतो. राजकारणात येणाऱ्या वैफल्याने मला वारंवार साहित्याकडे वळविले आहे. त्या आधी त्यांचा 'मेरी इक्यावन्न कविताएँ' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आहे.

कवितांच्या प्रेरणेबद्दल बोलताना, अटलजींनी एकदा सांगितले की माझा प्रेरणास्रोत हा तुलसीदासांचा 'रामचरितमानस' हा ग्रंथ. जीवनाच्या संपूर्णतेचे दर्शन त्यांनी ह्या ग्रंथात मांडले आहे. तसा विषय साहित्यात दुसरा कुठेही आढळला नाही. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली आहे. त्यात 'मेरी संसदीय यात्रा', 'चार खंड', 'संकल्प काल', 'शक्ती से शांती', 'फोर डीकेड्स इन पार्लमेंट', (१९५७ ते १९९५ ह्या काळातील भाषणांचा संग्रह), 'मृत्यू या हत्या', 'अमर बलिदान', 'न्यू डायमेंन्शंस ऑफ इंडियाज फोरीन पोलिसी', 'जनसंघ और मुसलमान', 'संसदमें तीन दशक', 'विकास बिंदू', 'हिल ए वुन्ड', 'सेक्युलरवाद – भारतीय परंपरा', 'अमर आग है', (कवितांचा संग्रह) अशा अनेक पुस्तकांचा, तसेच, '२१ कविताएँ, 'क्या खोया, क्या पाया', 'व्यक्तित्व और कविताएँ' तसेच 'श्रेष्ठ कविता' ह्या कविता संग्रहांचा समावेश आहे.

त्यांच्या रचनांना चाल देऊन सुप्रसिद्ध गायिका पद्मजा फेणाणी ह्यांनी एक अल्बम प्रकाशित केला आहे. तसेच सुप्रसिद्ध गायक जगजीत सिंह ह्यांच्या आवाजात अटलजींच्या कवितांचा; 'नई दिशा आणि संवेदना' हे दोन अल्बम प्रकाशित झाले आहेत.

अटलजी स्वत: लेखक-कवी असल्याने त्यांना इतर साहित्यिकांबद्दल, कवींबद्दल नितांत आदर होता. त्यांना वाचनाची प्रचंड आवड आणि सवय होती. हिंदीतले काही कवी त्यांचे अतिशय आवडते होते. त्यामध्ये सूर्यकांत त्रिपाठी ऊर्फ निराला, बाळकृष्ण शर्मा उर्फ नवीन, जगन्नाथ प्रसाद उर्फ मिलिंद, ह्यांचा समावेश होता. तर उर्दूमधले फैज अहमद फैज हे त्यांचे आवडते शायर होते. ह्या बरोबरच त्यांना रहस्यकथा, गुन्हेगारी कथाही वाचायला आवडत.

मराठी साहित्याचीही त्यांना आवड होती. मुख्य म्हणजे मराठी भाषा त्यांना चांगली येत होती. महाराष्ट्रात कुठेही जाहीर सभा असेल तर अटलजी पहिली २-४ वाक्ये आवर्जून मराठीत बोलायचे, त्यामुळे श्रोते खूश व्हायचे. ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे हे त्यांचे आवडते लेखक होते. स्वातंत्र्यवीर सावरकर हे अटलजींचे प्रेरणास्थान तर होतेच, पण त्यांच्या कवितांचाही त्यांच्यावर प्रभाव होता. 'स्वतंत्रते भगवती' ही स्वातंत्र्यदेवतेची प्रार्थना अटलजीनाही अवगत होती.

ज्येष्ठ कवी कुसुमाग्रजांचे तर ते नुसते चाहते नव्हते तर त्यांच्या अनेक कविता त्यांना मुखोद्गत होत्या. इतकेच काय तर कुसुमाग्रजांच्या चार-पाच कवितांचा त्यांनी हिंदीत अनुवाद केला होता. त्यामध्ये 'गर्जा जयजयकार क्रांतीचा' ह्या कवितेचा समावेश होता. ही कविता त्यांनी अनेक कवी, कार्यकर्ते आणि चाहत्यांना अनेकदा ऐकविली. कवितांच्या, संगीताच्या मैफिली त्यांना आवडायच्या पण वेळेअभावी ते अशा ठिकाणी जाऊ शकत नव्हते. पंडित भीमसेन जोशी हे त्यांचे अत्यंत आवडते गायक होते. अनेकदा पुण्यात आल्यावर ते वेळात वेळ काढून भीमसेनना भेटायचे. ते पंतप्रधान झाल्यावर एकदा भीमसेनजी दिल्लीला गेले होते त्यावेळी वाजपेयींना भेटायला गेले. तेव्हा अटलजींना खूप आनंद झाला आणि पंडितजींना आग्रहाने थांबवून त्यांनी गाण्याची मैफिल जमविली. इतर वाद्ये आणि वादक येईपर्यंत तासभर गेला. तोपर्यंत पंडितजीची सरबराई केली आणि मनमोकळ्या गप्पा मारल्या.

लता मंगेशकर हे असेच दुसरे आवडते नाव. लतादीदींना ही ते मुंबई मुक्कामी आवर्जून भेटत असत. तसेच प्रसिद्ध बासरी वादक हरीप्रसाद चौरसिया आणि अमजद आली खान हे त्यांच्या आवडीचे वादक होते.

ग. दि. माडगूळकर ह्यांच्या गीत रामायणावर तर ते भलतेच खूश होते. अटलजी स्वत:च तुलसीदासजी ह्यांच्या 'रामचरितमानस'ने प्रभावित होते. त्यामुळे 'रामायण कथा' त्यांच्या आवडीचीच. गायक सुधीर फडके हेही संघ विचाराने प्रेरित होते. त्यामुळे अनेकदा बैठकीत देखील ते बाबूजींना गायचा आग्रह करीत. २००५ मध्ये गीतरामायणाचा सुवर्णमहोत्सव कार्यक्रम पुण्यात झाला त्यासाठी अटलजी मुद्दाम उपस्थित राहिले. सकाळचे

मालक-संपादक नानासाहेब परुळेकर ह्यांच्याशीही त्यांचे मित्रत्वाचे संबंध होते. त्यांच्याही घरी ते जेवायला जात. पाटावर खाली बसून जेवण्याचा आनंद घेत आणि पुरणपोळी तर त्यांना खूप आवडे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरेही त्यांचे श्रद्धा स्थान होते. अटलजींच्या हस्ते त्यांचा पुण्यभूषण पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. पु.ल. देशपांडे ह्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

विद्रोही कवी नामदेव ढासळ हेही अटलजींच्या आवडत्या कवींच्या यादीत होते. त्यांच्या कवितांवरही अटलजी खूश असत. एकदा ढसाळ केईएम रुग्णालयात असाध्य रोगाने आजारी होते. त्यावेळी अटलजी मुद्दाम मुंबईत आले आणि त्यांनी इस्पितळात जाऊन ढसाळांची भेट घेतली.

मराठी साहित्याबरोबरच मराठी नाटकांची त्यांना आवड होती. जनसंघाच्या काळात अटलजी मुंबईत आले की वेळात वेळ काढून नाटक बघायला जात. प्रभाकर पणशीकरांचे 'तो मी नव्हेच', 'अश्रूंची झाली फुले' ही, पु.लं.चे 'तुझे आहे तुजपाशी' ही नाटके त्यांनी बघितली होती.

नागपूरचे दादासेब घटाटे हे अटलजींचे खास मित्र. अनेक वर्षांपासून त्यांची मैत्री. घटाटे दिल्लीत राहत होते, पण त्यांचे घर नागपुरात होते. नागपूर येथे संघाचे मुख्यालय आल्याने वाजपेयी अनेकदा नागपूरला जात. तिथे नागपुरी वडाभात खायची त्यांना इच्छा व्हायची. मग कुणा तरी कार्यकर्त्याच्या घरी जाऊन जेवायचे. घटाटे आणि अटलजी ह्यांची खूपच गाढ मैत्री होती. गेल्या ९-१० वर्षांपासून वाजपायी आजारपणामुळे सार्वजनिक जीवनापासून दूर होते. त्यांना विस्मृतीचा विकार जडला होता. तरीही घटाटे दर आठवड्याला न चुकता अटलजींना जाऊन भेटायचे.

अटलजी जातीचे खवय्ये होते. सतत देशभर संचार असल्याने अनेक प्रदेशांचे अनेक पदार्थ त्यांना खायला आवडायचे. पण त्यातही घरी साजूक तुपातले मुगाचे लाडू, खीर, मालपुवा, खिचडी हे पदार्थ त्यांना प्यारे होते. दिल्लीतल्या प्रसिद्ध पराठेवाली गल्लीमधले पराठे अगदी रात्री उशिरा जाऊनही ते खायचे. अन्यथा जिथे जे मिळेल ते खाण्याची किंवा नाही मिळाले तरी चालेल अशी त्यांची अवस्था होती. त्यांच्या मिश्किल स्वभावाचे आणि हजरजबाबीपणा अनेक किस्से सांगितले जातात.

असा हा कुशल संघटक, हरहुन्नरी, उदारमतवादी, द्रष्टा, प्रगल्भ आणि परिपक्व नेता आज आपल्यात नाही. खरे तर ते गेली काही वर्षे जनतेपासून दूर होते पण तरीही त्यांचे जाणे हुरहूर लावून गेले.

घनदाट रात्रीच्या क्षितिजावर शुक्राच्या चांदणीचे दर्शन किती लोभस असते/ ती शुक्राची चांदणी अस्ताला गेली की हुरहूर वाटते तशीच हुरहूर आज आम जनतेच्या मनात आहे.

किती विलक्षण, दिलदार माणूस होता तो. त्यांचे भारत मातेवरचे प्रेम, त्यांची प्रखर राष्ट्रभक्ती तर सर्वश्रुतच आहे. भारताचे वर्णन करताना ते म्हणतात, 'इसका कंकर कंकर शंकर है, इसका बिंदू-बिंदू गंगाजल है ।' त्यांचा अर्ध्या शतकाहून अधिक काल राजकारणात, सार्वजनिक जीवनात व्यतीत झाला. पक्षात, केंद्र सरकारात अनेक पदे भूषविली. तीन वेळा पंतप्रधान झाले. तरीही जाताना एकच इच्छा होती लोकांनी आपल्याला 'अच्छा आदमी' म्हणावे. त्यांच्या कवितेत वाजपेयी म्हणतात,

''चाहता हूँ की बेदाग निकल जाऊँ, मेरे पश्चात लोग सिर्फ इतना ही कहे, की आदमी अच्छा था ।''

**– वैजयंती कुलकर्णी-आपटे**

भ्रमणध्वनी : ९८२००३२९२८
vaiju3@yahoo.com

**ग्रंथाली**

**रत्नाकर मतकरी**
**लिखित**
**'हे काही शब्द...'**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

रत्नाकरच्या सर्वच गीतांमध्ये एक सहजसुलभ अशी, अकृत्रिम गेयता मला आढळते. मी त्याच्या 'चुटकीचे नाटक', 'विठो रखुमाय', मुलांसाठीचे 'गाणारी मैना' या नाटकातल्या, आणि इतरही काही गाण्यांना चाली दिल्या. प्रत्येक वेळी मला हाच अनुभव येई. मी रत्नाकरला म्हणे, तुझ्या लिखाणात शब्द, ताल, लय असे काही एकत्र आलेले असतात, की त्यात गाण्याची चाल आपोआपच जुळलेली असते. त्या अर्थाने तुझ्यात एक संगीतकारच दडलेला आहे!... मी आजवर शेकडो कवींच्या रचनांना स्वरबद्ध केले आहे. त्या सर्वांच्या शब्दांना चाल लावण्यासाठी मी अगदी आतुर आणि अधीर होत असे. रत्नाकर मतकरीच्या या संग्रहातील गाणी वाचताना मी तीच अधीरता अनुभवली.

**– यशवंत देव**



# चित्रकार-कवी षांताराम पवारांच्या दृश्यकलेतून तयार झालेली माझी दृक्साक्षरता!


रंजन रघुवीर इंदुमती जोशी

**उपयोजित चित्रकलेतील कोणताही प्रकार अभिजानतेने करता येतो अशा ठाम विश्वासातून षांताराम पवार सृजनशील निर्मिती करत राहिले. दृक्साक्षरता रुजवण्यातले त्यांचे योगदान मौलिक आहे.**


चित्रकार-कवी षांताराम पवारांच्या दृश्यकला जगात वावरणे खूप कठीण आहे. सर ज. जी. उपयोजितकलेचा एक विद्यार्थी १९७० असल्यापासून ते अगदी ९ ऑगस्ट २०१८ ला त्यांचा मृत्यूनंतर देखील अभिजात उपयोजित चित्रकलेचा त्यांचा कॅनव्हास मला पकडणे अशक्यच आहे, एव्हढा तो मोठा आहे. १९७२ मध्ये विद्यार्थी म्हणून कमर्शिअल आर्ट पदविकेच्या शेवटच्या चौथ्या वर्षी 'ईलस्ट्रेशन' हा विषय घ्यावा ह्या हेतूने तयारी करीत असताना प्रा. तिरोडकर सरांनी 'ह्या विषयाचा विचार सोडून दे कारण त्यात मी कच्चा असून फुकट वर्ष घालवशील' हा प्रेमळ सल्ला दिला. मी तो निमूटपणे मानला व पदविका मेरीटमध्ये पूर्ण केली. सर ज.जी. उपयोजित कला संस्थेतच फेलोशिप आणि सहअधिव्याख्याता अशी पुढील एकूण पाच वर्षे पवार सरांच्या सहवासात गेली. ह्या काळात माझी भिंती पलीकडची दृक्साक्षरता शाळा सुरू झाली. पुढे आम्हा दोघांचा सर १९७५ व मी१९७७ नंतर सर ज. जी. उपयोजित कला संस्थेतून बाहेर व्यवसायिक जगात प्रवेश झाल्याने पुन्हा नव्याने पवार सर एक तत्त्वनिष्ठ व्यवसायिक म्हणून अनुभवण्यास मिळाले. मला घरची कलेची पार्श्वभूमी असून देखील जसे वडील आणि भाऊ, बहीण सर ज.जी. कला शाळेच्या विविध शाखेतील पदविकाधारक असताना मी ईलस्ट्रेशन या विषयात कच्चा राहिल्याची खंत मनात होतीच. मानवी शरीराच्या अवयवांचे योग्य चित्ररेखाटन हे ईलस्ट्रेशनमध्ये अपेक्षित असते. पवारसरांनी येथेच रेषा म्हणजे काय? त्यास अर्थ देणे म्हणजे काय? आणि तो दिलेला अर्थ दुसऱ्यास कळतो का?, हे ज्यास जमते तो देखील ईलस्ट्रेशनमध्ये प्रगती करू शकतो. अर्थात वरील नमूद केलेले अचूकपणे मानवी शरीर अवयव चित्ररेखाटन हे महत्वाचे आहेच. दृक्साक्षरतेचा हा पहिला पवार सरांनी दिलेला धडा मला पुढील चार दशकेच्या व्यावसायिक उपयोजित चित्रकार म्हणून खूप आत्मविश्वास देणारा व मार्गदर्शक ठरला.


पवार सरांनी उपयोजित चित्रकलेचा मार्ग स्वीकारल्याने अनेक अभिजात चित्रकार त्यांना दोष देत. आपल्याकडे दुर्दैवाने दृश्य कलेत देखील जातीयता मुरलेली आहे. पवार सर ठणकावून सांगत की माझे मुखपृष्ठ हे पेंटीगच असते. उपयोजित चित्रकलेतील कोणताही प्रकार अभिजाततेने करता येतो व त्यास अभिजात कलेची जाणीव परिपक्व असणे गरजेचे आहे. त्यांचे म्हणणे माझी कला काही लाख लोकांपर्यंत पोहचते जेव्हा ती मुद्रितं होऊन विविध माध्यमातून प्रसारित होते. त्यांनी केलेले उपयोजित चित्रकलेतील अनेक प्रयोग व्यवसायिकांना पसंत पडत. ह्या प्रक्रियेतून आज सर्वांना परिचित 'पवार स्कूल ऑफ व्हिज्युअल थॉट' विकसित झाला आणि तो त्यांच्या अनेक व्यवसायात नावाजलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या कामातून तपासता येतो. 'पवार स्कूल ऑफ व्हिज्युअल थॉट' **म्हणजेच अभिजात उपयोजित चित्रकलेचा नवीन प्रकार त्यांनी अधोरेखित केला.** येथे त्यांच्या कामातून काही प्रत्यक्ष उदाहरणातून मी हे मांडण्याचा प्रयत्न करतो व त्यातील मला उमजलेले दृक मर्म सर्वसामान्यांना कसे समजेल हे सांगण्याचा प्रयत्न करतो.


पवार सर नेहमीच कलेतील अभिजातता सर्वसामान्यांपर्यंत सोप्या पद्धतीने कायम नेण्याचा आग्रह करीत. आमच्याशी अनेकदा विचार संवादातून सर्वसामान्यांना लगेच आपलेसे करत पण चित्रकलाही डोळ्यांनी समजून घेत त्याचा अर्थ-आस्वाद करून घ्यावा लागतो. त्यातून अभिजातता तर दूरच राहते. त्यांचा हा दृष्टिकोन! मला त्यांनी दिलेला पहिला मंत्र म्हणजे 'तू दिलेल्या रेषेचा अर्थ सर्वसामान्यांना कळतो का?' जर ही रेषा प्रभावीपणे आविष्कार करणारी असेल तर आपण पवारसरांच्या अभिजात उपयोजित चित्रकलेच्या प्रांतातून मार्गक्रमण सुरू केले समजा. पुढील उदाहरण ते स्पष्ट करेल. खालील नाटकाची जाहिरात मी पुढीलप्रमाणे दृक् साक्षरता पद्धतीने समजून घेतली.




सोबत त्यांनी नव्याने संकल्पिलेल्या या लेखाचित्रातील सुलेखन बिंदू व त्यांची स्थाने शोधताना द्विमितीय अवकाशाचे विभाजन नुसते पहिले तरी ते एक अभिजात बिंदू चित्र वाटू लागते. अक्षरांच्या गाठी वळणे यांत्रिक न वाटता सहज व आपल्याच वाटू लागतात. ह्या शिवाय


















विचार प्रसारण हा उपयोजित हेतू देखील वाचनप्रक्रिया सुकर होताना जाणवते. येथे काळ्या रंगातून दाखवत असून ते अधिक स्पष्टपणे पाहता येते.


पुढील उदाहरण खूपच बोलके वाटेल असे आहे. सुप्रसिद्ध लेखक दया पवार ह्यांच्या कवितेचे पवार सरांनी केलेले आशयचित्र












माझ्या जन्मामुळे कोणत्याही दिशेला तारा निखळला नाही, किंवा मला सूर्यबिंब फळासारखे वाटले नाही. जमिनीवर पाय ठेवूनच मी चालू लागलो. कळू लागले तेव्हापासून वास्तवतेच्या दाहक चटक्यांनी होरपळलो. भोवताली पसरलेला समृद्ध निसर्ग काट्यासारखा बोचू लागला. मला एकही निसर्ग-कविता लिहिता आली नाही त्याचे नेमके कारण हेच असावे. मराठी कवींनी आपल्या कवितांमधून चितारलेला निसर्ग केव्हाच मनाला रिझवू शकला नाही. या देशातील जातिजातींची मडक्यांची उतरंड, नुसती श्रमाची विभागणी नाही तर श्रमिकांची विभागणी. एक जात नेमकी दुसऱ्या जातीच्या तोंडावर बसलेली. त्यामुळे गुदमरलेली अवस्था. आपण तर अगदी तळचे मडके. त्यातही रांडकीचं रांड प्वार. पाणलोटानं कचरा किनाऱ्याला लोटावा तसं आपलं आयुष्य.

दया पवार











ज्यातून कविता वाचत असताना दोन शब्दांत असलेल्या अवकाशातून ओघळणारे अश्रू. (काहींच्या मते शुक्रजंतू कारण जन्माविषयी असल्याने) पानाच्या देठाला दया पवार ही लेखाचित्रातील अक्षरे. पुढील सरांच्या काही कामातील अशीच दृश्य विचार करण्यास लावणारी अभिजात उपयोजित म्हणजेच 'कम्युनिकेट' करणारी उदाहरणे येथे मर्यादित रुपात माडण्याचा हा प्रयत्न :






ही चित्रे अक्षरांचे चित्रातील रुपांतर कसे होऊ शकते ते दाखवणारी आहे. गंमत म्हणजे आपण कुणीही वास्तविक असे रेखाटू शकतो परंतु सृजनशीलता आणि अभिजातता विकसित केली तर असे काम होऊ












शकते. पुढील काम प्रत्यक्ष ग्रंथाली वाचक चळवळ ह्याची मूळ संकल्पना अचूकपणे व्यक्त करणारी आहे.


वरील चित्र 'महाराष्ट्र फाउंडेशन' ह्या सुप्रसिद्ध संस्थेचे बोध चिन्ह 'म' अक्षर एका रेषेतून जणू वारकरी वारीला निघालेल्या मराठी संस्कृतीचे सुंदरआणि वैश्विक गुणवत्ता असलेले दर्शन घडवते. जरी तुम्हाला'म' अक्षर नाही समजले तरी रेषेची गती व लय अनुभवता येतो.

खालील चित्र मला निव्वळ अर्ध्या तासातील दिलेले ही प्रात्यक्षिक आहेत. ती आज दोन दशके होऊन देखील ताजीच वाटतात.











मागील पानावरील खांद्यावर पावा घेतलेला माणूस हे चित्र तसेच वरील चित्र फुलांच्या-पानांच्या व इंद्रधनूच्या वातावरणातील हवेत विहार करणारा माणूस, मला नेहमीच त्यांचे जीवन प्रतिबिंब वाटत आले आहे. थोर साहित्यिक वसंत सबनीस 'किशोर मासिकाचे' संपादक असताना पवार सरांचे ते मित्र असल्याने त्यांना ठाऊक होते की जर ह्या कलाकाराला व्यक्त करण्यास मुक्तपणा दिला तर असे काहीतरी नकीच मिळेल आणि सरकारी मालकीचे मासिक असून देखील सरांना सर्वसामान्यांना अभिजात देण्याच्या इच्छित विचारांची पूर्तता होईल.

वरील उजवीकडील एक नमुना. हे मुखपृष्ठ वसंत दावतर संपादित 'आलोचना' मासिकाचे असून पवारसरांनी २७ वर्षे ह्या शब्दाच्या विविध छटा त्यांच्या अभिजात उपयोजित कलेतून मांडल्या. कदाचित हा एक रेकोर्ड असावा. खरं तर अशा पद्धतीने पवार सरांचे चित्र विश्व मांडत बसलो तर मोठा ग्रंथच होईल. अर्थात ते देखील माझे एक स्वप्न आहेच. परंतु लेख आवरता घेताना माझ्या वरील चित्रकलेचा त्यांचा प्रभाव थोडक्यात मांडून मी दृक्साक्षर झालो हे कृतज्ञतापूर्वक मांडून त्यांचे स्मरण करतो.





आम्ही त्यांना कधीच कॉपी केले नाही परंतु आपापल्या कुवतीनुसार विकसित होत गेलो. माझी काही नमुना चित्रे :१९७४ मध्ये राज्यपुरस्कार प्राप्त पोस्टर डिझाईन. वरील दोन मुखपृष्ठे पवार सरांना आवडलेली १९७२ मध्ये केलेली.

जर्मन देशातील प्रसिद्ध मासिकाच्या मुखपृष्ठावर माझे कार्टून प्रकाशित झाले हा अनपेक्षित सन्मान होता. 'ग्रंथाली' प्रकाशित 'दीपस्तंभ' ह्या मी व दीपक घारे संपादित पुस्तकातून आम्ही पवारसरांचा जीवनपट मांडण्याचा प्रयत्न केला आहे तो मुळातून जरूर वाचावा.










**- रंजन रघुवीर इंदुमती जोशी**
भ्रमणध्वनी : ९९६९५३०९४२
joranjanvid@gmail.com

# हायकूऽऽऽ तू आलास? की हा भास?

**प्रतिभा सराफ**

**गतवर्षी २ सप्टेंबर रोजी कवयित्री शिरीष पै यांनी आपला निरोप घेतला.
शेवटच्या दिवसांतही त्यांनी आपली लेखणी खाली ठेवली नाही.
छोट्याशा हायकूतून निसर्गाची नि आयुष्याची कितीतरी स्पंदने त्यांनी रेखाटली.**

**''मी** 'हायकू' हा काव्यप्रकार लिहावयाला सुरुवात केली त्याला आता पंचवीसाहून अधिक वर्षे झाली. पण त्या काव्यप्रकाराची माझ्या मनातली गोडी अजूनही गेलेली नाही. कदाचित 'फक्त हायकू' हा माझा हायकू काव्यसंग्रह शेवटचाच असेल कारण माझे आता वय झाले! मी नव्वदीच्या जवळ आले आहे. आज महाराष्ट्रात 'हायकू' हा काव्यप्रकार लोकप्रिय झाला आहे. अनेक हायकूकार निर्माण झाले आहेत. अनेक हायकूकारांच्या हायकूसंग्रहांना मीच प्रस्तावना लिहिल्या आहेत. मला आनंद एकाच गोष्टीचा वाटतो की मी महाराष्ट्राला 'हायकू'ची देणगी दिली!''

डिंपल पब्लिकेशनने १६ ऑगस्ट २०१६ रोजी प्रकाशित केलेल्या 'फक्त हायकू' या हायकू संग्रहातील ज्येष्ठ साहित्यिक शिरीष पै यांचे हे मनोगत, अनेक पैलू अधोरेखित करणारे!

कवितासंग्रह, कथासंग्रह, कादंबरी, बालसाहित्य, नाटके, ललितलेखसंग्रह, अनुवादित साहित्य, व्यक्तिचित्रसंग्रह, प्रवासवर्णन आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे हायकूसंग्रह, अशी विपुल, दर्जेदार साहित्यसंपदा त्यांच्या नावावर जमा आहे. या सर्व संग्रहांसाठी त्यांना महाराष्ट्र राज्य शासनाच्या पुरस्कारासहित अनेक पुरस्कार लाभले आहेत. त्यांच्या प्रदीर्घ साहित्य सेवेसाठीही पुरस्कार लाभले आहेत, त्यात महाराष्ट्र साहित्य परिषदेचा महत्त्वाचा पुरस्कार आहे.

प्र. के. अत्रे म्हणजे आचार्य अत्रे यांच्या ज्येष्ठ कन्या, शिरीष पै! वयाच्या तेविसाव्या वर्षी 'नवयुग'मध्ये त्यांनी नोकरी करायला सुरुवात केली. त्यानंतर काही काळ 'नवयुग'चे सहकारी संपादकपद सांभाळले. दै. 'मराठा'च्या संपादनाची जबाबदारी आचार्य अत्रे गेल्यावर शिरीष पै यांनी स्वीकारली. 'संयुक्त महाराष्ट्र' चळवळीतील त्यांचा सहभाग महत्त्वाचा होता. राजकीय, सामाजिक जाणिवांवर जरी त्यांनी खूप लेखन केले तरी निरागस मनाच्या शिरीष पै यांनी निसर्गातील सर्व कोमल, आकर्षक रंगछटांना तरल चित्रमय शब्दरूप दिलेले आहे.

उडत जाताना बगळ्यानं
किंचित स्पर्श केला पाण्याला
उठलेला तरंग वाढतच गेला

नवोदित लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्या नेहमीच



प्रयत्नशील राहिल्या. अगदी 'नवयुग' या दैनिकासाठी त्यांनी काव्यस्पर्धेचे वगैरे आयोजन केले होते. अगदी तेव्हापासून शेवटपर्यंत त्यांनी आपल्या जवळ आलेल्या साहित्यिकाला कधीही विन्मुख पाठवले नाही. प्रत्येकाबद्दल त्या कौतुकाने बोलायच्या. आदर करायच्या आणि प्रेमाने त्यांना प्रस्तावनाही लिहून द्यायच्या.

शिरीष पै यांच्या साहित्यिक वाटचालीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती वयाच्या नवव्या वर्षी. त्यांची पहिली कथा चौदाव्या वर्षी छापून आली. त्यांच्या वडिलांनी त्यांना लेखनासाठी नेहमीच प्रोत्साहन दिले. जपानी हायकूकार बोशो यांनी आपल्या शिष्यांना सांगितले की मरेपर्यंत रोज एक हायकू लिहिला पाहिजे! त्याप्रमाणे त्यांच्या अखेरच्या दिवसांपर्यंत त्यांचे लेखन अव्याहत चालू राहिले.


शिरीष पै यांनी तरुण वयात प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रोत्साहनामुळे लिहिलेल्या, 'लालन बैरागीण' या कादंबरीला, त्यांनीच प्रस्तावना दिली. त्यातील एक वाक्य फक्त उद्धृत करते– ''लालन बैरागिणीचे चरित्र वाचताना साध्या सोप्या, बाळबोध वाक्यचरनेने प्रत्येक घटना थोडक्यात पण चटकदार रीतीने सांगणाऱ्या चि. शिरीष पै हिचे लेखनकौशल्य वाचकांना माना डोलावयास लावेल, असे मला वाटते.''

याच कादंबरीच्या संदर्भात रणजित देसाई यांनी शिरीष पै यांना पत्र लिहिले, ज्यातील एक वाक्य अधोरेखित करावेच लागेल.

''मला 'स्वामी' लिहिण्याची प्रेरणा 'लालन बैरागीण'ने दिली.''

शिरीष पै यांना त्यांच्या साहित्यप्रवासात अनेक पत्रे आली. चाहत्यांनी भरभरून कौतुक केले, प्रेम दिले.

शिरीष पै पुण्याला शिकत होत्या. तेव्हा 'रोहिणी' या प्रसिद्ध मासिकाचे संपादक श्री.म. माटे यांनी १९४८ सालच्या दिवाळी अंकासाठी त्यांना आचार्य अत्रेंवर लेख लिहावयास सांगितला, त्याचे नाव 'आमचे पप्पा'. १९५८ साली आचार्य अत्रे यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने शिरीष पै यांनी त्यांच्या वडिलांवर चार ठिकाणी ललित लेख लिहिले. त्यानंतर मात्र त्यांनी अनेक व्यक्तिचित्रणे साकारली. 'हाती शिल्लक' या व्यक्तिचित्रणाच्या पुस्तकातील मनोगतात शिरीष पै यांनी लिहिलंय,




''संपूर्ण व्यक्ती लेखकाच्या हाती कधीच लागत नाही आणि जेवढी सापडते, ती तरी समग्रतेने कुठे समजावून देता येते?''

माणसांचा स्वभाव टिपण्याचे कसब त्यांच्या कथांमधून, कवितांमधूनही दिसून येते. या संदर्भातील माझा एक आवडता हायकू.

ओरडून बोलतोय तो
ह्याचा अर्थ असा नाही
की सत्य सांगतोय तो!

शिरीष पै यांना समकालीन कविता वाचायला आवडायची. काही प्रकाशन संस्थांमध्ये काव्यसंग्रह प्रसिद्ध करावे की नाही? कोणत्या कविता घ्याव्या, त्याचा क्रम कोणता असावा; याबद्दलची सर्व मतं, त्या प्रांजळपणे सांगायच्या. भाऊ पाध्ये यांचे 'वासूनाका' हे पुस्तक आचार्य अत्रे यांना आवडले नाही तरीही हे पुस्तक आपल्याला आवडले, हे शिरीष पै यांनी जाहीरपणे सांगितले, ही कौतुकास्पद गोष्ट आहे.

त्यांनी 'सुरेश भट ह्यांच्या निवडक कविता' या पुस्तकाचे संपादन तर केलेच पण त्याला अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावनाही लिहिली. विजया संगवई यांच्यासोबत शिरीष पै यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतरची निवडक प्रातिनिधिक स्त्री कवितांचे संकलन, संपादन केले. त्या 'आव्हान' या पुस्तकातील शिरीष पै यांच्या ओळी-

धनसंपत्ती कीर्तीची
मज हाव न उरली आता
मी जगणे सारे माझे
कवितेला अर्पण केले.

ही समर्पितपणाची भावना त्यांच्या शब्दातून जशी दिसायची तशी वागण्या-बोलण्यातूनही जाणवायची. ओशो रजनीशांच्या तत्त्वज्ञानाकडेही त्या ओढल्या गेल्या. त्यांनी ओशोंचे शिष्यत्वही पत्करले होते.

शिरीष पै यांच्या कथांमध्ये ललित आणि काव्य सहजपणे येत राहते. त्यामुळे निव्वळ कथानकापलीकडे जाऊन साहित्यकृतीची व्यापकताही लक्षात येण्याजोगी आहे. 'कमलपत्र' या संग्रहातील 'गाणारी मैना' कथेतील एक उतारा : सूर्य मावळत होता. तो तांबूस केशरी तेजोगोल म्हणता म्हणता निळ्या अथांग समुद्रात बुडत गेला. आणि रंगाचा विलक्षण आकर्षक चित्रपट समोरच्या क्षितिजावरून भराभर सरकू लागला. अबोली, केशरी, तांबडे, जांभळे, करडे-रंगामागे रंग उसळत होते. एकमेकांत विलीन होत होते.

सतत माणसांमध्ये वावरत असलेल्या शिरीष पै यांना, खूपदा माणसांचे वाईट अनुभवही आले म्हणूनच त्यांनी लिहिले - 'वाया जाण्याकरिताच घ्यायचे असतात असे काही अनुभव!'

हा जन्म मानवाचा
सुख फारसे न हाती
जगण्यात अर्थ तरीही
शिकले जगून हे मी

भरभरून जगणाऱ्या शिरीष पै यांनी 'खाण्याच्या गोष्टी' नावाचे पुस्तकही लिहिले. एखादा पदार्थ कसा प्रसिद्ध झाला किंवा तो बनवायची कृती वगैरे. त्या म्हणतात, ''खाण्याविषयीच्या चुटक्यातूनही आपल्या जगण्यातली सुखदु:खे डोकावत राहिली. ते चुटके म्हणजेच 'खायच्या गोष्टी'.''

'हायकू' हा जपानी काव्यप्रकार. एखाद्या गोष्टीचा अनुभव घेणे आणि एखादा क्षण टिपणे, त्याला शब्दबद्ध करणे! हायकूत मुख्यत्वे निसर्गाशी निगडित काही असतेच! नुसते वैयक्तिक भावना, वर्णनात्मक, भाषिक अलंकारत्मक वा बौद्धिक अशा गोष्टी फारशा आढळत नाहीत मात्र रचनात्मकता असते. शिरीष पै यांनी 'नवे हायकू' संग्रहात 'निसर्गापलीकडे जाऊन हायकू का लिहू नये?' असे मत मांडले आहे.

रवींद्रनाथ टागोर, हे भारतातील पहिले हायकूकार. मग उत्तर भारत, गुजरात येथेही हायकूकार होते. पण मराठीत 'हायकू' लिहिण्याचे आणि प्रयत्नपूर्वक रुजविण्याचे काम मात्र शिरीष पै यांनीच केले आहे. त्यांच्यामुळे काव्यविश्वाला 'हायकू'ची अनमोल

देणगी लाभली आहे.

हायकूमध्ये पहिल्या दोन ओळीत काही कल्पना मांडणे आणि तिसऱ्या ओळीत काहीतरी वेगळेच सांगणे म्हणजे अक्षरश: कलाटणी देणे, हे काम सोपे नाही. त्यासाठी कमालीची तरलता, चिंतनशीलता, संवेदनशीलता असावी लागते, जी त्यांच्याकडे होती.

फोन केला
आवाज ऐकू आला
नव्हता त्यात जिव्हाळा

हायकू विषयीचे अनेक अभ्यासपूर्ण लेख शिरीष पै यांनी लिहिले. त्यांच्या मते – 'हायकू म्हणजे विचार नव्हे, हायकू म्हणजे चिंतन नव्हे. हायकू ही जीवनाबद्दलची सहज प्रतिक्रिया आहे.'

जपानी हायकूला मराठमोळं रूपडं दिले, तेही हायकूच्या तत्त्वाला पूर्णपणे सांभाळूनच!

हायकूऽऽऽ
तू आलास?
की हा भास?

किती हा सहज अगदी हृदयातून निघालेला, हृदयाला भिडणारा! इथे मला त्यांच्या कवितेच्या दोन ओळी देण्याचा मोह होतोय.

नियतीचा सहज स्वीकार हृदय देणारेच करतात
अश्रूंच्या प्रत्येक थेंबातून त्यांची गाणी फुलतात

शिरीष पै यांच्या सत्तर वर्षांहून अधिक दीर्घ साहित्य प्रवासात, तीसेक वर्षे त्या हायकू लिहीत होत्या. या दरम्यान अनेक मासिकांनी 'हायकू विशेषांक' काढले. सप्टेंबर २००३ ला कवितेला पूर्णपणे प्राधान्य देणाऱ्या 'कुसुमाकर' या मासिकाने हायकू विशेषांक काढला, जो काव्यरसिकांसाठी अनमोल ठेवा आहे. या मासिकामध्ये कविता, हायकू यांच्याबरोबरीने शिरीष पै यांची कवींचे कौतुक करणारी पत्रे वाचायला मिळायची.

साहित्यक्षेत्रात पूर्णत्वाने रमलेल्या शिरीष पै यांना शेवटच्या काळात शारीरिक थकवा जाणवू लागला होता. परंतु त्यांचे मन मात्र नवनिर्मितीत पूर्णपणे गढलेले असायचे.

कष्टात राबवताना
थकवा जरी न आला
वय हे आता असे की
निरूपाय जाहले मी

शिरीष पै या दिग्गज, प्रतिभावान, लेखिकेने इतके लिहून ठेवले आहे की त्यांच्याविषयी मी काय लिहिणार? प्रत्येक कवीच्या अंतर्मनातील भावना, शिरीष पै यांनी आपल्या साध्या-सरळ काव्यपंक्तींतून व्यक्त केली आहे, त्या ओळींनी या लेखाचा शेवट करते–

मी लिहीत असता कविता
जर मृत्यू मजला आला
मी धन्य मला समजेन

**– प्रतिभा सराफ**
भ्रमणध्वनी : ९८३३०५६७९५, ९८९२५३२७९५
pratibha.saraph@yahoo.co.in

**अक्षरगंध दिवाळी २०१८**
**श्रीशब्दरत्न प्रकाशन प्रकाशित**
**एक वाचनीय व संग्राह्य दिवाळी अंक**
**पृष्ठे २००+**
**मूल्य रु.१७०/-**
**संपादक – मधुवंती सप्रे**

**महाराष्ट्राच्या थोर कर्तृत्व शालिनी स्त्रिया –**
**शकुंतला परांजपे, ज्योत्स्ना भोळे, सुधा जोशी, साधना आमटे**
लेखन - दीपक घारे, वंदना खांडेकर, मधुवंती सप्रे, मंगल नांदुर्डीकर, डॉ. अनघा आमटे

**संगीत, नृत्य, नाट्य –**
**डॉ. प्रभा अत्रे, मीना खडीकर, मधु कांबीकर**
लेखन - मुकुंद संगोराम, डॉ. विकास कशाळकर, अतींद्र सरवडीकर, गौतम राजाध्यक्ष, मंजिरी वैद्य

**शंभरीतले गुणवंत – ग.दि.मा., पु.ल., सुधीर फडके**
लेखन - राहुल रानडे, वसंत सबनीस, विद्या माडगूळकर, आनंद माडगूळकर, आनंद अंतरकर

**नाटककार, चित्रपट - लेखक, दिग्दर्शक - विश्राम बेडेकर**
लेखन - विश्राम बेडेकर, रामदास भटकळ, जयंत सावरकर, दत्ता भट (अनुराधा भट)

**ज्ञानदेवांचं गीतचरित्र**

**कविता विभाग - रंग कवितेचे**
नामवंतांच्या कविता आणि प्रकाश भातम्ब्रेकर - हिंदी अनुवादीत कविता

**उद्बोधक लेखमाला**
प्रा. सुधीर खांडेकर, सुरेश खरे, दत्तप्रसाद दाभोळकर, संदीप दहिसरकर, वैदेही देशपांडे, डॉ. मंजिरी निंबकर

**वाचन संस्कृती** – अभय जोशी
पुंडलीक पै, पद्माकर शिरवाडकर, सुनील मेहता, रवींद्रनाथ जोशी, अशोख कोठावळे, गिरीश दळवी, इत्यादी

ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून सर्व बुकडेपोमधे उपलब्ध. मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक
एकही जाहिरात नसलेला, साहित्य, कला विषयक भरगच्च लेखांनी परिपूर्ण असा अंक
संपर्क - shreeshabdaratna@yahoo.com / ९८२११७५३४९

द्वारा – ए-६०३, शुभम सोसायटी, जीवन विकास केंद्र मार्ग, विलेपार्ले पूर्व, मुंबई - ४०००५७

प्रिय रसिक वाचक,
सोशल मीडियाच्या काळात स्क्रोल डाऊन होणाऱ्या बोटावर संवाद संकुचित होऊ लागला. आणि संवादाचं सशक्त माध्यम असणारी पत्रं काळाच्या ओघात हरवू लागली आहेत.

चंद तस्वीर-ए-बुताँ चंद हसीनों के खुतूत
बाद मरने के मिरे घर से ये सामाँ निकला

असं म्हणत सरत चाललेली एक पिढी या बदलाची मूक साक्षीदार आहे. त्या पिढीत 'आईचं पत्र हरवलं' सारख्या खेळातही पत्रं केंद्रस्थानी होती. पत्रांनीच लेखनाची आणि वाचनाचीही गोडी रुजवण्यात हातभार लावला होता. या माध्यमानं व्यक्तिगत संवादालाही साहित्याचा आयाम दिला होता. त्यातून पत्ररूपी साहित्याची नवी परंपरा निर्माण झाली. या परंपरेची उजळणी आमच्या अंकातून करण्याचा मानस आहे.
या अंकात मान्यवर लेखक आपल्या पत्रव्यवहाराच्या आठवणींना उजाळा देत आहेत. विविध क्षेत्रातील मान्यवरांचा भावपूर्ण पत्रव्यवहारही या अंकात पाहायला मिळेल. आणि काळाचा एक पट उलगडणारी विलक्षण पत्रेही वाचायला मिळतील.

नक्की वाचा आमचा **मेहता मराठी ग्रंथजगत** (दिवाळी अंक २०१८) **टपाल विशेषांक...**

सहभाग-

**विश्वास पाटील**, राजन गवस, उमा कुलकर्णी, **डॉ. सुनीलकुमार लवटे**, राजू परुळेकर, **दादासाहेब मोरे**, स्वाती चांदोरकर, **यशोधरा काटकर**, मृणालिनी सावंत, **मधुमती शिंदे**, **श्याम भुर्के**, **प्रकाश निलाखे**, शशिकांत काळे, मोहना जोगळेकर
आणि
मान्यवरांची **दुर्मिळ पत्रे**

२०१८ पोस्ट कार्ड POST CARD

मेहता मराठी ग्रंथजगत
(दिवाळी अंक २०१८)
टपाल विशेषांक
१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड
टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी,
पुणे ३०. फोन -(०२०) २४४७६९२४
mmgj@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com

मेहता पब्लिशिंग हाऊस
Email: sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse
Mehta Books
950+ Marathi books Available as e-Book
WhatsApp us on 9420594665
Available on :
Printed book - Flipkart and amazon
E-book - play.google.com/store/books
www.amazon.in

# कर्मवीरांचे शैक्षणिक योगदान

**डॉ. द.ता. भोसले**

**कौशल्याचा विकास आणि वर्तनात परिवर्तन म्हणजे शिक्षण ही नवी धारणा त्यांनी समाजात रुजविली. केवळ अक्षरओळख म्हणजे शिक्षण नव्हे, तर जीवनाला श्रीमंत करणाऱ्या चिरंतन मूल्यांचे संस्कार म्हणजे शिक्षण हे स्वप्न समोर ठेवून त्यांनी ग्रामीण मुलांना घडविले.**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याचा विचार करताना न कळत मला वंदनीय अशा शिवछत्रपतींचे स्मरण होते. या दोन महापुरुषांच्या काळामध्ये तीनशे वर्षांचे अंतर असले तरी दोघांच्या जीवनकार्यात बऱ्याच प्रमाणात मला साम्य जाणवते. या दोघांच्याही कार्यामध्ये सामान्य माणूस (रयत) केंद्रस्थानी होता. या दोघांचेही ध्येय होते सामान्य माणसाला मुक्त करणे हे. महाराजांनी रयतेला पारतंत्र्यातून मुक्त केले; कर्मवीरांनी रयतेला अज्ञानातून मुक्त केले. महाराजांनी रयतेला नाना प्रकारच्या बंधने आणि गुलामगिरीतून मुक्त केले; तर कर्मवीरांनी आर्थिक विषमता, वर्गवर्चस्व जातिश्रेष्ठता आणि धार्मिक विषमता यांच्या गुलामगिरीतून रयतेला मुक्त करण्याचा ध्यास घेतला. शिवछत्रपतींनी रयतेचा गारठून गेलेला पराक्रम जागृत केला; तर कर्मवीरांनी रयतेचे झोपी गेलेले 'आत्मबल' जागृत केले. शिवछत्रपतींनी एकाच वेळी चार शत्रूंशी झुंज दिली; कर्मवीर भाऊरावांना सुद्धा चार शत्रूशी झुंज घ्यावी लागली. धर्मसत्ता, ज्ञानसत्ता, अर्थसत्ता आणि अधिकारसत्ता असलेल्या वरिष्ठ वर्गातील मंडळीशी लढावे लागले होते. अज्ञान, दैववाद, शोषण आणि कर्मकांड या विरुद्ध 'एल्गार' पुकारावा लागला होता. आणि दारिद्र्य नावाच्या अदृश्य शत्रूविरुद्ध त्यांना दोन हात करावे लागले होते. दोघांतील हे साम्य इथेच संपत नाही. शिवप्रभूंनी इथल्या निरक्षर शेतकऱ्याच्या एका हातात नांगर दिला आणि दुसऱ्या हातात तलवार दिली. त्याचप्रमाणे कर्मवीरांनी सुद्धा ग्रामीण विद्यार्थ्यांच्या एका हातात नांगर-पागर दिली. खडी फोडण्यासाठी हातोडा दिला आणि दुसऱ्या हातात लेखणी दिली. शिवछत्रपतींनी पूर्जा-अर्चा आणि कर्मकांडात अडकलेल्या धर्माचे राष्ट्रधर्मात रूपांतर केले; तर कर्मवीरांनी स्वधर्माचे मानवताधर्मात रूपांतर केले. महाराजांनी सामान्य माणसाच्या जगण्याला अर्थ प्राप्त करून दिला; त्यांच्या जगण्याला आधार दिला. दिशा दिली; कर्मवीरांनी देखील सामान्याच्या विस्कटलेल्या आणि काजळलेल्या जगण्याला प्रकाशाच्या वाटेवर आणले. मरणाचे खाद्य म्हणजे



आपले जीवन नव्हे हे रयतेला दाखवून दिले. भूक, भय आणि भोग यांचे समाधान म्हणजे आयुष्य नव्हे तर श्रम, सेवा आणि समर्पणात आयुष्याची श्रीमंती असते हे या दोघांनीही दाखवून दिले. शिवछत्रपतींनी गडकिल्ल्यांच्या रूपाने स्वराज्याची शक्तिकेंद्रे उभी केली; तर कर्मवीरांनी वसतिगृह आणि शाळांच्या रूपाने व्यक्तीच्या आत्मसामर्थ्य नि आत्मविकासाची ऊर्जाकेंद्रे निर्माण केली. महाराजांनी नवा माणूस घडविला. त्याला त्याच्या आत्मशक्तीची जाणीव करून दिली; त्याचप्रमाणे कर्मवीरांनी देखील एक नवा माणूस घडविला व त्याला त्याच्या आत्मविकासाची जाणीव करून दिली आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट अशी की, महाराजांच्या महानिर्वाणानंतर इथल्या रयतेने सत्तावीस वर्षे बलाढ्य मोगलांशी झुंज दिली; त्याचप्रमाणे कर्मवीरांच्या निर्वाणानंतर त्यांच्या सुसंस्कारी सेवाभावी शिष्यांनी या संस्थेला भारताच्या शैक्षणिक नकाशावर वलयांकित केले आहे. संस्थेचा निर्माता स्वर्गवासी झाल्यावर संस्थेलाही लवकरच स्वर्गवास घडतो, अशी अनेक उदाहरणे आपला नेहमी पाहतो. या पार्श्वभूमीवर संस्थेचे हे कार्य आणि कर्मवीरांची थोरवी अद्वितीय म्हणावी लागेल.

कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वाचा अनेकांनी अनेक प्रकारे परिचय करून दिलेला आहे. कुणी त्यांना म. फुल्यांचा निष्ठावंत वारकरी म्हटले. कुणी त्यांना आधुनिक शिक्षणाची कवाडे खुली करणाऱ्या आधुनिक भगीरथ म्हटले. रचनात्मक कार्याचे प्रतीक, जिद्द आणि धडाडीचे मूर्तिमंत प्रतीक, राष्ट्रीय एकात्मतेचा पुरुष आणि 'पुस्तकात न मावणारा माणूस' असेही काहींनी म्हटले आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणि कार्याचे केलेले हे वर्णन मर्मग्राही आणि उचित असले तरी भाऊरावांच्या व्यक्तिमत्त्वाने आणखी काही पैलू सांगणे आवश्यक आहे. मी यामध्ये भर घालताना असे म्हणेन की, गांधीजींचा कृतिशील अनुयायी, लाल मातीतील बलदंड पैलवान, गारठलेल्या अस्पृश्याला अंगावरचे वस्त्र देणारा दाता, उपाशी मुलांना घास भरविणारा प्रेमळ पिता. स्वत:ची धनसंपदा



उपेक्षितांसाठी उधळणारा सेवक, ताक-कण्यावर समाधान मागणारा अतिथी आणि खाऊ म्हणून मुलांना पुस्तके देणारा पालक यामधूनही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अधिक चांगले दर्शन घडते. एवढेच नव्हे तर स्वकमाईची सारी कंपनी व आपल्या पत्नीला माहेराहून मिळालेले दागिने वसतिगृहातील मुलांसाठी खर्च करण्याचे त्यांचे दातृत्व अतुलनीय होते. शिक्षणसंस्था म्हणजे कधीही न आटणारी दुभती गाय अशी धारणा असलेल्या आजच्या काळात संस्थेच्या शेतातील मूठभर भाजी आणि ओंजळभर शेंगांनाही हात न लावणारे ते नि:स्पृह व्यक्तिमत्त्व होते. नावापुरते संसारात राहूनही संसाराची अनासक्ती असणारे ते 'संसारी संत' होते. स्वत:चा संसार पायाखाली तुडवून समाजाचा संसार माथी घेऊन त्याला आकार देणारे ते शिल्पकार होते. स्वत:च्या मुलाला आपल्या संस्थेत नोकरी न देणारे ते तत्त्वनिष्ठ आणि आदर्श चारित्र्याचे प्रतीक होते. दोन धोतरे, दोन पैरणी, एक घोंगडी आणि एक काठी असा साध्या आणि संन्यस्त राहणीचा आदर्श घालून देणारे ते अनासक्त योगी होते. देणग्या मिळविताना एसटीने प्रवास करणारे, लॉजच्या निवासाचा खर्च वाचवावा म्हणून तालमीत झोपणारे, अर्थशून्य धर्माचा त्याग करून मानवता धर्माचा स्वीकार करणारे ते धर्मसुधारक होते. मुलांच्या बरोबर खडी फोडणारे, स्वच्छता करणारे व त्यातून श्रमाची थोरवी सांगणारे ते कर्मयोगी होते. अनेकदा असे वाटते की, बुद्धाची करुणा, महावीरांची अहिंसा, ख्रिस्ताचे प्रेम, फुल्यांची बंडखोर वृत्ती, सावित्रीबाईचे समर्पण, शिवछत्रपतींचे रयतप्रेम, राजर्षी शाहूंचा प्रागतिक विचार आणि सयाजीराजे यांचे विद्याप्रेम या साऱ्या अपवादात्मक गुणांचा सुंदर मिलाफ कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला आपणास दिसून येतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला व्रताचे तेज आहे. कृतीचा सुगंध आहे. सेवासमर्पणाचा ओलावा आहे आणि चारित्र्याचे आभूषण आहे. हे सारे एकाच व्यक्तिमत्त्वात सहसा दिसत नाही.

कर्मवीरांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून घेतल्यानंतर त्यांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य आणि त्यातून साधलेल्या गोष्टी याच्यावर एखादा दीर्घ लेख लिहिता येण्यासारखा असला तरी आपणाला सूत्ररूपानेच त्यांच्या कार्याचा परिचय करून घेणे योग्य वाटते.

कर्मवीरांच्या मते साऱ्या दु:खावरचा एकेमव उपाय म्हणजे शिक्षण. साऱ्या प्रश्नांचे उत्तर मिळते शिक्षणातून. समाजातल्या साऱ्या विकृतींचे निराकरण करण्याचा एकमेव उपाय म्हणजे शिक्षण. मानवी जगण्याला अर्थ देणारी गोष्ट म्हणजे शिक्षण म्हणून त्यांनी फक्त एका शिक्षणावर भर दिला आणि त्यातून सामाजिक सुधारणा केल्या. व्यक्तीचा सर्वांगीण विकास, समाजाची निकोप प्रगती आणि राष्ट्राचा अभ्युदय यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा कुठलाही पर्याय आढळत नाही. आत्मबळ, आत्मतेज आणि आत्मविकास यांना ऊर्जा पुरविण्याचे काम शिक्षण करीत असते. समाजात नांदणारी विषमता, शोषण, गुलामगिरी, दारिद्र्य यांना झुंज देण्याची ताकद शिक्षणातूनच मिळत असते. शिक्षण हे माणसाला पशुत्वाकडून देवत्वाकडे नेते. जीवनाची पूर्णता कशामध्ये आहे हे सांगते. शिक्षण हे आपल्या जगण्याला बळ पुरविते. जीवनावर प्रेम करायला शिकविते आणि आपल्या जीवन प्रवासात आपल्या पावलापुढे प्रकाश अंथरते. एवढेच नव्हे तर ते माणसाला माणसाशी जोडते आणि समाजाची नवी जडण-घडण करण्याचे कार्यही शिक्षणच करीत असते म्हणूनच कर्मवीरांनी धुळीने माखलेल्या आणि अज्ञानाने पिचलेल्या सामान्याहून सामान्य माणसाला शिक्षण मिळावे यासाठी काले (ता. कराड) येथे वसतिगृहयुक्त शाळेचा प्रारंभ केला. नंतर तो साताऱ्यामध्ये खोलवर रुजविला. त्यांच्या कार्याची एका वाक्यात माहिती द्यायची झाली तर असे म्हणता येईल की, त्यांनी मूठभर शहरापुरता असलेला शिक्षणप्रवाह खेड्यापर्यंत नेला. नव्हे शेतकऱ्याच्या झोपडीपर्यंत नेला. आपल्याप्रमाणे त्यांनी इतरांना शिक्षणप्रसाराची प्रेरणा दिली आणि शैक्षणिक क्रांतीला वाहून घेणारे अनेक कार्यकर्ते तयार केले. शाळेनेच गावाचे नेतृत्व करण्याचा प्रयोग यशस्वी करून दाखविला. कौशल्याचा विकास आणि वर्तनात परिवर्तन म्हणजे शिक्षण ही नवी धारणा त्यांनी समाजात रुजविली. केवळ अक्षरओळख म्हणजे शिक्षण नव्हे, तर जीवनाला श्रीमंत करणाऱ्या चिरंतन मूल्यांचे संस्कार म्हणजे शिक्षण हे स्वप्न समोर ठेवून त्यांनी ग्रामीण मुलांना घडविले. राजर्षी शाहू महाराजांनी एकेका जातीसाठी स्वतंत्र वसतिगृहे स्थापन करून बहुजनांच्या शिक्षणाला चालना दिली. तर त्यांच्या शिष्याने म्हणजे कर्मवीरांनी स्पृश्य-अस्पृश्य अशा सर्व जातीधर्माच्या मुलांसाठी एकच वसतिगृह सुरू केले आणि त्यातून राष्ट्रीय एकात्मता साधली. हे त्यांचे कार्य खरोखर लोकोत्तर म्हणावे लागेल. माणसाला जन्मत:च चिटकलेली जात कायद्याने नाहीशी होत नाही. धनाच्या श्रीमंतीने ती कमी होत नाही कारण धनाची श्रीमंती देहाचे सौंदर्य वाढविते, पण मनाचे सौंदर्य वाढवित नाही. माणसाला चिकटलेली जात अधिकाराने कमी होत नाही डॉ. आंबेडकरांना मिळालेली वागणूक या ठिकाणी आठवते. माणसाची जात तेव्हा जाते जेव्हा सर्व जातीजमातींची मुले एकाच ठिकाणी राहतात. एकाच चुलीवर शिजवलेले अन्न एकाच पंगतीला ताटाला ताट लावून, एक प्रकारचे अन्न एकाच वेळेला खातात आणि एकाच आडाचे पाणी एकाच भांड्याने पितात तेव्हा जात नाहीशी होते कारण ते अन्न मनाला समता आणि सहजीवनाचा घास भरवित असते. भाऊरावांची ही वसतिगृहे म्हणजे प्राचीन काळच्या ऋषीमुनींच्या आश्रमाची आठवण करून देणारा प्रयोग आहे. थोडक्यात मी असे म्हणेन की, कर्मवीरांनी शिक्षणाला समाजाच्या जवळ आणले. समाजाला मूल्यांच्या जवळ आणले. मूल्यांना

चारित्र्याच्या जवळ आणले. चारित्र्याला समाजाच्या मांगल्याशी जोडले आणि त्यातून माणसाच्या आत्मभानाचा परिघ देशहितापर्यंत विस्तारला.


या बरोबरच कर्मवीरांनी आणखी काही प्रयोग केले. कोणते प्रयोग होते ते? या प्रश्नाचे उत्तर असे की, सहजीवन, सहभोजन, सहअध्ययन आणि स्वावलंबन यांचा अवलंब करणारे वसतिगृह त्यांनी शाळेला जोडून घेतले. मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. श्रमाच्या मोबदल्यात शिक्षणाची सोय करून शिक्षणाचा पैशाशी असणारा संबंध तोडला. शासनाच्या मदतीपेक्षाही रयतेच्या मदतीवर शाळा स्थापन केल्या. गावच्या शाळेचे पालकत्व तिथल्या गावकऱ्यांकडे सोपविले. भूमीशी नाते सांगणारे शिक्षणाचे स्वरूप ठेवले. विद्यार्थ्यांचे हस्तक व मस्तक यांचा एकाच वेळी सर्वांगीण विकास होईल यावर लक्ष केंद्रित केले. शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची व संस्कारांची जोड दिली. वसतिगृहातल्या वरच्या वर्गातील मुलाने खालच्या वर्गातील मुलांचा अभ्यास घेण्याचा प्रयोग केला. आपल्या रोजच्या सांडपाण्यावर आपल्यापुरती भाजी पिकवता येते, याचा आदर्श समाजासमोर ठेवला. या साऱ्या प्रयोगांमुळे ग्रामीण भागातील मुलांना बाहेरच्या जगात लढण्याचे बळ मिळाले. आत्मशक्ती आणि आत्मविश्वास त्यांना प्राप्त झाला. त्यामुळे पढिक पांडित्याला सर्जक ज्ञानाची आणि अनुभवांची जोड मिळाली. त्यातूनच स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागातून नेतृत्व उदयाला आले. कर्मवीरांच्या या शैक्षणिक प्रयोगामुळेच राष्ट्रीय एकात्मता साधली गेली. त्यांनी दिलेल्या शिक्षणामुळेच आपले अज्ञान, आपले शोषण आणि आपली गुलामगिरी, आपले दु:ख नि दारिद्र्य पूर्वजन्माच्या पापाचे फळ नसून आपल्या अज्ञानात त्याचे मूळ आहे याची प्रखर जाणीव सामान्य रयतेला झाली.

थोडक्यात असे म्हणावेसे वाटते की, कर्मवीरांनी माणूस शब्दांशी जोडला. माणूस भूमीशी जोडला. माणूस श्रमाशी जोडला. माणूस माणसाशी जोडला. माणूस समाजाशी जोडला आणि माणूस शाश्वत मूल्यांशी जोडला. या साऱ्या गोष्टींमुळे त्यांच्या शिक्षणाला अंधार गिळून टाकणाऱ्या सूर्यप्रकाशाचे राबविले असते तर आजच्या शिक्षणाला पडलेल्या मर्यादा खूप कमी झाल्या असत्या, असा विचार मनात येतो. शिक्षणाचे एक व्यवहारी व नवे तत्त्वज्ञान निर्माण करून त्याचा वापर करणारे ते एक थोर तत्त्ववेत्ते होते, असेच म्हणावे लागेल.

**– डॉ. द.ता. भोसले**
भ्रमणध्वनी : ९४२२६४६८५५


**ग्रंथाली**

## अरुण शेवते संपादित दोन पुस्तके




गुलजार, लता मंगेशकर, उदय निरगुडकर, गिरीश कुबेर, बेगम परविन सुलताना, संदीप वासलेकर, राजीव खांडेकर, सुदेश हिंगलासपूरकर, सुशीलकुमार शिंदे, नितीन गडकरी, मनोहर पर्रीकर, निखिल वागळे, कौशिकी चक्रवर्ती, किशोर मेढे या नामवंतांनी आपल्या मनातल्या जगण्याचे संदर्भ पारदर्शीपणे मांडले आहेत.

**मूल्य १८० रु.   सवलतीत ११० रुपये**




अंबरीश मिश्र, अशोक कोठावळे, श्रीकांत बोजेवार, सचिन इटकर, किशोर कदम, मनोहर जाधव, शशिकांत सावंत, डॉ. सदानंद मोरे, हणमंतराव गायकवाड, प्रशांत गडाख, मुकेश माचकर, अनिल साबळे, माधुरी शेवते यांनी अनुभवलेले प्रांजळपणे सांगितलेले आहेत.


**मूल्य १८० रु.   सवलतीत ११० रुपये**

# मी आणि माझी कविता...

## सतीश सोळांकूरकर

**सतीश सोळांकूरकर गेली २५ वर्षे सतत कविता लिहीत आहेत. दोन तपापेक्षा जास्त काळ कवितेचा अकुंर रसरशीत ठेवणे सोपे नाही. कवितेला सांभाळून ठेवणाऱ्या सतीश सोळांकूरकर यांच्या कविमनाला ही मनस्वी दाद!**

**'प**त्रास कारण की..' हा माझा पहिला कवितासंग्रह १९९३ साली प्रकाशित झाला त्याला आता पंचवीस वर्ष पूर्ण झाली. तेव्हापासून जी कविता लिहिली गेली आणि त्या लेखनातून जो स्वत:चा आणि कविता निमिर्तीचा शोध सुरू झाला, तो मला वाटते आजही तसाच सुरू आहे. 'तिन्हीसांजेची भुलावण' हा माझा सहावा कवितासंग्रह अलीकडेच प्रकाशित झाला या संग्रहामध्येही 'पत्रास कारण की..'मधल्या कवितांचा एक अंतर्नाद झिरपताना जाणवत राहतो असे मला वाटते. 'या कवितेचा असा नाद गा लागला, कैवार घेतला तिने माझा' या भूमिकेतून मी कवितेकडे, आजवर पाहत आलो आहे.






माझे भाग्य असे की, मराठी कविता आणि साहित्य या क्षेत्रातल्या दिग्गज मंडळींशी माझा अगदी जवळून संबंध आला, त्यांच्याशी घरोबा निर्माण झाला आणि माझ्या कवितेवर योग्य असे साहित्यिक संस्कार होण्यासाठी त्याची फार मोठी मदत झाली.

माझे बालपण हे सोळांकूर नावाच्या छोट्याशया खेड्यामध्ये गेले. तो गाव, ती शेतीभाती, तिथली माणसे, रोजच्या जगण्यासाठीची त्यांची ससेहोलपट, सण-उत्सव, देणे-घेणे या सर्वांचा एक नाद माझ्या कवितेला आहे आणि तो जाणवतही राहतो. एक फॅड म्हणून सामाजिक कविता लिहिणं किंवा विषय धरून कविता लिहिणं मला कधी जमलं नाही. माझ्या अनेक कवितांमधून सामाजिक आशय पुढे येताना दिसतो पण ते तसे ठरवून झालेले नाही. नसावे. माझ्याकडून ज्या घोड्यांच्या कविता लिहिल्या गेल्या त्यामध्ये आजच्या कार्पोरेट जगाचे आणि तिथल्या शोषणाचे चित्र तीव्रपण दिसते असे वैद्य सर म्हणाले होते. ''आईच्या संदर्भातल्या तुझ्या सगळया कविता या तुझी ओळख सांगणाऱ्या तर आहेतच पण त्यामध्ये एक सामाजिक आशय स्पष्टपणे जाणवत राहतो'', असे पाडगावकर सर म्हणत असत.

माझ्या कवितेची समीक्षा करताना, ''सतीश आणि त्याची कविता मनस्वी सच्च्या कवीच्या प्रतिभेच्या मुशीतून जन्माला आल्यामुळे, आजच्या काळात अपवादानेच आढळणाऱ्या विशुद्ध काव्य जाणिवा त्याच्या कवितेतून हळूहळू मनाच्या आत्मप्रत्ययी डोहात उतरतात. तत्त्वज्ञानातील जीवनाविषयीचे गूढ प्रश्न कवितेचा विषय होतात. साक्षात्काराचा अनुभव शब्दरूपात आपसूक कवितेच्या रचनाबंधात अंतर्धान पावतो, मनाच्या गर्भगृहातून जीवनाचे शाश्वत जगण्या-मरण्याचे उत्कट क्षण कवितेची शैली घडवतात.'' - असे मत संत साहित्याचे गाढे अभ्यासक आणि समीक्षक डॉ. किशोर सानप यांनी मांडले आहे.

मी ज्या वातावरणातून पुढे आलो, घडलो आणि कदाचित बिघडलोही त्या वातावरणाचा मी देणेकरी आहे असे मला वाटते. तो सगळा म ाहौल, सतत माझ्या अवतीभोवती असतो. मला काहीतरी सांगत असतो. माझ्याकडून काहीतरी मागत असतो. या सगळ्या भोगवट्यातून माझी कविता लिहिली जात असावी असे मला वाटते. कविता जागवत जाते आणि सजगपणे जगवतही जाते असे मला वाटते आणि म्हणूनच आयुष्य भोगण्याचे बळ देते कविता, काळजातला सल सांभाळते कविता.. असे म्हणत असतानाच, आता देणेघेणे फक्त कवितेशी, नको कोणाचीही जवळीक..असेही ठामपणे म्हणावेसे वाटते. वाटत राहते.

# मी
# आणि
# माझी कविता

**तू...**

तू
जाणवत राहतेस,
निसटून जातेस कापरासारखी
मी निमूट बसतो
येऊन बिलगतेस वासरासारखी

तू ओढून घेतेस मला
मी होतो हिंदोळा
तू हलकेच घालतेस फुंकर
देहाचा होतो झुला

तुझा पदर  हलतो जरासा
आणि
पाखरे माघारी येतात संध्याकाळ होऊन
बांगड्या किणकिणतात आपल्याच नादात
रात्रीला चांदणे येते लगडून

तू मौसम सुगीचा
तू बहार वसंतातली
तू खळे धान्याने भरलेले
तू तान कोकिळेच्या गळ्यातली

तू दिसतेस, जाणवतेस
दिसेनाशी होतेस
मी वाट पाहतो आहे
मी तगादा लावतो आहे
गेल्या कित्येक दिवसांपासून
आवाज देतो आहे.

कविते...
हे कविते...
कुठे आहेस तू ?

**कवितेला सांभाळून ठेवा..**

कवितेला सांभाळून ठेवा.

वर्तमानपत्राच्या बातम्या
वाचून आपल्या आवळल्या जातात मुठी
तेव्हा कविता धुमसत असते आपल्या आत.

राजकीय नेत्यांच्या
जाहिर सभांचे वृतांत वाचताना
ठोके वाढत असतात आपल्या ह्रदयाचे
तेव्हा कविता झालेली असते बेलगाम.

भूकबळींच्या नंग्या वस्त्यांतून
फिरत असतात जेव्हा लाल रंगाच्या पांढ-या शुभ्र गाड्या
तेव्हा कविता उपाशीपोटी तडपत असते आत आत.

दंगलीमध्ये मारल्या गेलेल्या मुलाच्या
आईचे घेतले जातात क्लोजअप्स आणि केली जाते हेडलाइन
तेव्हा जळत असते कविता आत लाल निखा-यासारखी.

कविता धुमसते आहे
होते आहे बेलगाम
तडपते आहे उपाशीपोटी
जळते आहे लाल निखा-यासारखी.

कवितेला सांभाळून ठेवा
कविता वाट पाहते आहे
हत्यार होऊन बाहेर पडण्याची.

**सतीश सोळांकूरकर**
भ्रमणध्वनी : ९३२४३६३९३४
satishsolankurkar@gmail.com

**'बाईच्या कविता' या कवितासंग्रहातून आपला वेगळा ठसा उमटवणारे कवी-लेखक किरण येले यांचा 'मोराची बायको' 'ग्रंथाली'ने प्रकाशित हा कथासंग्रह. अलीकडच्या मराठी कथाविश्वात लक्षवेधी ठरला. संदेश ढगे या कविमित्राने या संग्रहाला दिलेली ही पत्ररूपी दाद.**

प्रिय किरण,

'मोराची बायको' हा तुझा कथासंग्रह वाचून हातावेगळा केला. इतके सलग दीर्घ वाचन अलिकडच्या काळात माझं झालं नाही, ते तुझ्या पुस्तकाच्या निमित्तानं का होईना, झालं. झपाटल्यासारखं झालं. एक कथा वाचून झाल्यावर धाप लगल्यासारखं व्हायचं. मग पुढची कथा वाचण्यासाठी बळ आणायचो आणि हात घालायचो. वाचायच्या आधीच मी ठरवायचो, आता याची पिसं काढू. पण व्हायचं नेमकं उलटच. माझीच पिसं आणि अहंकार गळून पडायचा. एका निष्ठेने जपलेल्या अभ्यासवृत्तीने, तू हे सगळं सादर करत गेला आहेस. त्यामुळे तुझ्यावर एक नकळत जबाबदारी येऊन पडली आहे की, यापुढचं लेखन यापुढचं पाहिजे.




अर्थात, हे तुझं लेखन म्हणजे मानसशास्त्रीय विरेचन आहे. तुला जी पात्रं भेटली आहेत, ती तुझ्यामध्ये अनेक वर्षे वसतीला असल्याशिवाय हे शक्य नाही. तुझं सामाजिक-बिमाजिक भान, याचं मला फार कौतुक नाही तुझी पात्रंच लेखकाकडे न्याय मागतात. यात या कथेचं श्रेय अध्याहृत आहे. 'जो कोणी आपल्याला समजून घेईल तो हाच लेखक आहे' असं पात्रांना वाटणं यात लेखकाचं यश आहे. विषयाची निवडही तुला करावी लागली नाही. कारण तुझ्या आत ती कॅन्सरच्या पेशीसाररखी डोक्याच्या केसापासून पायाच्या नखापर्यंत विस्तारून आहे.

तुझ्या 'बाईच्या कविता' हाच एक मूलाधार. यातून निसटून गेलेलं, तुला न गवसलेलं, तुला हुलकावणी देणारं. कधीतरी येशील माझ्या पेनातून झरझरत, या आत्मविश्वासाने हे सर्व उभं ठाकलं आहे. पुन्हा हे तुझं विश्व, तुझं राहात नाही, तर ते वाचकांचं होतं, हा केवढा मोठा आकांत. तुझ्या चिमुकल्या विश्वावर वाचकांनी निळ्या आकाशाची चादर धरावी आणि तुला जाणवावे, अरे!! माझं विश्व कुठे आहे? माझं विश्व नक्की होतं का? की मीच पाहुणा होतो इथे? आहे ना खरी गंमत? असो. 'स्त्रीचा शोध' वगैरे असं काही असतं यावर माझी श्रद्धा नाही. शोध हरवलेल्या गोष्टींचा घ्यावा लागतो. अविश्वासाची कीड लागू नये म्हणून समजूतदारपणाची फवारणी करायची होती. आणि ती, तू केली आहेस. एखादा पुरुष जरी आपल्या घराकडे परतला तरी या पुस्तकाचे सोने झाले असे मला वाटत राहील. त्याचं कारण या कथा नाडलेल्या स्त्रियांच्या नसून तिच्या पारंपरिक, संस्कारित, दुय्यमतेचा कळत-नकळत फायदा घेणाऱ्या लबाड, अप्रामाणिक पुरुषांच्या आहेत. पुरुषाला 'बाई' होता येईल का? हाच प्रश्न सतावणारा आहे. पुरुष कितीही वैचारिक असला तरी तो 'वैचारिक पुरुष' असतो. कॅलिडोस्कोपमधून त्रिमितीद्वारा आपण रंगीत नक्षीकाम अनुभवतो, जरा हललो तर वेगळं नक्षीकाम. किती आनंद वाटतो या खेळात. पण काचेचे तुकडे, कचाकड्या आणि चांदीचे भिंभिरे हे पुढच्या नक्षीत 'मला घ्या' म्हणून धडपडत अस्तात, ते कोण असते? आपल्या बुब्बुळाने केलेला तो विनयभंग असतो. असो.

तुझ्या कथेतील पात्रांविषयी मी लिहिणार नाही. त्यांनी मला पुरेपूर आनंद दिला आहे. आनंद शब्दात मांडला की परमानंद होतोच असं नाही. तुझ्या विचारांना जी धार आहे ती तुझ्या भाषेलाही येवो, एवढ्या मी शुभेच्छा देऊ इच्छितो.

'साईन आऊट' कथेत तू केबिनमधल्या घोड्यांच्या चित्राचा फारच समर्पक उपयोग केला आहेस. तसं प्रत्येक कथेत तुला असं 'कवी किरण येले' म्हणून एक उपयोजित तुझं स्वत:चं असं स्क्रिप्ट लाभलं आहे. तुझ्या सगळ्या कथेतल्या नायिकांचा संसार म्हण किंवा सहवास हा योगायोगाने दोन वर्षांचा आहे, ही एक जाणवलेली गोष्ट.

'कोपऱ्यातलं टेबल' ही कथा मला फारच आवडली बुवा! विक्षिप्तपणाच्या अनेक कथांचा पगडा माझ्यावर आहे. वपुंनी हे बाळकडू आम्हाला पाजलं होतं. काही कथा ह्या कथेच्या शीर्षकापेक्षा पात्रांच्या नावाने ओळखल्या जातात त्यातलीच ही. 'सरोळकर'. शन्नांची 'पाचोळा' कथा ही 'कुंदा रेगे' म्हणून माझ्या हृदयात आहे.

'मांदळकरबाई' ही कथा गूढरम्य आणि तुझ्या नेहमीच्या शैलीला फाटा देणारी वाटली. यावर एखादा चांगला दिग्दर्शक चित्रपटही काढू शकतो. जितका माणूस कवितेच्या जवळ तितका तो दु:खाच्या जवळ, असं मांदळकरबाईकडे पाहून, आपलीच आपल्याला लाज वाटते.

'अमिबा'मध्ये सरळ सरळ नात्यांचा तळ शोधताना तुला सत्य गवसत गेलं आहे. प्रामाणिक पुरुषालाच अशा कथा लिहित येऊ शकतील, असे मला वाटते.

'मोराची बायको' या कथेच्या शेवटी लेखकाने काही परिच्छेदाच्या टिप्पणीने ही कथा उंचीवर नेऊन ठेवली आहे.

मी माझ्या आवडीनुसार या कथांचा क्रम लावतो. कोपऱ्यातलं टेबल, मांदळकरबाई, मोराची बायको, अमिबा आणि स्टील ग्लास, ती आणि ती, साईन आऊट, अवशेष.

यातल्या कथेतील तपशीलात आलेली लैंगिक वर्णने ही तुझ्या मन:पातळीवरील असतीलही, पण ती वजा केली तरी अस्सल कथा वाचल्याचा आनंद वाचकाला मिळतोय, हेच या पुस्तकाचे भले माठे यश आहे.

**– संदेश ढगे**

# नायपॉल

धनंजय गांगल

**नुकतेच कालवश झालेले नोबेल विजेते व्ही.एस. नायपॉल हे जागतिक प्रतलावरील महत्त्वाचे लेखक. त्यांचे आयुष्य आणि साहित्य दोन्ही कायम चर्चेत राहिले.**



सर विद्याधर सूरजप्रसाद ऊर्फ व्ही. एस. नायपॉल हा विसाव्या शतकातील एक महत्वाचा आंतरराष्ट्रीय कादंबरीकार. ते 'सर विद्या' नावानेही ओळखले जात. वयाच्या पंच्याऐंशीव्या वर्षी लंडन येथे शनिवारी ११ ऑगस्ट २०१८ या दिवशी त्यांचे निधन झाले. नायपॉल मूळ भारतीय वंशाचे. साहित्याच्या नोबेल पुरस्काराने सन्मानित. त्यांचा जन्म ऑगस्ट १९३२ रोजी त्रिनिदादमध्ये एका छोट्या गावात झाला होता. यांच्या आडनावाची एक कथा अशी आहे की त्यांचे आडनाव दुबे होते आणि त्रिनिदादला स्थलांतरित होत असताना ते काही कारणाने नायपॉल झाले. तर दुसरी अशी की त्यांचे पूर्वज नेपाळमधून उत्तर प्रदेशातील गोरखपूर येथे आले. त्यांचे आडनाव नायपॉल हा कदाचित नेपाळचा अपभ्रंश असेल. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकामध्ये अनेक भारतीय कॅरेबियन बेटांवर स्थलांतरित झाले. हे दोन्ही ब्रिटिश वसाहतीचाच भाग होते. नायपॉल यांचे आजोबा, हिंदू-ब्राह्मण, मजूर म्हणून त्रिनिदाद येथे आले होते. त्यांचे आजोबा आणि एकूणच स्थलांतरित आपली अस्मिता टिकवण्याच्या उद्देशाने जास्त जास्त रूढी प्रिय आणि पारंपरिक होतात. पण त्यांचे वडील आर्य समाजी झाले. ते शिक्षण घेऊन पत्रकार म्हणून त्रिनिदाद गार्डियनसाठी लिहीत. आणि मग सनदी अधिकारी झाले. नायपॉलना आधुनिक विचारांचा स्पर्श होण्याची कदाचित ती सुरुवात असेल. व्ही. एस. नायपॉल यांचे शिक्षण त्रिनिदादची राजधानी पोर्ट ऑफ स्पेनमध्ये क्वीन्स रॉयल कॉलेज येथे झाले. ऑक्सफर्ड येथील महाविद्यालयात इंग्रजी विषयात पदवीशिक्षण घेण्यासाठी स्कॉलरशिप मिळाल्यानंतर वयाच्या १८ वर्षी (१९५०) ते इंग्लंडला रवाना झाले व पुढे त्याच देशात स्थायिक झाले. इंग्लिश समाजाच्या चालीरीती, त्यांच्या परंपरा, शिष्टपणा, सू-सुसंस्कृतपणा आणि त्याचबरोबर अहंभावीपणा, वंशवाद, आढ्यता यांचा एकत्रित परिणाम नायपॉल यांच्यावर खोलवर झाला. नायपॉल हे पॅट्रिशिया ॲन हॅले हिच्याशी १९५५ साली विवाहबद्ध झाले. तिच्या मृत्यूनंतर त्यांनी १९९६ साली पाकिस्तानी पत्रकार नादिरा खानम अल्वी हिच्याशी दुसरा विवाह केला.


आपण जगलो त्या वसाहतोत्तर काळात वसाहतींतल्या लोकांच्या, कुटुंबांच्या आत्मचरित्रात्मक तपशिलांमधून नायपॉल यांनी सुरुवातीची कथनात्म (फिक्शन) पुस्तकं लिहिली. त्यांची तपशील सांगण्याची हातोटी विलक्षण होती. 'द मिस्टिक मेसर' ही त्यांची पहिली कादंबरी साल १९५१. या कादंबरीला जॉन लेव्हलीन र्‍हायज पुरस्कार मिळाला. राष्ट्रकूल देशातील होतकरू नवोदित लेखकाच्या ब्रिटनमध्ये प्रकाशित झालेल्या इंग्लिश कादंबरीला हा पुरस्कार मिळतो. 'मिगुल स्ट्रीट' या त्यांच्या कादंबरीला सॉमरसेट मॉम पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार मिळवणारे नायपॉल हे पहिले अ-युरोपीय (१९६१) आणि खुद्द सॉमरसेट मॉम यांची त्यास संमती होती. 'ए बँड इन द रिव्हर' व 'ए हाऊस फॉर मिस्टर बिस्वास'सारख्या कादंबऱ्यांसह त्यांनी ३० हून अधिक पुस्तके लिहिली. 'अ हाउस फॉर मिस्टर बिस्वास' ही त्यांची सर्वात प्रसिद्ध कादंबरी आहे (१९६१). वडिलांच्या आयुष्यावर बेतलेली 'अ हाऊस फॉर मि. बिस्वास' (१९६१) म्हणजे त्या काळातला त्यांचा उत्कर्षबिंदू होता. त्यांच्या वडिलांचा त्यांच्यावर प्रभाव होता. अ प्रोलॉग टू ऑटो-बायोग्राफी (१९८३) मध्ये त्यांनी ह्याचा विस्ताराने उल्लेख केला आहे. मग खूप पुढे वडील आणि मुलगा यांच्यामध्ये संवाद साधणारी पत्रे यावर आधारलेले लेटर्स बिट्विन अ फादर ॲण्ड सन - फॅमिली लेटर्स (१९९९) हे पुस्तक लिहिले त्यांच्या 'इन ए फ्री स्टेट' (१९७१) ला बुकर पुरस्कार मिळाला. त्यानंतर गोरिलाज (१९७५) व ॲण्ड बेंड इन दि रिव्हर (१९७९) या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. त्यांनी एनिग्मा ऑफ अरायव्हल (१९८७), हाफ लाइफ (२००१) आणि भारतावरील अभ्यासपूर्ण तीन ग्रंथांचे लिखाण केले. १९९० मधे त्यांना 'सर' किताब बहाल करण्यात आला. सन २००१ मध्ये सर व्ही. एस. नायपॉल यांना

नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

त्यांच्या कादंबऱ्यांप्रमाणेच त्यांचं जीवनही वादग्रस्त विधानांनी आणि विरोधाभासांनी ओतप्रोत भरलेलं होतं. किंबहुना धक्कादायक आणि वादग्रस्त विधानं करणं हे त्यांचे व्यवच्छेदक लक्षण राहिले आहे. 'नोबेल', 'बुकर' असे पुरस्कार आणि 'सर' हा किताब मिळवत असतानाच त्यांनी अनेकदा वादंग अंगावर ओढवून घेतले. इंग्लंडला शिकत असताना एका टप्प्यावर आपले लेखन सर्जनहीन व निरर्थक आहे, असे त्यांना वाटू लागले होते. कादंबरीकार म्हणून अयशस्वी ठरल्याच्या भावनेने आत्महत्येसही प्रवृत्त झाले होते. इंग्लिश भाषेत ते शिकले आणि लेखक म्हणून नावारुपास आले तरी भारतीयांनी इंग्लिश विद्यापीठातून शिकू नये अशी त्यांची भूमिका होती. त्यांना जोसेफ कॉनरॅडसारख्या लेखकाचा वारस मानले जात होत तसेच त्यांच्या लेखनाची टॉल्स्टॉय आणि डीकन्सच्या लेखनाशी तुलना होत होती. तर एडवर्ड सैद हे आंतरराष्ट्रीय साहित्याचे अभ्यासक, समीक्षक. त्यांनी नायपॉल यांच्या साहित्याचा संक्षेपाने सारांश दोन शब्दात केला आहे – इंटेलेक्च्युअल कॅटॅस्ट्रोफ! म्हणजे बौद्धिक आरिष्ट!! त्यांच्या बहुतेक कादंबऱ्यांची अंतर्निहित कल्पना किंवा साधारण मांडणी (अंडरलाईंग थिम) अशी आहे – पाश्चात्त्य देशांनी एकेकाळी वसाहतीकरण (कॉलोनी) केलेल्या तिसऱ्या जगातील दुःख ही त्यांनीच स्वतःवर ओढवून घेतलेली (सेल्फ इन्फ्लिक्टइंग). आणि त्यात पाश्चात्त्य देशांचा विशेष दोष नाही. उलट अशा तिसऱ्या जगातून पाश्चात्त्य देशात गेलेले तिकडच्या संस्कृतीत विरघळलेल्या (त्यांच्यासारख्या) लोकांबद्दल त्यांना कौतुक होतं. असंही म्हटलं जायचं की आपल्या वसाहतकाळात केलेल्या अन्यायाचं नैतिक प्रायश्चित्त घेण्याची आयती संधी ब्रिटिशांना मिळाली म्हणून त्यांचं एवढं कौतुक झालं. साहित्यमूल्यांवर त्यांच्या कादंबऱ्या उत्कृष्ट असतील, आहेत. आणि फिक्शन म्हणून कादंबरीकाराचं कल्पना–स्वातंत्र्य कितीही मान्य केलं तरी इस्लाम, लॅटिन अमेरिकी, आफ्रिकन, आशियाई, भारतीय अगदी बालपण जेथे गेलं ते त्या कॅरिबियन मातीचा इतिहास, संस्कृती याची नसच त्यांना सापडली नाही. संस्कृतीविषयीचं त्यांचे लिखाण हे बरंचसं एकांगी, वरवरचं आहे. ऐतिहासिक किंवा समाजशास्त्रीय लिखाण करत असल्याचा नायपॉल यांचा कधीच दावा नव्हता, पण तरीही अनेक सरसकट विधानं ते करीत किंवा पुस्तकातून तसं सुचवत. वसाहतोत्तर समाजाचं चित्रण करताना सहानुभूती नाही पण थोडीतरी सहृदयता त्यांच्या मनात होती का? हा प्रश्न अनेकांना पडतो. इतिहास हा कर्तृत्वाभोवती निर्माण होतो, पण त्रिनिदादमधले लोक कर्तृत्वशून्य असून त्यांनी काहीही निर्माण केलेलं नाही त्यामुळे त्यांची नोंद ठेवण्याची इतिहासाला गरज नाही अशा त्यांच्या विधानामुळे तिथले लोक चिडले. ते काही काळ आफ्रिकेतही राहिले. तिथलीदेखील कोणतीच गोष्ट त्यांना पसंत पडली नाही. स्थानिक नावांचा धड उच्चार करण्याचीही तसदी तिथे त्यांनी घेतली नाही. आफ्रिकन लोक मनात येईल तिथे जातात; त्यांना वाटेल ते करतात; म्हणून ते आनंदात असतात. आफ्रिकन लोकांना लाथाच घातल्या पाहिजेत, तीच भाषा त्यांना कळते

एका विशिष्ट अभिजनवृत्तीतून अधूनमधून डोकावणारा तुच्छतावाद त्यांच्यात ओतप्रोत भरलेला होता. वसाहतोत्तर समाजांना काही भविष्य नसल्याचा दावा त्यांनी कादंबऱ्यांमध्ये केला. मग मधेच सांधा बदलून जेथे ते शिकले त्या ऑक्सफर्डलाही दुय्यम दर्जाचं विद्यापीठ म्हणून संबोधलं. वसाहतींमधून लिहिल्या जाणाऱ्या समकालीन लेखनात आता आत्मा नाही, कादंबऱ्या आता क्रयवस्तू (कमोडिटी) झाल्या आहेत आणि पाश्चात्त्य वाचक त्यातल्या वैचित्र्याने भारून जातो आणि त्यांना खप मिळतो, असंही म्हणलं. ''कथनात्म साहित्य बहरलं ते एकोणिसाव्या (१८३० ते १९००) शतकाच्या उत्तरार्धात. त्यानंतरच्या साहित्याला काही अर्थ नाही'' असंही धाडसी विधान त्यांनी १९९६ च्या सुमारास केलं. हेन्री जेम्स ह्या समीक्षकांनी नावाजलेल्या अमेरिकी कादंबरीकाराचा उल्लेख नायपॉल जगातला भिकार लेखक म्हणून करतात. नोबेल सन्मानित अर्नेस्ट हेमिंग्वे यांच्याबद्दलही नायपॉल म्हणतात, हेमिंग्वे अमेरिकीपणातच गढून गेले. महिला लेखकांबद्दल नायपॉल यांची मते अशीच तुच्छतेची होती. रॉयल जिऑग्राफिक सोसायटी लंडन इथे दिलेल्या जाहीर मुलाखतीत जेन ऑस्टिन या प्रसिद्ध कादंबरी लेखिकेचा मुद्दाम उल्लेख करत त्यांनी सांगितलं, तिच्या अनुभूतींशी मी समरस होऊ शकत नाही, एखादं लिखाण वाचताना पहिल्या दोन परिच्छेदांत मला समजून येतं की हे लिखाण कोणा महिलेचं आहे किंवा नाही. हे माझ्या लिखाणाची बरोबरी करू शकणार नाही. याचं कारण म्हणजे कोणाही महिलेची असणारी अंगभूत भावनात्मकता, जगाबद्दलची संकुचित दृष्टी. या त्यांच्या घमेंडीमुळे कॅरेबिअन मातीतले दुसरे नोबेल विजेते लेखक डेरेक वोलकॉट यांनी त्यांचा उल्लेख उपहासाने सर नाईट–फॉल असा करत.

भारतासह त्यांनी जगभर अनेक – विशेषतः ब्रिटिशांनी जेथे जेथे वसाहती केल्या अशा देशात ते एलिट जिप्सीप्रमाणे भटकले. आणि त्या अनुभवांवर आधारित त्यांनी बहुतेक कादंबऱ्या लिहिल्या. भारतात ते तीन वेळा आले. १९६५ मध्ये प्रकाशित झालेले 'ॲन एरिया ऑफ डार्कनेस', 'इंडिया अ वुंडेड सिव्हिलायझेशन' (१९७७) आणि 'ए मिलयन म्युटिनीज नाऊ' (१९९०) या पुस्तकातून नायपॉल भारतीय इतिहास व समाजव्यवस्थेचा मागोवा घेतला. पण एकूणच भारतीय इतिहासात वर्णन केलेले वैभव त्यांना कुठेच आढळून आले नाही. फाळणीची खोल जखम त्यांना अस्वस्थ करून गेली. भ्रष्टाचार, जातिव्यवस्था, प्रादेशिकता आणि अत्युच्च धर्मांधता अगदी लोकांचे सार्वजनिक शौचास बसणे इत्यादी बाबींमुळे त्यांचे मन उद्विग्न झाले भारतातल्या हलाखीवर, अशा हलाखीतही ठेविले अनंते तैसेचि राहावे वृत्तीवर आणि तिचा उदोउदो करण्याच्या संस्कृतीवर त्यांनी आसूड उगारला. नायपॉल यांनी रंगवलेले भारताविषयी नकारार्थी चित्र अनेकांना रुचले नाही. नकारात्मक वास्तव मांडण्याच्या अट्टहासात भारतीय इतिहास व समाजव्यवस्थेतील गुंतागुंतीची रचना अँड सूक्ष्म भेद ज्याला न्यूआन्सेस म्हणतात त्याकडे त्यांनी विशेष लक्ष दिलं नाही! का पाश्चात्त्यांना काय वाचायला आवडेल याकडेच त्यांचे लक्ष असायचे? इंडिया अ वुंडेड सिव्हिलायझेशनमध्ये ब्रिटिशांकडून




वारशाने घेतलेल्या तथाकथित लोकशाही संस्था आणीबाणीत पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणे कोसळल्याचे निरीक्षण ते नोंदवतात. पण त्याच सुमारास आणि त्याच विषयावर आलेलं वेद मेहताचं द न्यू इंडिया (१९७८) जास्त संतुलित वाटतं. १९९०च्या आपल्या ए मिलियन म्युटिनीज नाऊ पुस्तकात ते हिंदुत्ववादी शक्ती जोर धरू लागल्याचं वर्णन करतात आणि ही गोष्ट सकारात्मक आहे असं त्यांना वाटतं. भारतात आलेल्या मुस्लिमांनी येथील संस्कृती, मंदिरे नष्ट केली. हिंदू, बौद्ध संस्कृतीला हादरे दिले, असे ते म्हणतात. बाबरी मशीद पाडल्यावर तर त्यांनी हे कृत्य ऐतिहासिक संतुलन साधणारी घटना आहे. हा वेडाचार आहे, पण अशा वेडाचारातून रचनात्मकता येते व त्याचे मी समर्थन करतो, अशी प्रतिक्रिया दिली होती. इस्लाम हा आधुनिक जगाचा धर्म होऊच शकत नाही, असे थेट विधान त्यांनी केले आणि ''इस्लाम समजून घेण्याच्या नावाखाली खोटा निधर्मीवाद भासवण्यात आला त्याची परिणती म्हणजे बाबरी मशीद पडणे'' अशी थेट टीका केली. मुस्लिमांवर टीका आणि बाबरी मशीद पाडल्याचं समर्थन करणाऱ्या नायपॉलांवर अर्थातच गिरीश कर्नाड यांनीही बहुधर्मीय भारतीय समाजाचे अंतरंग, त्याचा इतिहास न ओळखणारा, भारतीय कला, संगीत यांचा कोणताच सखोल अभ्यास नसणारा लेखक अशी सणकून उलट टीका केली. निमित्त होतं नव्हेंबर २०१२ मध्ये टाटा लिटरेचर फेस्टिवलचे. तेथे नायपॉल यांचा 'लाईफ टाइम अचिव्हमेंट' हा मान देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. पुढच्या दिवशी गिरीश कर्नाड हे स्ट्रेट टॉकमध्ये खरं तर आपल्या रंगभूमीबद्दल विचार मांडणार होते पण ते करताना त्यांनी नायपॉल आणि त्यांचा सत्कार करणाऱ्या आयोजकांवर ही (अनिल धारकर वगैरे) सणकून टीका केली. त्याच्या काही वर्ष आधी निस्सीम एझाकेल यानेही 'नायपॉलस इंडिया अँड माईन' या त्याच्या निबंधातून नायपॉल यांच्या तुच्छ वृत्तीचा प्रतिवाद केला होता. हा निबंध आदिल जूसावाला यांच्या 'न्यू रायटिंग इन इंडिया' या लेख-संकलन (अँथॉलॉजि) पुस्तकाचा भाग होता. त्यांना नोबेल मिळाल्यावर जेव्हा त्यांचा भारतात काही ठिकाणी सत्कार करण्यात आला. अशाच एका सत्कारात नयनतारा सहगल बोलत होत्या. त्यांना अचानक अडवून ते जोरजोरात ओरडायला लागले की इथे ते राजकीय भाषण ऐकायला आले नाहीयेत, पण नयनतारा ठाम राहिल्या आणि असं म्हणतात की रुचिर जोशी यांनी मधे पडून नायपॉल याना समज दिली! त्यांनी ताजमहालवरही तो रक्तरंजित इतिहास असल्याची टीका केली आणि रोमिला थापर सारख्या इतिहासकार हिंदू-मुस्लिम कलांच्या मिलाफाच्या खोट्या रोमँटिक मार्क्सिस्ट कल्पनेत रमलेल्या असतात असंही नोंदवलं. इस्लाम आणि मुसलमान हे फक्त हल्लेखोर आणि आक्रमणकर्ते असल्याची त्यांची मनोमन भावना होती. आर. के. नारायण यांच्यावरही त्यांनी टीका केली की (हिंदू) विजयनगरच्या विध्वंसाबद्दल ते उदासीन होते. भारतावर लिहिलेल्या त्यांच्या तीनही पुस्तकात इथल्या संस्कृतीचा आत्मा असलेल्या संगीत परंपरांचा यत्किंचितही उल्लेख नाही. 'हिज सायलेन्स ऑन म्युसिक इज डीफॅनिंग!' नायपॉल यांचं संगीताबद्दलचं मौन कानठळ्या बसवण्याएवढे ठसठशीत आहे! पुस्तकालेखनाआधीच्या संशोधनासाठी असेच एकदा ते मुंबईला आले होते. साल बहुतेक १९८५ असावं. पत्रकार चारुदत्त देशपांडे यांच्या मध्यस्तीने त्यांनी बंडखोर कवी आणि एकेकाळचे दलित पँथरचे नेते नामदेव ढसाळ आणि शिवसेनेचे तेव्हाचे एक आमदार विठ्ठल चव्हाण यांची भेट आणि प्रदीर्घ मुलाखत घेतली. नामदेव बरोबर ते कामाठीपुऱ्यात वेश्यावस्तीतही गेले (तिरस्कृत नारी संघटना) नायपॉल परदेशी माणूस म्हटल्यावर वेश्यांनी त्यांना गराडाच घातला, पण त्यांना त्याची शिसारी येऊन ते तेथून निघून गेले. नंतर दुसऱ्या दिवशी झाल्या प्रकाराबद्दल त्यांनी माफी मागितल्याचंही म्हटलं जातं. 'ए मिलयन म्युटिनीज नाऊ'मध्ये नामदेव ढसाळ, मल्लिका आणि दलित पँथरवर यांच्यावर जवळपास पंचवीस एक पानं त्यांनी लिहिली आहेत.

अर्जेंटिनाला दिलेल्या भेटीवर त्यांनी 'द रिटर्न ऑफ इव्हा पेरॉन' लिहिली. इंडोनेशिया, इराण, पाकिस्तान व मलेशियाच्या भेटीवर 'अमंग द बिलीव्हर्स लिहिली', दक्षिण अमेरिकेच्या भेटीवर 'अ टर्न इन द साऊथ' लिहिली.

त्यांनी इस्लामी जगाविषयी अमंग द बिलीव्हर्स (१९८१), बियाँड बिलीफ (१९९८) या पुस्तकातून लिहिलं. इस्लामचा केवळ वाईट भागच दाखवला म्हणून ह्या पुस्तकांवरही प्रचंड टीका झाली. इस्लामने अनेक संस्कृतींना नष्ट केले. लोकांना गुलाम केले. धर्मांतराने माणसाचा भूतकाळ, इतिहास नष्ट झाला, अशी ते टीका करत. इस्लाम आणि मुसलमान हे फक्त हल्लेखोर आणि आक्रमणकर्ते असल्याची त्यांची मनोमन भावना होती. आणि डावे इस्लामचा चुकीचा आणि रोमँटिक इतिहास सांगण्यात रमलेले असतात असं त्यांचं मत होतं. नायपॉल पाकिस्तानबाबत म्हणतात, इस्लाम किती हानी करू शकेल याचा जिवंत पुरावा म्हणजे पाकिस्तान. मग 'मुस्लीम न्यूज'चे संपादक अहमद वरसी यांनी त्यांच्यावर हिंदू राष्ट्रवादी आणि मुस्लिमद्वेषी असल्याचा शिक्का मारला. नायपॉल आणि सलमान रश्दी तसे समकालीन आणि एकाच धाटणीचे तिसऱ्या जगाबद्दल लिहिणारे लेखक. नायपॉल यांच्या इस्लामविषयक इतक्या परखड लिखाणानंतरही त्यांच्याविरूद्ध जिहादी फतवा निघाला नाही. सलमान रश्दी

यांच्यापेक्षा ते या बाबतीत नशीबावान ठरले असं म्हणावे लागेल. का उलटं म्हणूया? फतवा निघाल्यामुळे सलमान रश्दीभोवती एक आकर्षक प्रसिद्धीचे वलय तयार झाले. लिखाण स्वातंत्र्याचे ते प्रतीक बनले. असं वलय मात्र नायपॉलयांच्या नशिबी आले नाही. ९/११ २००१मध्ये अमेरिकेच्या ट्वीन टॉवर्सवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याने – आपणच पोसलेल्या इस्लामिक दहशतवादाची जाणीव पाश्चात्य जगाला झाली आणि २००२ चे नोबेल इस्लामवर विखारी टीका करणाऱ्या नायपॉल यांना मिळाले हा कदाचित योगायोग असावा! ज्याची मुळं ना धड मातृभूमीत, ना कारकीर्द जिथे घडली त्या ब्रिटनमध्ये, ना पूर्वज जिथून आले त्या भारतात, त्यामुळे ही आयुष्यातली मुळं हरवल्याच्या अपूर्णतेने ते ग्रासले आहेत आणि त्यातून ते अशा प्रकारची विधान करतात – अशीही टीका झाली. वसाहतीतील लोकांबद्दल तुच्छता बाळगणारे पाश्चात्त्य नायपॉल यांच्या खांद्यावर बंदूक देऊन आपला कार्यभाग साधू पाहत आहेत अशीही टीका झाली.

लेखक पॅट्रिक फ्रेंचनं त्यांचं 'अधिकृत' म्हणता येईल असं चरित्र लिहिलं. 'द वर्ल्ड इज व्हॉट इज' या नावाने ते २००८ साली प्रकाशित झालं. पॅट्रिक फ्रेंचनं त्यांच्या मागे लागून खुद्द त्यांनीही तोपर्यंत न वाचलेली त्यांच्या (ब्रिटिश) पत्नीची रोजनिशी त्यांच्याच मदतीने मिळवली. ते लेखक म्हणून झगडत होते त्या उमेदीच्या काळापासून त्यांची कारकीर्द घडवण्यासाठी झटलेल्या आणि त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या पत्नीचा त्यांनी मानसिक छळ केल्याचे तपशील तिच्या रोजनिशीत. तसेच वैवाहिक जीवनात शारीरिक सुख न मिळाल्या मुळे केलेलं वेश्यागमन, अर्जेंटिनामधली त्यांची प्रेयसी, तिच्याविषयी पत्नीला दिलेली कल्पना, त्यानं पत्नीला झालेले क्लेश, नंतर प्रेयसीला केलेली मारहाण, असे अनेक तपशील या रोजनिशीतून आणि नंतर चरित्रातून उघड झाले. हा कमालीचा प्रांजळपणा म्हणावा, का लेखक म्हणून हा प्रांजळपणा आपल्याला फायद्याचं होईल हे गणित त्यामागे होतं? या चरित्रासंबंधात पॅट्रिक फ्रेंच त्यांची लंडनमधल्या साऊथ ब्लॉक सेंटर येथे मुलाखत घेत होते घेत होते. ती इतर श्रोत्यानाही खुली होती. एका विद्यार्थिनीने त्यांना विचारले आपण स्वःताला कुठल्या वंशाशी जवळच मानता? त्यावर ते चिडून म्हणाले, 'तुझा प्रश्न अत्यंत गौण आहे. तुला स्वत:चा आवाज ऐकायला आवडतो म्हणून तू असले प्रश्न विचारतेस!'

नायपॉल यांच्या निधनाबद्दल जागतिक लेखनजगतातून शोक प्रतिक्रिया व्यक्त झाल्या आहेत. नायपॉल यांनी कधीच बनावट लिखाण केले नाही. जे लिहिले ते अस्सल. आमच्या काळातील सर्वोत्कृष्ट लेखकांमध्ये त्यांची गणना होईल, अशी भावना अमेरिकी लेखक पॉल थेरॉक्स यांनी व्यक्त केली. राजकारण, साहित्य यांबाबत आमच्यात टोकाचे मतभेद होते. आयुष्यभर आम्ही ते धरून ठेवले होते. मात्र नायपॉल यांच्या निधनाने मी माझा मोठा भाऊ गमावल्यासारखे वाटते आहे, अशी भावना प्रख्यात लेखक सलमान रश्दी यांनी नोंदवली. एकेकाळी नायपॉल यांना सलमान रश्दीबद्दल विचारलं असता 'तुम्ही कोणाबद्दल बोलताय मला काळत नाही.' असं म्हणत रश्दीना अनुल्लेखाने मारले होते!!

नायपॉल त्यांच्या स्वभावाप्रमाणे आपल्यावर होणाऱ्या टीकेकडे पूर्ण दुर्लक्ष करायचे. तिसऱ्या जगाची संस्कृती, स्थलांतरे आणि बदलत्या युगाचा आढावा घेणारे नायपॉल यांना विरोधी मतं जराही मान्य होत नसत. त्यांना न पटणाऱ्या चर्चेतून, मुलाखतीतून ते सरळ उठून जात किंवा काहीतरी कांगावा करत! मानवी स्थलांतर, ब्रिटिश साम्राज्याच्या विस्तार आणि दुसऱ्या महायुद्धानंतर आक्रसणं, माणसा-माणसातील समज, गैरसमज याबद्दल ते लिहीत आधुनिकता केवळ सुखसुविधा घेऊन येत नाही, तर महत्त्वाकांक्षा आणि व्यक्तिवाद अशी मूल्यंही ती घेऊन येते हे ठसवत माणसांच्या जगण्याच्या धडपडीचं अत्यंत केविलवाणं आणि भकास दर्शन अत्यंत तुच्छतेने ते घडवत राहिले. गतकाळाच्या स्मृती-रंजनात आणि उदात्तीकरणात रमलेल्या आपल्या सर्वांना गैरसोयीचे आणि अप्रिय प्रश्न विचारत राहिले. स्थलांतरितांचा लोंढा आता अमेरिकेला, युरोपलाही, आशिया कोणलाही नकोय. मात्र फार पूर्वी यापैकी प्रत्येकाची समृद्धी आणि भरभराट ही स्थलांतरणातूनच झालेली आहे. आणि त्याचबरोबर संस्कृतीचेही सतत घर्षण आणि सरमिसळ झाली आहे. हा इतिहास जसा आर्थिक शोषणाचा आणि दु:ख, दैन्याचा, हालअपेष्टांचा आहे तसाच तो इच्छा आकांक्षांचा, अस्मितांचा आहे. नायपॉल यांनी केलेलं त्याचं उद्वेगी चित्रण आपल्या वैचारिक-नैतिक अधिष्ठानाला आव्हान देतं आणि आपल्याला चिंतन करण्यास भाग पाडतं.

**– धनंजय गांगल**
भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com

## 'शब्द रुची' दिवाळी अंक सजतोय...

- लढाई अजून सुरू आहे...
- दुसरी बाजू...
- प्राणिजीवांशी अनुबंध...

*असे परिसंवाद, प्रवासवर्णन, कविता, कथा, जन्मशताब्दी विशेष, वैचारिक लेख, ललित, मुलाखती अशा विविध विभागांनी दर महिन्याच्या 'शब्द रुची'च्या प्रवासातला हा एक पुढला टप्पा...*

**या अंकाचे मानकरी...**
वसंत आबाजी डहाके, रत्नाकर मतकरी, उमा कुलकर्णी, रामदास भटकळ, यशवंत देव, नीरजा, प्रज्ञा पवार, मृदुला भाटकर, दीपक करंजीकर, नितीन कुलकर्णी, संजीव खांडेकर, किरण येले, संजीवनी खेर, दीपक घारे, कैलास दौंड, हेमलता अंतरकर, वंदना महाजन, शशिकांत सावंत, प्रशांत असनारे, वसुधा सहस्त्रबुद्धे, विनायक जोशी, मधुवंती सप्रे, वृषाली किन्हाळकर, डॉ. हमीद दाभोलकर, प्रकाश भातम्ब्रेकर इत्यादी.


"All the News That's Fit to Print"

The New York Times

NEW YORK, FRIDAY, JANUARY 20, 2017

With an Oath, Complications In a Hotel Deal

Ethical 'Minefield' for the President-Elect

WIRETAPPED DATA USED IN INQUIRY OF TRUMP AIDES

EXAMINING RUSSIAN TIES

Business Dealings of Campaign Advisers Are Investigated

TRUMP ARRIVES, SET TO ASSUME POWER

In Cabinet Hearings, Strong Rejection of Obama's Policies


The Washington Post

U.S. mines Internet firms' data, documents show

Google, Facebook, Apple, Yahoo deny giving NSA direct access to servers

Agency knows much about public, but we know little about it

In Golan, Israelis rush to finish fence

Final trip to the Capitol

?



# ट्रंप व प्रसारमाध्यमं : एक खडाजंगी

## डॉ. अनंत पां. लाभसेटवार

**लो**कशाहीत शासन व प्रसारमाध्यमं यामध्ये नेहमीच विरोधकाचं नातं असतं. कुत्रं आणि मांजर यामधला जन्मजात कलह जसा नैसर्गिक तेवढेच हे ताणलेले संबंध सहाजिक. पण अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप आणि मुद्रित व रजत माध्यमं यांच्यामधले संबंध त्या पलीकडे जाऊन त्यांनी द्वंद्वात्मक रूप धारण केलं आहे. त्यामुळे दोघांमधे जी अविश्वासार्हता निर्माण झाली ती अमेरिकेला व पर्यायानं जगाला उपकारक ठरू शकत नाही. असं वैमनस्य अध्यक्ष निक्सनच्या कारकिर्दीत होतं असं इतिहासकार म्हणतात.

माध्यमाचं कर्तव्य म्हणजे दोन्ही बाजू सादर करून मतदारांना कुठल्याही घटनेचं सम्यक दर्शन घडवून देणे. त्यामुळे वाचक किंवा प्रेक्षक सुसंस्कृत होऊन निर्णय घेण्यास सक्षम होतो. पण अमेरिकन माध्यमांनी ही जबाबदारी स्वत:वर घेऊन ग्राहकांना कुणाला मत द्यावं याचा प्रचार करण्यास सुरुवात केली. साक्षीदाराऐवजी त्यांनी भागिदाराची भूमिका निर्लज्जप्रमाणे पत्करली. असं करताना ते पूर्वग्रहदूषित आहे हे सिद्ध झालं आणि अमेरिकन जनतेचा त्यांच्यावरील विश्वास पार उडाला. एका सर्वेक्षणात त्यांची लोकप्रियता फक्त ६% होती. म्हणजे अमेरिकन लोकशाहीला जे तीन पाय आहेत (न्यायव्यवस्था, कार्यकारी शाखा व संसद). त्या सर्वांपेक्षा माध्यमांची पसंती कमी आहे.

अमेरिकेन माध्यमांनी सुरुवातीपासूनच हिलरीला उचलून धरलं होतं कारण ती मुळातच राजकारणी होती. शिवाय ती डाव्या धोरणाची उदारमतवादी (liberal). हे अमेरिकन माध्यमांना अंगठीच्या कोंदणात खडा फिट्ट बसावा असं वाटलं कारण ९०%हून अधिक पत्रकार व चॅनलवाले त्याच धोरणाचे. त्या सर्वांनी तिलाच आर्थिक व वैचारिक आधार दिला होता. हाताच्या एका बोटावर मोजण्याएवढी २-३ वर्तमानपत्र सोडलीत तर उरलेली शे-दोनशे

हिलरीच्या बाजूला नव्हे तर तिच्या खिशात होती. मतदारांच्या मनाचं जडणघडण करण्याचं असामान्य सामर्थ्य लेखणीत असल्यामुळे ट्रंपवर चिखलफेक केल्यानं जनमानस आपोआप हिलरीकडे वळेल असा सर्वांना वाटणं सहाजिक होतं कारण ट्रंप राजकारणात सर्वस्वी उपरे, कधीही निवडणूक न लढलेले व नेहमी बाँबगोळे फेकणारे. अशा अननुभवी उद्योजकाची मुरलेल्या हिलरीसमोर डाळ शिजणार नाही असं त्यांना वाटणं साहजिक होतं. शिवाय आपल्या टेकूमुळे हिलरी जिंकेल असा सर्व डाव्या माध्यमांना आत्मविश्वास होता. असं करताना आपण आपली व्यावसायिकता धाब्यावर टांगली याचं माध्यमांना एकतर भान राहिलं नाही; नाहीतर त्यांना त्याची क्षिती नव्हती.

अशा वातावरणात आपल्या वर्चस्वाला निवडणुकीत ठोकर बसली व ट्रंप अध्यक्ष झाले हे माध्यमांना अवमानकारक वाटलं. अशावेळी शहाणा धडे शिकतो. पण अमेरिकेची माध्यमं एवढी उन्मत्त की पुन्हा रिंगणात उभं राहून त्यांनी दंड थोपटले. आपल्या व्यावसायिक भूमिकेचा त्याग करून पत्रकारविद्येला कलंक लावला. निवडणुकीत माध्यम पुरस्कृत भूमिकेचा जनतेनं त्याग केला तरी त्यांनी चिखलफेक सुरूच ठेवली. अधिकांशानं जनता ट्रंपच्या बाजूला असूनही वॉशिंग्टन पोस्ट, न्यूयॉर्क टाईम्स, बोस्टन ग्लोब, लॉस एंजेलिस टाईम्स किंवा शिकागो ट्रिब्युन यासारख्या शहरी वृत्तपत्रांनी व CNN, ABC, CBS, NBC व MSNBC या मुख्य चॅनलवाल्यांनी आपल्या गाण्याचा सूर बदलला नाही. त्यांनी त्याच गाऱ्हाण्याचे पाढे वाचण्यास सुरुवात केली. फक्त एकच वाहिनी ट्रंपच्या बाजूनं आहे. ती म्हणजे FOX News. म्हणून ट्रंपनी आपल्या भाषणात म्हटलं की माध्यमं हा विरोधी पक्ष झाला आहे. हे अर्थातच त्यांना झोंबलं.

ट्रंपनी काहीही म्हटलं तरी त्याचा विपरीत अर्थ काढून जनतेची दिशाभूल करण्याचा परिपाठ त्यांनी सोडला नाही. याची अनेक उदाहरणं मी मागच्या एका लेखात दिली आहेत (शब्द रुची, फेब्रुवारी २०१७). बनावटी बातम्या (फेक न्यूज) पेरल्यामुळे हे मिश्रण अधिकच स्फोटक झालं आहे. माध्यमांचा हा अट्टाहास कशासाठी? आपण ट्रंपला सत्तारूढ होण्यापासून पराभूत करू शकलो नाही ही नपुसंकता त्यांना खुपली. हे शल्यशमन करण्यासाठी त्यांनी ट्रंपच्या शासनाला अवैधतेची किनार जोडून जनतेच्या डोळ्यांत तिचं महत्त्व कमी करण्याचे प्रयत्न सुरू केले. पण अमेरिकन मतदार सुविद्य, जागृत व सुसंस्कृत. या धुळफेकीमुळे तो निवडणुकीत विचलित झाला नाही. मग तो माध्यमधार्जिणा होणं अशक्यच. हे गणित माध्यमांना कसं कळलं नाही कुणास ठाऊक! या धुळफेकीचं दुसरं उद्दिष्ट म्हणजे २०१८ च्या निवडणुकीत लोकसभा व उच्चगृहात (Senate) सध्या असलेलं रिपब्लिकन पक्षाचं मताधिक्य कमी करून ट्रंपना दुर्बल करणं. अमेरिकेत दर दोन वर्षांनी लोकसभेचे सर्व प्रतिनिधी व ३३% सिनेटर्स निवडणुकीसाठी उभे राहतात. या देशात लोकसभा प्रतिनिधीची मुदत फक्त २ वर्ष व सिनेटर्सची ६ वर्ष असते, पण माध्यमांच्या गणितात एक गोम आहे. २०१८ मध्ये जे ३३ सिनेटर्स उभे आहेत त्यातले २३ डेमॉक्रॅट पक्षाचे.

त्यामधले १० ज्या प्रांतातून उभे आहेत ते सर्व ट्रंपनी दोन अंकी मतांनी जिंकलेले. त्यामुळे त्यातले बरेच पडतील व रिपब्लिकन पक्षाचं मताधिक्य कमी होण्याऐवजी वाढून माध्यमाचं नाक पुन्हा कापलं जाण्याची शक्यता. लोकसभा प्रतिनिधीगृहातही तोच पक्ष आघाडीवर राहील हे राजपंडित मान्य करतात. असं असताना माध्यमं व्यावसायिकतेची झूल पांघरून आपलं कर्तव्य का बजावत नाहीत? हे एक कोडं आहे.

दुसरं असं की ब्रिटिश किंवा भारतासारख्या संसदीय लोकशाहीत विश्वासदर्शक ठराव संमत करता आला नाही तर सरकारचे बारा वाजतात. असं अध्यक्षीय लोकशाहीत नसतं. ट्रंपची ४ वर्षांची मुदत आहे. त्यांना अभिनियोगाची कारवाई करण्यासाठी (Impeachment) सबळ कारण, सिनेटमध्ये ६७ व लोकसभेत बहुसंख्य मतं लागतात.

डेमॉक्रॅट पक्षाच्या टोकाची डावी मतं असलेल्या काही प्रतिनिधींनी अशी मागणी केली देखील. असं करताना ते किती अंध आहेत हे दिसून येतं कारण दोन्ही सभागृह रिपब्लिकन पक्षाच्या ताब्यात असताना त्यांनी आपल्या अध्यक्षांना महाभियोगाची मागणी करणं स्वत:हूनच स्वत:चे पाय कापल्यासारखं होईल. लेव्हिन्स्की प्रकरणात बिल क्लिंटनला ते आपल्या लैंगिक संबंधाविषयी खोटं बोलले म्हणून लोकसभेत बहुमत मिळालं, पण सिनेटमध्ये ६७ मतं पडली नाहीत म्हणून क्लिंटन कलंकित झाले तरी पदच्युत झाले नाहीत हे विशेष.

ट्रंपवर बिनबुडाचे व हास्यास्पद आरोप कसे केले जातात याची अनेक उदाहरणे देता येतील. 'जनरल माईक केली' हे उच्चपदस्थ अधिकारी, लष्करी गुप्तहेराचे एके काळचे मुख्य, पण ओबामांशी पटलं नाही म्हणून निवृत्ती स्वीकारलेले. ट्रंपनी त्यांना निवडणूकपूर्व काळात सल्लागार म्हणून कामावर ठेवलं. त्यांनी रशियाशी संबंध ठेवले व परराष्ट्रधोरणाविषयी त्यांच्या दूताशी चर्चा केली म्हणून एक देशद्रोही कृत्य केलं व हे 'अवैध' कृत्य ट्रंपला ठाऊक असेल तर अध्यक्ष महोदय गुन्हापात्र होतात असा ड्रेमॉक्रॅट पक्षानं आरोप केला व म्हणून त्यांना सक्तीनं कामावरून काढून टाकलं पाहिजे अशी त्या पक्षाच्या काही मुख्यत: कृष्णवर्णीय सभासदांनी मागणी केली. अमेरिकेतली मुख्य प्रवाहातली माध्यमं (Main stream) या पक्षाचा विस्तार समजला जात असल्यामुळे त्यांनाही भुंकण्यास एक कारण मिळालं. न्यूयॉर्क टाइम्सचा प्रसिद्ध स्तंभलेखक थॉमस फ्रीडमन यांनी (The World is Flat, 2005 चा लेखक) तर या ट्रंपच्या कृत्याची तुलना १९४१ मध्ये दुसऱ्या महायुद्धात जपाननं पर्ल हार्बरवर केलेल्या अघोरी कृत्याशी केली. डॅन रादर हा एकेकाळचा CBS या वाहिनीचा प्रसिद्ध डावा वार्तानिवेदक. त्याचे रिपब्लिकन पक्षाशी निक्सनच्या काळापासून विळ्याभोपळ्याचे संबंध. त्यानं ट्रंपच्या वागणुकीची वॉटरगेटशी तुलना करून स्वत:ची पत कमी केली. दुसऱ्या एका प्रसिद्ध वृत्तपत्रानं ट्रंपच्या राज्याभिषेकाची तुलना सप्टेंबर ११, २००१ रोजी न्यूयॉर्कच्या जुळ्या मनोऱ्यावर झालेल्या हल्ल्याशी केली. या हत्याकांडात ३४०० लोक गेले.

अगदी अलीकडे न्यूयॉर्क टाईम्सच्या एका वार्ताहारानं तर मनाची नव्हे तर जगाची तमा न बाळगता लिहिलं की फर्स्ट लेडी मेलानिया ट्रंप एक वेश्या आहे. या दैनिकाच्या प्रसिद्धीला व प्रतिष्ठेला हे अशोभनीय असल्यामुळे त्या वार्ताहारानं मग माफी मागण्याचा मोठेपणा तरी दाखवला.

यावरून अमेरिकेन माध्यमं किती व कशी विचलित झाली याची कल्पना येईल. त्यांना ट्रंपचा विजय विषारी वाटतो. म्हणून बंदर सोडण्यापूर्वीच त्यांच्या नावेला भोकं पाडली तर ती लवकरच बुडेल अशी त्यांना आशा वाटते, पण या ऱ्हस्व दृष्टीच्या माध्यमांनी दोन गोष्टींचा विचार केला नाही. एक म्हणजे विश्वासार्हता तळागाळाला गेली असल्यामुळे त्यांच्या ओरडण्याचे काही परिणाम होत नाहीत. उलट त्यांचीच द्वेषबुद्धी जगाला दिसते. दुसरं म्हणजे या अनाठायी आरोपांची ट्रंपच्या चाहत्यांना सवय झाली आहे. त्यामुळे ते सर्व आपल्या नेत्याकडे अजूनच ओढले गेले. निवडणुकीच्या काही आठवडे अगोदर ट्रंपची स्त्रीद्वेष्टा उद्गारांची ध्वनीफित उजेडात आली तेव्हा त्यांचे चाहते त्यांना सोडून जातील असं अनेकांनी भाकित केलं होतं. अशा गंभीर आरोपाला त्यांनी भीक घातली नाही. मग या नव्याने उडवलेल्या शिंतोड्यांचा त्यांच्यावर काय परिणाम होणार?

अमेरिकन पत्रकारिता दुरुस्ती पलीकडे कलंकित झाली आहे असं ट्रंपना चाहत्यांना वाटतं. तिचा आत्माच हरवला. तो म्हणजे विश्वासार्हता. ती रसातळाला गेली. कुठल्याही पत्रकारितेचं उद्दिष्ट दोन्ही बाजू तटस्थपणे वाचकांसमोर मांडून त्यांना सुसंस्कृत करणे हे असतं. त्यात पूर्वग्रहाला व पक्षपाताला जागा नसते. त्यांचं स्थान अग्रलेखात. मुखपृष्ठावर नव्हे, पण हे निकष अमेरिकन पत्रकारितेने केव्हाच सोडून आपले खरे रंग जनतेला दाखवले. हे अलीकडेच हार्वर्ड युनिव्हर्सिटीनं केलेल्या संशोधनावरून सिद्ध झालं. मे २०१७ मध्ये त्या विद्यापीठानं जाहीर केलं की सामान्य प्रवाहातील पत्रकारांनी लिहिलेल्या ९०% बातम्या ट्रंप विरुद्ध होत्या. यात मोडणारे दोन वृत्तपत्र म्हणजे न्यूयॉर्क टाईम्स व वॉशिंग्टन पोस्ट. ते दोन्ही तोट्यात जातात हे सोडून दिलं तरी त्यांनी आपली प्रतिष्ठा व प्रसिद्धी याप्रमाणे धुळीत मिळवावी ही एक खेदजनक गोष्ट आहे. चॅनलवाले तर या छापील माध्यमांच्या पुढे होते. CNN, MSNBC या वार्ता वहिन्यांनी प्रसारित केलेल्या ९३% बातम्या नकारात्मक होत्या. या पूर्वग्रहदूषित भूमिकेहून एकच गोष्ट सिद्ध होते. ही माध्यमं निरपेक्ष नसून पुरस्कर्ते (Agenda वाले) झाले असंच म्हणावं लागेल. लोकशाहीचा चौथा स्तंभ अशी स्वत:ची आत्मप्रशंसा करणारे व सरकारवर अकुंश ठेवणारे माध्यमं आपलं स्थान सोडून जनतेनं निवडून दिलेलं सरकार पाडण्याच्या मागे आहेत यापेक्षा अधर्मीय गोष्ट कुठली असेल?

या भूमिकेत निदान दोन धोके उद्‌भवतात. एक म्हणजे सर्वसामान्य जनतेनं वर्तमानपत्र वाचणं सोडून दिलं. त्यामुळेच ती तोट्यात जातात. दुसरं म्हणजे त्यांनी खरी बातमी जरी प्रसिद्ध केली तरी अविश्वासार्हतेमुळे लोक तिकडे दुर्लक्ष करण्याची भीती. कोल्हा पुढ्यात आल्याची बोंब अनेकदा खोटी आहे असं आढळून येताच तो खरोखरीच उगवला तर त्यावर कोण विश्वास ठेवणार? अमेरिकन लोकशाहीला लागलेलं हे ग्रहण चिंताजनक आहे.

वार्ताहार व चॅनलवाले आपल्या विधानांचा अनर्थ काढून चाहत्यांची दिशाभूल करतात हे ठाऊक असल्यामुळे ट्रंपसारखे ट्विटर वापरून आपले विचार सरळ जनतेपर्यंत पोहचवतात. तसंच त्यांनी निवडणूक होऊन अवघा एक महिना झाला न झाला की २०२०च्या निवडणुकीचा प्रचार करण्यास सुरुवात केली. त्यांच्या प्रचारसभेला तोबा गर्दी. त्यावेळी त्यांना आपल्या चाहत्यांशी नाळ जोडण्याची व प्रसारमाध्यमांवर आग पाखडण्याची संधी मिळाली. त्याचे चाहते त्यामुळे बेहद खुश झाले. एवढ्या लवकर पुर्ननिवडणुकीचं शिंग फुंकलं म्हणून काहींच्या भुवया वक्र झाल्या, पण त्यात काही नवल नव्हतं. ओबामांनीही तसंच केलं होतं हे कसं विसरता येईल. याला डार्विनचा एक सिद्धांत लागू पडतो. कुठल्याही प्रजातीला चिरकाल टिकण्याची उपजत प्रवृत्ती असते. राजकारणी मग ते अमेरिकन असो की भारतीय असो त्याला अपवाद कसे असतील? पण या प्रसारसभेमुळे ट्रंप पुनर्जिवित झाले यात वाद नाही.

ठिगळ लागलेल्या अमेरिकेच्या पत्रकारितेचे पडसाद जगभर उमटले व त्यांची ट्रंपविषयीची मतं कलुषित झाली. इथल्या मुख्य प्रवाहात असलेल्या न्यूयॉर्क टाईम्स, वॉशिंग्टन पोस्ट (वॉटरगेट प्रकरणामुळे प्रसिद्ध झालेले व सध्या 'ॲमेझॉन'चा संस्थापक जेफ बेझेसनी तोट्यात जात असल्यामुळे स्वस्तात विकत घेतलेलं.) यामधील पूर्वग्रहदूषित माहिती जगभरातील नियतकालिकांत छापली जाते. त्यामुळे त्यांच्या मनाची चुकीची जडणघडण होते. भारतात काही राष्ट्रीय दैनिकांनी अमेरिकन वार्तापत्रातला मजकूर जसाच्या तसा छापलेला मी वाचला आहे. त्यामुळे आपल्या वाचकांच्या मनातही ट्रंपविषयी चुकीची प्रतिमा निर्माण झाली, असं मला जानेवारी २०१७च्या भेटीत आढळून आलं. ट्रंप अण्वस्त्रावरची कळ दाबून सर्व जग उध्वस्त केव्हा करतील याचा नेम नाही अशी त्यांची धारणा झाली होती. हा जनमानस जेवढा चुकीचा तेवढा धोक्याचा आहे.

अमेरिकेत सरकार म्हणा नाहीतर सार्वजनिक संस्था म्हणा जनता त्यांना उत्तरदायी ठरवते, पण प्रसारमाध्यमांना कोण धारेवर धरतं? त्यांनी चुकीचं छापलं तरी कुणी उत्तरदायी ठरवत नाही. त्यांचा ग्राहकवर्गच ते काम करू शकतो. जनतेच्या मनात माध्यमांविषयी जो आदर असे तो आता पार लोप पावला आहे. एके काळी त्यांचा शब्द धर्मराजासारखा सत्याचा अंतिम अविष्कार समजण्यात येई, पण हल्ली ही विश्वासार्हता नष्ट झाली आहे. लोकांनी वृत्तपत्र वाचणं कमी केलं. त्यामुळे जाहिरातींचा स्त्रोत समाजमाध्यमांकडे वळून मुद्रित माध्यमं मरणासन्न स्थितीत जीवन कंठतात. भारतीय रेल्वेप्रमाणे वॉशिंग्टन पोस्ट व न्यूयॉर्क टाईम्स नेहमी तोट्यात जातात. त्यामुळे त्यांना कर्मचाऱ्यांची संख्या कमी करावी लागली. तरीही त्यांच्या खिशाला पडलेलं भोक बुजलं नाही. अपेक्षेप्रमाणे न्यूयॉर्क टाईम्स व ट्रंपमध्ये वैर आहे. ते त्या दैनिकाचा उल्लेख करताना 'मरणारं' (Failing) न्यूयॉर्क टाईम्स याचं

श्रोतृवर्गाला विस्मरण पडू देत नाही. पण त्याचा उलटा परिणाम होऊ लागला. अध्यक्षांचं शिक्कामोर्तब झालं की मग चांगलं की वाईट असो त्या वस्तूंचा खप हटकून वाढतो. ही जाहिरात फार प्रभावी ठरते. त्यामुळे 'मरणारं' हे विशेषण वापरलं तरी त्या नियतकालिकाचा खप अलिकडे वाढला. त्यापेक्षा अनुल्लेखानं त्याची अवहेलना केलेली बरी.

मग ते शस्त्र दैनिकं व चॅनलवाले का वापरत नाहीत? ट्रंपला दुर्लक्षित केलं व त्यांची विधानं आतल्या अडगळीत छापलीत तर ट्रंप निष्प्रभ होणार नाहीत का? असं केलं तर ते प्रसारमाध्यमांनाच आत्मघातकी ठरेल. एक म्हणजे ते कर्तव्यच्युत होतील व वाचकवर्ग किंवा प्रेक्षकवर्ग त्यांना संदर्भहीन समजेल. दुसरं म्हणजे मी मागच्या लेखात लिहिल्याप्रमाणे (शब्द रुची, फेब्रुवारी २०१७) ट्रंपमुळे नियतकालिकांचा खप व चॅनलवाल्यांचं रेटिंग (Rating) वाढतं असं आढळून आलं. अर्धनग्न स्त्रीपेक्षा ट्रंपचं चित्र वाचकांना जास्त आवडतं हे अनेकदा सिद्ध झालं. त्यामुळे ट्रंप वृत्तपत्रांना नावडते असले तरी दुर्लक्षित करू शकत नाही. पण त्यांच्याविषयी खोटंनाटं लिहून प्रतिमा कलंकित करण्याचं घटनात्मक स्वातंत्र्य माध्यमांना आहे. त्यांच्या प्रचारसभेला ते मोठ्या संख्येनं हजेरी लावतात. मग त्यांच्याकडे बोट दाखवून प्रसारमाध्यमं अप्रामाणिक व पूर्वग्रहित आहेत असं म्हणताच ट्रंपचे चाहते टाळ्या वाजवून त्यांना दुजोरा देतात. पण ट्रंपची आगपाखड एवढ्यावरून संपत नाही. ते माध्यमांना 'मानव' नसून 'दानव' असं संबोधतात. आपण 'अमानवी' आहोत हा अवमान ऐकण्याची माध्यमांना आता सवय झाली आहे. नवलाची गोष्ट म्हणजे अनेकांचा त्यावर विश्वास बसतो.

हे द्वंद्व बघून ट्रंपच्या पक्षातील काही बुद्रुकांनी अध्यक्षांनी संयम पाळावा असा सल्ला दिला. लोकशाहीसाठी माध्यमाचं स्वातंत्र्य राखणं आवश्यक आहे अशी त्यांनी मल्लिनाथी केली. पण ही नियम केव्हा लागू पडतो? जेव्हा माध्यमांनी आपल्या व्यावसायिकतेचा आदर करून कर्तव्य बजावलं तेव्हा. त्या गुणांची जेव्हा पायमल्ली होते तेव्हा माध्यमांना मिळालेल्या संविधानात्मक संरक्षणाच्या पडद्यामागे लपून बसता येईल का? अर्थातच नाही.

अमेरिकन माध्यमं ही बहुउद्देशीय मोठ्या कंपन्यांच्या मालकीची. ती जनतेपासून अलिप्त झाली असली तर नवल कसलं? त्यांना जनतेची दुखरी नस कधीच सापडली नाही. ती ट्रंपनी अचूक हेरली व त्यामुळे विजय मिळवला. याचं श्रेय माध्यमांनी ट्रंपना कधीच दिलं नाही. CNN ही वृत्तवाहिनी डाव्या मताची व उदारमतवादी म्हणून प्रसिद्ध आहे. तिला लोक क्लिंटन न्यूज नेटवर्क म्हणून संबोधतात कारण ती हिलरीच्या खिशात होती. त्या वाहिनीला ट्रंपविषयी एकही सकारात्मक बातमी प्रसारित करण्यासाठी अजून सापडली नाही. तिचा प्रेक्षकवर्ग संकुचित झाला असून नफा घटला. पण ते नेटवर्क टाईम वार्नर या बहुदेशीय कंपनीच्या मालकीचं. तिचे खिसे खोल असल्यामुळे तिला तोट्याची तेवढी झळ बसत नाही. आता हा मासा A.T.T. नावाचा मोठा मासा गिळणार. पण त्यासाठी शासनाची परवानगी लागते. माध्यमांचं केंद्रीकरण चांगलं नाही असं ट्रंपनी केव्हाच जाहीर केल्यामुळे CNN तशीच हवेत टांगत राहील हे उघड आहे.

ट्रंपविरुद्ध या ना त्या कारणांनी रोजच मोर्चे निघाल्याचं येथील दूरदर्शनवर बघायला मिळते. न्यूयॉर्कचा ट्रंप टॉवर व दाक्षिणात्य व्हाईट हाऊस समजल्या जाणारा मारा लागो हा पाम बीच, फ्लोरिडा येथील प्रासाद ही या मोर्चेवाल्यांची आवडती ठिकाणं. तिथे त्यांनी कायमचं ठाण मांडलं आहे. यावरून अमेरिका ट्रंपविरुद्ध वळली आहे असं परग्रहावरून आलेल्या कुणालाही वाटेल. पण हा अंदाज सर्वस्वी चुकीचा ठरेल. कारण हे मोर्चेवाले समाजाचे प्रातिनिधिक घटक नसून भाडोत्री आंदोलक आहेत हे इथली प्रसारमाध्यमं कधीच सांगत नाहीत. ट्रंपच्या धोरणाचा आंतरिक निषेध प्रकट करणारे यात कमी. कुठल्याही निवडणुकीत हारजीत असतेच. एकच पक्ष विजयी होऊ शकतो. पण डाव्यांनी हा पराभव कधीच निमूटपणे स्वीकारला नाही. मतदान झालं तरी आपला विरोध सुरूच ठेवला. विशेषत: डाव्या अब्जाधिशांनी दशलक्षावधी डॉलरचं दान देऊन हे मोर्चे आयोजित केले. याला अनेक पुरावे उपलब्ध आहेत. त्यातले अनेक पैशाची नड असलेले व अमेरिकेत अवैधपणे आलेले हिसपॅनिक. त्यांना पैसे दिले की ते हातात फलक घेऊन उभे. कशासाठी याचा त्यांना गंध नसतो. दुसरं म्हणजे त्यांचे फलक एकाच साचाचे व व्यावसायिकपणे तयार केलेले. म्हणजे ते त्यांना आयोजकांनी दिलेले. पण हे रहस्य वॉशिंग्टन पोस्ट किंवा न्यूयॉर्क टाईम्समध्ये कधीच वाचायला किंवा CNN वर ऐकायला मिळणार नाही.

याचाच लोकांना रोष आहे. टीका करणं हा साप कात टाकतो तसा पत्रकारितेचा गुणधर्म आहे हे कुणीही मान्य करेल. पण त्यामुळे अंध होणं हा रोग आहे. वास्तवाच्या दोन्ही बाजूंचं सम्यकदर्शन घडवण्याच्या भानगडीत न पडता आपलं पूर्वग्रहित घोडं दामटण्याला कुणीही पत्रकारविद्या म्हणणार नाही. त्याला प्रचार म्हणावा लागेल. खेदाची गोष्ट म्हणजे सध्या असं अमेरिकेत सुरू आहे. त्यापेक्षा जास्त खेदाची गोष्ट अशी की परदेशस्थित वाचकांना ते ठाऊक नाही. म्हणून वार्ताहार चिकित्सक दृष्टीनं न बघता जसंच्या तसं वाचकांच्या गळी उतरवतात. डाव्याचं जू भारतीयांनी नुकतंच झिडकारून उजव्या मताच्या मोदींना २०१४ मध्ये निवडून दिलं. युरोपमधे देखील डाव्यांची सळो की पळो झाली आहे. अमेरिकन मतदारांनी डाव्या हिलरीला धुडकावून उजव्या मताच्या ट्रंपला निवडून आणलं. याप्रमाणे डाव्यांचा समाजवाद सगळीकडे फसला. पण अमेरिकेतले डावे तो उचलून धरत आहे. ते फूल नसून धारदार चाकू आहे हे त्यांना अजून कळलेलं दिसत नाही. ज्योत विझण्यापूर्वी मोठी होते त्याचाच हा एक प्रकार.

अलीकडे या युद्धात दोन्ही बाजूंनी आपल्या तलवारी मान्यातून काढल्या. माध्यमांनी बनावटी बातम्या छापण्यास सुरुवात केली. या फेक (Fake) न्यूजमुळे ट्रंपच्या शासनाची प्रतिमा काळवंडली. लोकांची दिशाभूल व गोंधळ झाला. हे बघून ट्रंपनी माध्यमांना धारेवर धरलं. त्यांच्यावर काही निवडक विशेषणांची वृष्टी केली. त्यांचा एक मुद्दा असा की माध्यमांनी 'फेक' हा शब्द वगळून ट्रंपनी

'न्यूज'ला विरोधक आहे असं जनतेला भासवलं. म्हणजे त्यांनी माध्यमांच्या घटनात्मक स्वातंत्र्यावर गदा पाडली. ते जनतेला कसं आवडणार? ट्विटरवर वादळ सुरू करून माहिती थेट जनतेपर्यंत पोहचली व माध्यमांच्या अव्यावसायिकतेचं पितळ उघडं केलं. पण तेवढ्यावर ते थांबले नाहीत. त्यांनी उट्टं काढण्यासाठी दुसरं खड्ग उपसलं. त्यामुळे हे प्रकरण अजूनच भडकलं.

जवळजवळ सगळ्या मोठ्या दैनिकांचे, चॅनलवाल्यांचे व वार्ताकंपन्यांचे (AP, Reuters वगैरे) प्रतिनिधी २४ तास व्हाईट हाऊसजवळ ठाण मांडून बसलेले असतात. व्हाईट हाऊस म्हणजे जगाचं सत्ताकेंद्र. इतिहासाचा एकही क्षण हातातून सुटू नये म्हणून हा वार्ताहरांचा रात्रंदिवस पहारा. त्यांचा एक संघ असून वॉशिंग्टनमध्ये दरवर्षी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आखण्यात येतो. त्यावेळी पत्रकारितेत नवीन रक्त आकर्षित करण्यासाठी निधी उभारण्यात येतो. त्यातून शिष्यवृत्त्या वाटण्यात येतात. पण सर्वसाधारण माणसाला या संमेलनात लसणाची लागवड कशी करावी या अधिवेशनापेक्षा जास्त रस नसतो. तो वाढावा म्हणून या जेवणाला प्रतिष्ठित लोक, वॉशिंग्टनमध्ये सत्ता गाजवणारे व महत्त्वाचं म्हणजे हॉलिवूडमधल्या अभिनेत्री व अभिनेते बोलावण्यात येतात. त्यामुळे या प्रसंगाला ऑस्करचं रूप येतं. पण या सर्वात जास्त महत्त्वाचा पाहुणा म्हणजे राष्ट्राध्यक्ष. एकमेकातील उपजत कलह घटकाभर विसरून दोन विरुद्ध पक्ष खेळीमेळीनं एकत्र येतात. त्यावेळी अध्यक्ष महाराज जे नर्मविनोदी टोले मारतात ते ऐकण्यास प्रेक्षकच नव्हे तर सर्व जनता उत्सुक असते. १९२०च्या सुमारास सुरू झालेली ही प्रथा आजपावेतो सुरू होती. १९८१ मध्ये अध्यक्ष रेगनवर गोळीबार झाल्यामुळे ते हजेरी लावू शकले नाही. तरी पण त्यांनी टेलिफोनवर बोलून प्रथा अखंडित ठेवली.

यावेळी (फेब्रुवारी २०१७) ट्रंपनी आमंत्रण येण्यापूर्वीच आपण हजेरी लावणार नाही म्हणून ट्विटरवर घोषित केलं. या घणाघाती घावामुळे माध्यमाचं कंबरडंच मोडलं. प्रमुख पाहुणाच नसेल तर तो कार्यक्रम कोण बघणार? दोघातील दरी व दुरावा अधिकच वाढला.

नमतं घेण्याचं ट्रंपच्या जनुकात नसल्यामुळे ही खडाजंगी कुठपर्यंत टिकेल हे सांगणं कठीण. कुणी म्हणतं हा कलह ट्रंपच्या कारकिर्दीचं एक व्यवच्छेदक लक्षण ठरेल. त्यांनी जनतेला दिलेली आश्वासनं पूर्ण केली तर ते मतदारांना वश करून पुन्हा निवडून येतील आणि माध्यमं तोंडघशी पडतील. ती कुणाला न सांगता आपला पावित्रा बदलतील. पण ट्रंपना या वाटचालीत ठेच बसली तर त्यांचे पाय खाली ओढण्यात माध्यमांना आनंदच होईल.

सध्या ट्रंपची लोकप्रियता ४०-४५च्या आसपास आहे असं अनेक सर्वेक्षणात आढळून आलं. म्हणजे त्यांची नापसंती पसंतीपेक्षा जास्त आहे. पण याच पोलिंग संस्थांनी ट्रंपचा निवडणुकीत पराभव होणार असा नि:संदिग्ध निर्वाळा दिल्यामुळे त्यांच्यावर कुणी विश्वास ठेवत नाही हे विशेष.


(**'ट्रंप : एक वादळी जीवनपट'** या लेखकाच्या 'ग्रंथाली' प्रकाशित आगामी पुस्तकातून)

**– डॉ. अनंत पां. लाभसेटवार** (Ph.D.)
anantlabh@gmail.com
(लेखक 'फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी', कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं 'चेअरमन ऑफ दी बोर्ड' होते.)

ग्रंथाली


अनुराधा गोरे लिखित
'अनंत आमुची ध्येयासक्ती'

''तिरंगा फैराकर आयेंगे या तिरंगेमें लपेटकर'' असं अभिमानानं सांगणाऱ्या सैनिकांपैकी काही जणांच्या वाट्याला येतं अपंगत्व पण नेहमीच केवळ जिंकण्याचंच प्रशिक्षण मिळालेले आमचे सैनिक या आपत्तीवर मात करतात. सन्मानाचं आयुष्य जगतात. इतरांचे आदर्श बनतात. अशा आमच्या खास सैनिकांच्या यशोगाथा आपण या पुस्तकात वाचूया आणि त्यांना हे बळ देणाऱ्या QMTI या संस्थेची पण ओळख करून घेऊया. त्यांच्याप्रमाणे आपणही म्हणूया ''अनंत अमुची ध्येयासक्ती...'' कारण भारतमातेला पुन्हा सुवर्णभूमी बनवण्याची जबाबदारी तुमची-आमची साऱ्यांची आहे.




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

संजीवकुमार सोनावणे
लिखित गांव कुठे आहे?




**मूल्य १२० रु.**
**सवलतीत ७५ रु.**

दलित कथा स्वतःच्या अन्याय, अत्याचार, व्यथा-वेदनेची मांडणी करते आहे हे आजवर उच्च स्वरानं म्हटले जायचे; पण डॉ. संजीवकुमार सोनवणे यांनी त्यांच्या कथांतून सर्वच थरातील माणसांच्या व्यथा अधोरेखित केल्या आहेत. आशय आणि विषयांचा परीघ वाढविलेला आहे हे आपल्या लक्षात येईल. त्यांच्या कथा अशाच दमदार वाटचाल करीत राहतील अशी अपेक्षा करूया.

# रंग 'झी' मालिकाविश्वाचे...

**'झी मराठी'वरील मालिका, त्यांच्यातील व्यक्तिरेखा आणि ती साकारणारे कलावंत म्हणजे प्रत्येक कुटुंबाचा अविभाज्य भागच! या मालिकांच्या रंगांची झलक आता 'शब्द रुची'तून भेटीला येणार आहे. वाचनसंस्कृतीच्या जतन-संवर्धनात 'झी'ने पुढे केलेला हात मोलाचा आहे.**

### राधिका आहे छोट्या पडद्यावरची आदर्श आई



**टी**आरपीचे उच्चांक गाठलेली झी मराठीवरील लोकप्रिय मालिका 'माझ्या नवऱ्याची बायको'मधील राधिका या व्यक्तिरेखेने प्रेक्षकांच्या मनात घर केलं आहे. या मालिकेला प्रेक्षकांनी सुरुवातीपासूनच पसंती दर्शवली तसेच या मालिकेतील प्रत्येक पात्र महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचले आहे. राधिका या व्यक्तिरेखेच्या प्रेक्षकांनी आदर्श सून, आदर्श पत्नी, आदर्श बहीण आणि आदर्श आई या सर्व छटा पाहिल्या. मुलाच्या उत्तम भविष्यासाठी तिला अर्ध्या वाटेत सोडून गेलेल्या गुरुनाथच्या नाकावर टिच्चून स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याची जिद्द राधिकाने दाखवली. स्वतःच्या पायावर उभी राहून कुटुंबाचं पालनपोषण करणाऱ्या या छोट्या पडद्यावरच्या आईने अनेक स्त्रिया आणि आईंसमोर एक आदर्श ठेवला आहे. स्वाभिमान आणि स्वावलंबनाचा धडा राधिकाने सर्वांना शिकवला. मातृदिनानिमित्त राधिकाचं पात्र साकारणाऱ्या अनिता दातेने तिची आदर्श असलेल्या तिच्या आईबद्दल सांगितलं, आईपण म्हणजे काय हे जाणून घेण्यासाठी मी नेहमीच माझ्या आईकडे बघत आले. माझी आई अत्यंत केअरिंग आहे. मातृत्वाचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे काळजी करणं, आपला विचार करण्याआधी आपल्या मुलांचा विचार करणे. ही वृत्ती मी सातत्यानं माझ्या आईमध्ये पाहिली. माझ्या आईसाठी आम्ही मुली म्हणजेच तिचं विश्व होतो. प्रत्येक आई आपल्या मुलाला तितकंच प्रेम करते वेळप्रसंगी आपल्या मुलाने काही चूक केली तर त्याला आई ओरडते त्याच्यावर चिडते पण ते सर्व क्षणिक असतं. तिच्या ओरडण्यामध्ये देखील काळजी असते. आपल्या मुलाने चांगलं वागावं आणि चूक करू नये म्हणून ती चिडते. त्यामुळे आई ही जितकी प्रेमळ तितकीच कठोर देखील असते. जेव्हा मी छोट्या पडद्यावर अथर्वची आई साकारते तेव्हा मी नेहमी माझ्या आईला डोळ्यासमोर आणते आणि तिच्याप्रमाणे वागायचा प्रयत्न करते.

### तरुण मुलांनी आर्मी यावं



'जिथे मराठी तिथे झी मराठी' या धोरणाला केंद्रस्थानी ठेवून झी मराठी ही नुसती वाहिनी राहिलेली नसून ती प्रत्येक मराठी कुटुंबाचा एक अविभाज्य घटकच बनली आहे. 'झी मराठी'वरील लोकप्रिय मालिका 'लागिरं झालं जी'ला प्रेक्षकांनी भरभरून प्रेम दिलं. अज्या आणि शीतलीसोबत मालिकेतील प्रत्येक पात्र प्रेक्षकांच्या मनात घर करून बसलं आहे. आपल्या घरातीलच वाटावा असा युवक, म्हणजे अजिंक्य शिंदे याचा एका सामान्य मुलापासून फौजी होण्याचा प्रवास या मालिकेतील पूर्ण होताना दाखवला आहे. आर्मीचं प्रशिक्षण घेण्यासाठी नऊ ते दहा महिन्यांचा कालावधी लागतो. तेवढाच कालावधी अजिंक्यच्या जडणघडणीसाठी मालिकेमध्ये लागला आहे. या मालिकेविषयी आणि अजिंक्यच्या व्यक्तिरेखेविषयी अभिनेता नितीश चव्हाण सोबत साधलेला हा संवाद.

*१. फौजीची भूमिका साकारणं किती आव्हानात्मक आहे आणि यासाठी तुला काय मेहनत घ्यावी लागली?*

– मी अभिनय क्षेत्रात येण्यापूर्वी डान्सर होतो आणि त्यामुळे माझी अनेक लोकांशी ओळख होती. यातून मला 'लागिरं झालं जी' मालिकेच्या ऑडिशनबद्दल समजले, मग मी ऑडिशन दिले. खरं तर एकांकिकांमधून अभिनय साकारत होतो. त्यामुळे हे ऑडिशन दिले आणि यात निवड देखील झाली. फौजीची भूमिका साकारताना

फार कष्ट करावे लागले आहेत. अजून सुद्धा हाच प्रयत्न चालू आहे कारण एक फौजीची भूमिका साकारणं हा थोडं वेगळा अनुभव आहे.

*२. 'लागिरं झालं जी' या मालिकेद्वारे कोणता संदेश तू तरुणाईला देऊ इच्छितोस?*

– खरंच..अभिनय खूप काही शिकवून जातो. या मालिकेतून आम्हाला आजच्या तरुणाईला नक्कीच एक महत्त्वपूर्ण संदेश द्यायचा आहे. हल्लीच्या मुलांना कॉर्पोरेट जॉब हवे असतात पण आपल्या देशासाठी जगणं आणि मातृभूमीसाठी काम करणं देखील किती गरजेचं आहे हे यातून आम्हाला सांगायचं आहे. फार कमी लोक आर्मीत येतात तर तरुण मुलांनी आर्मीत यावं हाच संदेश आम्हाला लोकांना आमच्या प्रेक्षकांना द्यायचा होता आणि आम्ही यात यशस्वी झालो आहोत, असं मला वाटतं. आम्हाला भेटायला येणारी अनेक मुलं आम्ही पण पुढे फौजी होणार, आर्मीत जाणार असं सांगतात हे ऐकून समाधान वाटतं.

*३. मालिकेत आता कुठला अनोखा ट्विस्ट प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे?*

– प्रेक्षकांनी नुकतंच मालिकेत शीतल आणि अज्याचं लग्न तसेच त्यांनी सोबत घालवलेले सुखाचे क्षण पाहिले. पण अजिंक्यला आता पोस्टिंगचं पत्र आलेलं आहे, त्यामुळे नव्या-नव्या संसारातून बाहेर पडून आता अजिंक्यला परत कामावर रुजू व्हायची तयारी करायची आहे.

*४. अभिनयक्षेत्रात येण्यापूर्वी कुठे काम केलं आहेस?*

– माझी स्वत:ची डान्स अ‍ॅकडमी आहे. अ‍ॅकडमीच्या माध्यमातून मी माझ्या करियरला सुरुवात केली. नाटक, एकांकिका यातून माझ्या अभिनयाला सुरुवात झाली. एक डान्सर म्हणून मी शाळा आणि बऱ्याच ठिकाणी कोरियोग्राफर म्हणून काम केलं.


*५. वैयक्तिक आयुष्यात तुला नक्की कोण बनायचं होतं?*

– जरी मालिकेत मी फौजी असलो तरी खऱ्या आयुष्यात डान्सिंगची आवड असल्यामुळे डान्सर म्हणून एक स्वत:ची ओळख निर्माण करायची होती. पण आता एक कलाकार म्हणून काम करतोय हे सुद्धा खूप जास्त आवडतं काम आहे.

*६. पहिलं प्रेम डान्स की मालिका?*

– हे सांगणं थोडं कठीण आहे. कारण दोन्ही रोल हे आयुष्यात फार महत्त्वाचे आहेत. डान्स विसरू शकत नाही आणि मालिकेमुळे एक मला ओळख मिळाली आहे, म्हणून दोन्ही फार जवळचे आहेत.

## शालू वहिनींच्या फिटनेसचे रहस्य



फिट राहण्याबाबत सध्या सगळेच जागरूक आहेत. लठ्ठपणा असो वा नसो पण कायम फिट आणि हेल्दी राहणं गरजेचं आहे. या फिट राहण्याच्या फंड्यामध्ये सेलिब्रिटीही काही मागे नाही. फिटनेस म्हणजे कलाकारांचा वीक पॉइंट असतो हे आपणा सर्वांना माहिती आहे. 'झी मराठी'वरील 'हम तो तेरे आशिक है' या लोकप्रिय मालिकेतील शालू वहिनी म्हणजेच अभिनेत्री माधवी नेमकरच्या बाबतीत देखील असंच काहीसं आहे. मालिकेत शालूला फिटनेसच प्रचंड वेड आहे आणि त्यासाठी ती झुंबा डान्सच्या कार्यशाळा देखील घेते हे प्रेक्षकांनी पाहिलंच आहे पण माधवी खऱ्या आयुष्यात देखील तितकीच फिटनेसबाबत जागरूक आहे. फिट राहण्यासाठी माधवी नियमित योगा करते. माधवीच्या फिट राहण्यामध्ये योगविद्येचे मोलाचे योगदान असून ती तिच्या सोशल मीडिया अकाउंट्सवर देखील तिच्या योगा पोझेसमधील फोटो चाहत्यांना पाहायला मिळतात. 'वर्ल्ड योगा डे'च्या निमित्ताने माधवीने तिचा हा फिटनेस फंडा तिच्या प्रेक्षकांसोबत शेअर केला आहे. माधवी म्हणाली, ''वयानुसार येणारे शारीरिक आजार, आजच्या धावपळीच्या युगात नोकरी, व्यवसाय, शिक्षण यामुळे निर्माण होणारे ताण-तणाव किंवा तत्सम समस्यांवर 'फिटनेस' हा एकच उपाय आहे. किंबहुना, निरोगी आणि सुंदर आयुष्यासाठी.

'फिटनेस' हीच गुणवत्ता आहे. त्यामुळे 'फिटनेस' ही आपली 'जीवनशैली' झाली पाहिजे. 'फिट' तर 'हिट'! मी योगा गेली ४ वर्ष करतेय आणि हेल्दी डाएट गेली ८ वर्ष करतेय. योगविद्येचे अनेक फायदे आहेत. योगामुळे फक्त शरीर लवचिक होत नाही तर आजकालच्या धकाधकीच्या जीवनात आपण जो स्ट्रेस अनुभवतो तो देखील योगामुळे कमी होतो तसेच योगामुळे मानसिक शांतीदेखील प्राप्त होते.

### हा आहे राणादाचा फिटनेस फंडा



टीआरपी सोबतच लोकप्रियतेचं शिखर गाठलेल्या 'तुझ्यात जीव रंगला' या झी मराठीवरील रसिक प्रेक्षकांच्या आवडत्या मालिकेने नुकतंच ५०० भागांचा टप्पा पार केला. राणादा आणि पाठकबाई यांच्यावर सबंध महाराष्ट्रातील तमाम प्रेक्षक प्रेमाचा वर्षाव करतात. ऑन स्क्रीन भोळा तसेच रांगडा दिसणारा पहेलवान पठ्ठा राणादा ऑनस्क्रीन अगदी खरा पहेलवान कुस्तीपटू दिसण्यासाठी त्याच्या फिटनेस आणि डाएटकडे खूप लक्ष देतो.

त्याचा फिटनेस फंडा शेअर करताना राणादा म्हणजेच अभिनेता हार्दिक जोशी म्हणाला, मी शूटिंग संपल्यानंतर नियमितपणे जिमला जातो. जिमला जाणं मी कधीच टाळत नाही तसेच वर्कआऊट करताना मी एकाच अवयवावर लक्ष केंद्रित न करता संपूर्ण शरीराचा व्यायाम करतो. चपळपणासाठी मी योगादेखील करतो त्यामुळे शरीराला स्टिफनेस येत नाही. तसेच तालमीचे सीन शूट करताना सूर्यनमस्कार करावे लागतात तसेच डीप्स मारावे लागतात त्यामुळे हे व्यायाम जास्त करण्याकडे माझा भर असतो. हा झाला व्यायामाचा भाग, पण त्यासोबतच डाएट करणंदेखील तितकंच महत्त्वाचं आहे. राणादा हा एक पहेलवान असल्यामुळे त्याची शरीयष्टी ऑनस्क्रीन चांगली दिसली पाहिजे म्हणूनच व्यायामासोबत डाएटवर देखील मी कटाक्षाने लक्ष देतो. माझ्या रोजच्या आहारात पाव लिटर दूध, १ लिटर ताक, १५-२० अंडी आणि मांसाहार यांचा समावेश असतो.

राणादा या व्यक्तिरेखेला सुंदररित्या साकारण्यासाठी हार्दिक घेत असलेली मेहनत वाखाणण्याजोगी आहे.

---


**पद्मश्री दया पवार प्रतिष्ठान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (मुंबई) आणि ग्रंथाली प्रकाशन आयोजित**

**'बलुतं'ची चाळिशी आणि**
**दया पवार स्मृति पुरस्कार वितरण समारंभ**
गुरुवार, २० सप्टेंबर २०१८
सकाळी १०.०० ते सायं. ६.००
स्थळ - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०००२१

**पहिले सत्र**
सकाळी १०.०० ते दुपारी १.०० पर्यंत
सकाळी १०.०० वा. उद्घाटन - हस्ते डॉ. रावसाहेब कसबे
प्रास्ताविक - दत्ता बाळसराफ
सकाळी १०.२० वा.
चर्चासत्र - बलुतंची चाळिशी
अध्यक्ष - दिनकर गांगल
संभावित वक्ते - डॉ. रावसाहेब कसबे, सुशीलकुमार शिंदे, रामदास फुटाणे आणि जेरी पिंटो

**दु. १२.२० वा. दया पवार स्मृति पुरस्काराचे वितरण**
पुरस्कार्थी - सयाजी शिंदे
पत्र वाचन - अरविंद जगताप
हस्ते - सुशीलकुमार शिंदे
मनोगत - सयाजी शिंदे

**दुसरे सत्र**
दुपारी १.३० ते संध्याकाळी ४.३०
दया पवार स्मृति पुरस्काराचे वितरण
पुरस्कार्थी - राहुल कोसंबी
परिचय - उदय रोटे
हस्ते - डॉ. रावसाहेब कसबे
मनोगत - राहुल कोसंबी

**चर्चासत्र - दलित बिलीत संवेदनाचा येळकोट मांडियेला**
अध्यक्ष - मनोहर जाधव
संभावित वक्ते - राहुल कोसंबी, सतिश वाघमारे, सुदाम राठोड, अवधुत डोंगरे, शिल्पा कांबळे

**दया पवार स्मृति पुरस्काराचे वितरण**
पुरस्कार्थी - आनंद विंगकर
परिचय - शर्मिष्ठा भोसले
हस्ते - रामदास फुटाणे
मनोगत - आनंद विंगकर

**तिसरे सत्र**
सायं. ४.३० ते ६.००
विषय - बाई मी धरण बांधिते
सादरीकरण - सौमित्र, प्रज्ञा दया पवार आणि रसिका आगाशे

**आभारप्रदर्शन - हिरा दया पवार**

# 'लाखो इथले गुरू' पुस्तकप्रकाशन

ख्यातनाम गोखले एज्युकेशन सोसायटीच्या आर. एम.भट. ह्या प्रथितयश शाळेच्या शतकपूर्तीनिमित्त शनिवार १ सप्टेंबर २०१८ रोजी भव्य असा शतकमहोत्सवी सोहळा शाळेच्या सभागृहात पडला. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्याशिवाय मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, खासदार संजय राऊत, खासदार अरविंद सावंत, व आमदार अजय चौधरी, त्याचबरोबर संस्थेचे सेक्रेटरी डॉ. मो. स. गोसावी ह्या मान्यवरांच्या उपस्थितीत हा शानदार सोहोळा यशस्वीरीत्या पार पडला.

ह्या सोहळयाचे उल्लेखनीय वैशिष्टच म्हणजे शाळेच्या शतकमहोत्सवाचे औचित्य साधून शाळेच्या 'गुरुदक्षिणा' ह्या माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेने शाळेला दिलेली अपूर्व अशी गुरुदक्षिणा. ह्या संघटनेने ३ वर्षांपूर्वी पाहिलेले 'व्हिजन २०१८'चे स्वप्न, शाळेचा बहुतांश कायापालट करून साकार केलं आहे. पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक वर्गांचे नूतनीकरण, डिजिटल क्लासरूम त्याचबरोबर शिक्षकांच्या खोल्या व स्वच्छतागृहांचे नूतनीकरण, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची अद्ययावत सोय,वॉटर रूम, कॉम्पुटर लॅब व लायब्ररी ह्यासारखी कामे पूर्ण केली आहेत. मोठे शुल्क आकारणाऱ्या एखाद्या खाजगी शाळेत पाहायलाही न मिळणाऱ्या सोयीसुविधा ह्या संघटनेने आपल्या नंतरच्या पिढीसाठी शाळेत उपलब्ध करून दिल्या आहेत. तन-मन-धन अर्पून, दिवसरात्र धडपड करून विद्यार्थ्यांनी शाळेसाठी केलेलं हे अजोड कार्य हा शिक्षणक्षेत्रातील एक चमत्कारच म्हणावा लागेल. ह्या त्यांच्या कार्यात शाळेच्या आजी माजी शिक्षकांचाही तेवढाच वाटा आहे. शतकमहोत्सवाच्या औपचारिक कार्यक्रमापेक्षा विद्यार्थ्यांनी केलेले हे चिरस्थायी कार्य चिरस्मरणीय असेच आहे.

'ग्रंथाली'साठी ह्या सोहोळ्यातील आनंदाची गोष्ट म्हणजे ह्याच शाळेचे माजी निवृत्त शिक्षक फ्रान्सिस डिमेलो ह्यांनी शाळेच्या आठवणींवर लिहिलेले आणि 'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केलेले 'लाखो इथले गुरु' ह्या पुस्तकाचे प्रकाशन, माननीय उद्धवजी ठाकरे ह्यांच्या शुभहस्ते आणि इतर मान्यवरांबरोबरच गुरुदक्षिणा संस्थेच्या अध्यक्षा प्रतिमा जोशी व ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर ह्यांच्या उपस्थितीत पार पडले. शिक्षणक्षेत्रात ह्या पुस्तकाचे बऱ्यापैकी स्वागत होईल अशी आशा आहे.


**तुमच्या गावाची कहाणी तुमच्याच शब्दांत!**

'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन'च्या 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' वेबपोर्टलवर गावोगावसंबंधीचे लेखन संकलित करण्याच्या दृष्टीने अभिनव स्पर्धा योजली आहे. तीमध्ये वाचकांनीच त्यांच्या गावाबद्दल लिहावे अशी अपेक्षा आहे. 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन'कडे येणाऱ्या एकून लेखांमधून तीन उत्कृष्ट लेखांची निवड करण्यात येईल. त्या लेखांना अनुक्रमे तीन हजार रुपये, दोन हजार रुपये व एक हजार रुपये असे पुरस्कार दिले जातील. त्याखेरीज जे लेख वेबपोर्टलवर प्रसिद्धीसाठी स्वीकारले जातील त्यांना प्रत्येकी पाचशे रुपयांचा पुरस्कार दिला जाईल.

'गाव' या संकल्पनेमध्ये मुंबईसारख्या महानगरापासून स्थायी स्वरूपाच्या वाडीवस्तीपर्यंत सर्व तऱ्हेच्या ग्राम प्रकारांचा समावेश होतो. त्यामुळे वाचकांनी त्यांच्या, त्यांना ममत्व वाटणाऱ्या गावाबद्दल लेख मोकळेपणाने हजार-बाराशे शब्दांपर्यंत लिहावा. लेखनात गावाच्या वर्णनासोबत भूगोल, इतिहास, ग्रामदेवता, गावाच्या परंपरा, पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तू, तेथील मानवी कर्तबगारी आणि संस्थात्मक कामे या घटकांचा उल्लेख अवश्य असावा. नमुना म्हणून 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' वेबपोर्टलवर 'गावगाथा' या सदरात काही गावांची माहिती दिली आहे. ती पाहून घ्यावी. ती वर्णने आदर्श व माहितीने पुरेशी समावेशक आहेत असे मानू नये. तो केवळ नमुना आहे.

इच्छुक व्यक्तींनी त्यांचे लेख २०, सप्टेंबर २०१८ पर्यंत 'व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन'कडे पाठवावेत. ते लेख हस्तलिखित स्वरूपात पोस्टाद्वारे किंवा संगणकावर टाईप करून इमेलने पाठवता येतील. इमेल – infothinkmaharashtra.com

'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम' महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील कर्तबगार व्यक्ती, संस्था आणि ग्रामीण संस्कृतीचे संचित अशा तऱ्हेची माहिती २०१० सालापासून संकलित करत आहे. त्या प्रयत्नांतून 'थिंक महाराष्ट्र'वर तीन हजारांहून अधिक लेख प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

संपर्क – 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम', २२ मनुबर मॅन्शन, पहिला मजला, १९३ आंबेडकर रोड, चित्रा सिनेमासमोर, दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४ ● फोन : ९८९२६११७६७/०२२२४१८३७१०/०२२२४१३१००९ ● इमेल – infothinkmaharashtra.com

# असा ‘स्मृतिगंध’ दरवळला

कमी शब्दात भावना व्यक्त करायच्या म्हणजे कवितेशिवाय दुसरा पर्याय नाही. अनुभव, निरीक्षण, प्रचंड वाचन या सर्व गोष्टी एकत्र आल्या की कविता मनात डोकवायला लागते. काही ओळींचा जन्म होतो आणि मग आणखीन काही ओळी मनात घर करायला लागतात. कविता पूर्ण झाल्याची खात्री झाली की ती कागदावर उतरते. कवितेला वयाचे बंधन नसते. त्या-त्या काळात जे अनुभवले, पाहिले ते लिखाणातून व्यक्त होते. ‘ग्रंथाली’ ने नुकताच वर्षा पवार यांचा ‘स्मृतिगंध’ हा काव्यसंग्रह ठाण्यातील मराठी ग्रंथ संग्रहालयात प्रकाशित केला. ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक चांगदेव काळे तसेच रेडिओ जॉकी आणि मराठी साहित्याच्या अभ्यासका मधुरा प्रभू यावेळी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.


वर्षा पवार यांनी अडतीस वर्षे त्यांनी ज्ञानदानाचे कार्य केले. शिक्षिका म्हणून योगदान दिल्यानंतर शेवटच्या टप्प्यात मुख्याध्यापिका हे पदही त्यांनी भूषविले. शिक्षिका आणि गृहिणी असा प्रदीर्घ प्रवास करत असताना या प्रवासात ज्या समस्या उद्भवल्या, जाणवल्या, काहींनी आनंद दिला अशा कितीतरी गोष्टींचे विवेचन अंतरंगात घुटमळत होते. ते शब्दांनी व्यक्त करायचे असेल तर काव्य हा त्यांना जवळचा काव्यप्रकार वाटला. कवितेविषयी फारसा अनुभव नसताना जे मनात आले कागदावर उतरवले. परंतु ते संग्रही ठेवावे ही भावना त्यांच्या मनात कधीच आली नाही. क्षणिक आनंद घ्यायचा आणि कागदाचा गोळा करून तो भिरकावायचा, कधी रस्त्यात, कधी कचऱ्याच्या डब्यात तर कधी अडगळीत. ही त्यांची वृत्ती त्यांच्या भगिनी वर्षा सिनकर यांना नेहमीच त्रास देणारी होती. गंमतीने ती त्यांनी बोलूनही दाखवली, पण त्याचा फारसा काही परिणाम झाला नाही. सांगायला कागदावरचे ते शब्द असले तरी त्यात अर्थ होता, ज्ञान होते, जगण्याचे साधन होते, समजून घेण्याची ताकद होती. पुढे मागे ते कवितासंग्रहाच्या निमित्ताने पुढे यावे ही बहिण वर्षा सिनकर यांची इच्छा होती. मधुरा प्रभू त्यांच्याच मदतीने ‘ग्रंथाली’पर्यंत पोहोचल्या. कविता ही कविता असते. त्याच्या पाठीमागची प्रतिभा महत्त्वाची असते. कोण व्यक्त करतो या गोष्टीला ‘ग्रंथाली’ने फारसे महत्त्व दिलेले नाही. वर्षाताई यांच्या साध्यासरळ एकनिष्ठ प्रवासाच्या या कविता साक्षीदार आहेत म्हटल्यानंतर ‘ग्रंथाली’चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी हे पुस्तक प्रकाशित करण्याची तयारी दाखवली आणि ते सुबक, सुंदर होण्यासाठी कार्यक्रमाच्या संयोजिका धनश्री धारप यांनी पुढाकार घेतला.

‘पुस्तकात स्मृती जरी असल्या तरी या स्मृती नात्यातल्या, मैत्रीतल्या, समाजातल्या, कुटुंबातल्या आहेत की ज्या प्रत्येकामध्ये गंध दडलेला आहे. ते कवितासंग्रह वाचताना जाणवते’, असे मत साहित्यिक चांगदेव काळे यांनी व्यक्त केले. लेखनाची जिज्ञासा असणाऱ्या किंवा कवी मनाच्या माणसाने जवळ कागद बाळगला पाहिजे. जे मनात आले ते कागदावर उतरवले पाहिजे हे सांगताना मराठीतील अजरामर गाण्यांची निर्मिती कशी झाली याचे अनेक किस्से त्यांनी यावेळी सांगितले. या पुस्तकाला प्रस्तावना लिहिणाऱ्या मधुरा प्रभू यांनी रामायण, महाभारत यातील संदर्भ देत कवितासंग्रह किती वाचनीय आहे हे आपल्या भाषणात मांडले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नंदिनी नंदकुमार पाटील यांनी केले. प्रकाशित करण्यात आलेल्या कवितासंग्रहात एकूण ६९ कवितांचा समावेश आहे. ‘ग्रंथाली मुद्रण सुविधा केंद्रा’तर्फे हे पुस्तक प्रकाशित केलेले आहे. सतीश भावसार यांनी आकर्षक असे मुखपृष्ठ केले आहे.

ग्रंथाली

## वर्षा पवार लिखित ‘स्मृतिगंध’




**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रुपये**

खरंतर सच्च्या कवीच्या अंतरंगात दाटून आलेल्या भावनांची कारणं शोधणं कठीणच असतं. अनेक भावनांचं वादळ या मनात असतं आणि अचानक वीज चमकावी तशी कविता रूतून जाते. वर्षाताईंच्या भाषेत सांगायचं झालं तर गगनांतरी वेगे सौदामिनी ही आज चमकली आवेगे मंगलमय हा क्षण भासला मजला... खरंच प्रतिभेची सौदामिनी अंतरी चमकणं हा कवीच्या जीवनातील सर्वांत आनंददायी क्षण असतो. खरंतर कुठल्याही सच्च्या कवीच्या लेखणीतून शब्दसुमनं फुलायला लागली की गंध हा दरवळतोच! पण हा दरवळ जेव्हा रसिकमनांपर्यंत जाऊन पोहोचतो तेव्हा त्या लेखणीचे हेतुलाघव खऱ्या अर्थाने सार्थकी लागतात.

– मधुरा प्रभू

## मेहता पब्लिशिंग हाऊस

**घाचर घोचर**
**विवेक शानभाग**
**अनुवाद : अपर्णा नायगावकर**




### अंतर्मुख करणारी वास्तव कादंबरी

'पैसा आला की माणुसकी संपते,' 'पैशामुळे नाती तुटतात' अशी विधानं सर्रास ऐकायला मिळतात आणि एक प्रश्न नेहमी मनात उभा राहतो, की पैशाचा माणुसकीशी आणि नात्यांशी काय संबंध? पण या प्रश्नाचं उत्तर सोपं नाही. या प्रश्नाच्या अनुरोधाने जाणारी विवेक शानभाग यांची 'घाचरघोचर' ही कादंबरी वास्तवतेचा प्रत्यय देते. प्रथमपुरुषी निवेदनातून पुढे सरकणारी ही कादंबरी अन्य कन्नड साहित्यकृतींप्रमाणे साधेपणातून मोठा आशय कलात्मकतेने व्यक्त करताना दिसते.

या कादंबरीचा निवेदक आजच्या बंगळूरू शहरात राहणारा एक तरुण आहे. त्याच्या आवडीचं ठिकाण म्हणजे एक ठराविक कॉफी शॉप. या कॉफी शॉपमध्ये येऊन तो बराच वेळ घालवत असतो. त्याच्या निवेदनातून या कादंबरीचं कथानक उलगडत जातं. आधी एका जुन्या घरात (ज्या घरात प्रचंड मुंग्या असतात आणि त्या अनेक उपाय करूनही जात नसतात) अशा घरात या कादंबरीचा निवेदक म्हणजेच नायक त्याचे आईवडील, मोठी बहीण मालती, धाकटा काका चिक्कप्पा यांच्यासह राहत असतो. थोड्या पैशांतही हे कुटुंब सुखाने राहत असतं. अशातच या नायकाच्या वडलांना नोकरीतून सेवापूर्व निवृत्ती घ्यावी लागते. घरात कमावते ते एकटेच असतात. त्यांना दुसरी नोकरी शोधायला लागणार असते; पण चिक्कप्पा त्यांचा हा प्रश्न सोडवतो. नायकाच्या वडिलांना जो प्रॉव्हिडंट फंड मिळालेला असतो, त्याच्यात बँकेच्या कर्जाची भर घालून चिक्कप्पा 'सोना मसाले' नावाचा उद्योग सुरू करतो. त्याच्या मेहनतीमुळे या कुटुंबाची भरभराट होते आणि ते नवीन घरात राहायला जातात. तिथे गेल्यावर नायकाचं लग्न अनिता नावाच्या मुलीशी होतं.

नवीन घर, वाढती सुबत्ता यामुळे या कुटुंबातील व्यक्तींचं एकमेकांशी असलेलं बांधलेपण कमी व्हायला लागतं. पत्नी म्हणून नायकाला अनिता आवडत असली, तरी या घरातील वातावरण संवेदनशील मनाच्या अनिताला रुचत नाही. नायकाला स्वतःचं असं व्यक्तिमत्त्व नसल्यामुळेही ती नाराज असते. अशातच दोन घटना अशा घडतात, ज्यामुळे अनिताला या घरातील माणसांविषयी अधिकच तिरस्कार वाटायला लागतो आणि त्या ज्या दोन घटना घडलेल्या असतात, त्यातही नायकाने घेतलेली तटस्थ भूमिका तिला आवडत नाही. ती माहेरी निघून जाते. ती परत यावी, असं नायकाला वाटत असतं. ती गेल्यानंतर तिचं कपाट उघडून तिच्या वस्तू पाहत असताना त्याला तिची तीव्रतेने आठवण येते आणि तिच्याविषयीची ओढ त्याला तीव्रतेने जाणवते; पण तिला परत आणण्यासाठी तो काहीच प्रयत्न करताना दिसत नाही.

अगदी साधं कथानक असलं तरी त्या कथानकात नाट्य निर्माण करण्याची शानभाग यांची शैली अप्रतिम. पैशामुळे त्या कुटुंबात आलेलं विस्कटलेपण ते अतिशय संयतपणे चित्रित करतात. सधनतेमुळे माणूस किती सहजतेने माणुसकीला पारखा होतो, किती सहजतेने मूल्यं पायाखाली तुडवायला शिकतो, याचं वास्तव चित्र या कादंबरीतून रेखाटलं आहे. भौतिक सुखांच्या हव्यासामुळे नात्यांमध्ये निर्माण झालेली गुंतागुंत, पर्यायाने जीवनात निर्माण झालेली गुंतागुंत आणि साहजिकपणे समाजात उमटणारे त्याचे पडसाद याचं प्रातिनिधिक चित्र म्हणजे 'घाचरघोचर'. जुन्या घरात वारंवार येणाऱ्या मुंग्यांमुळे या कुटुंबाच्या मनात मुंग्यांविषयी आकस निर्माण झाला आहे. नवीन घरातही मुंग्या येतील की काय या भावनेने ते अस्वस्थ होतात. शानभाग यांनी मुंग्यांच्या माध्यमातून या कुटुंबातील सदस्यांच्या मनातील असुरक्षितता अधोरेखित केली आहे.

ओघवत्या निवेदनातून कादंबरी उलगडत गेल्यामुळे त्यातील व्यक्तिरेखाही सहजपणे उलगडत जातात; मात्र त्यांच्या वागण्यातून जी परिस्थिती निर्माण होते, त्या परिस्थितीमुळे या कादंबरीत नाट्य निर्माण होतं आणि ते वाचकाला अंतर्मुख करतं. तेव्हा या कादंबरीतील हे नाट्य अनुभवण्यासाठी ही कादंबरी अवश्य वाचली पाहिजे. ती वाचनीय आहे. अपर्णा नायगावकर यांच्या अनुवादालाही वाचनीयतेचं श्रेय द्यावं लागेल.

**– अंजली पटवर्धन**

**घाचरघोचर**
मूळ लेखक : विवेक शानभाग
अनुवाद : अपर्णा नायगावकर
पृष्ठे : १३२
किंमत : १५०
प्रकाशन : मेहता पब्लिशिंग हाऊस
**'ग्रंथाली' येथे सभासदांना सवलतीत १२० रु.**


## ग्रंथाली

# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**गुंजारव**
**एका स्वयंसेवकाचा**
**डॉ. शरद (भाई) कुळकर्णी**




**साधकाचे गुंजन**

आत्मचरित्र, आत्मकथा, आत्मकथन, आत्मनिवेदन, अशा नामावलीत मुख्य व्यक्तिरेखा ही तिच्या जीवन प्रवासाबाबत, केलेल्या कार्याबाबत, कर्तृत्त्वाबाबत वाचकासमोर एक पट उलगडत जाते. यात त्या काळाच्या पावलांच्या खुणा असतात, अवतीभवती होणारे बदल असतात, त्या अर्थाने तो त्या काळाचा एक दस्तऐवज असतो. हा दस्तऐवज व्यक्ती कोणत्या क्षेत्रातली आहे, तिचे वास्तव्य कुठे आणि कोणत्या स्तरावरचे आहे, यावरही हा पट अवलंबूल असतो. यातून घडणारे दर्शन व्यापक स्वरूपाचे असते कधी स्वतःच्या परिघातले असते. त्याला विचारांची, वैश्विकतेची जोड दिलेली असेल तर, त्याचा पट तसाच वैश्विक होतो, अन्यथा त्याचे खुजेपण अधोरेखित होते. या अर्थाने पाहता एक वैश्विक विचार आणि अनुभव असलेले कथन समोर आले आहे, त्याचे नाव आहे 'गुंजारव एका स्वयंसेवकाचा' आणि त्याचे लेखक आहेत डॉ. शरद (भाई ) कुळकर्णी.

डॉ. कुळकर्णी त्यांच्या मनोगतात लिहितात, भारताला स्वातंत्र्य मिळाले, त्याला कारण एकटे गांधीजींची अहिंसक चळवळ आहे का? हजारो क्रांतिकारक, नौदलाचा उठाव, सर्वोदयी तत्त्वज्ञान, अंत्योदय, या सगळ्यांचे योगदान व्यर्थ समजायचे का? डॉ. कुरियन, बाबा आमटे, इलाबेन भट, अण्णा हजारे, नानाजी देशमुख, जयंत नारळीकर, मराठी विज्ञान परिषद, साराभाई सेंटर, यांचे योगदान अमान्य करणार का? असा बृहत विचार मनोगतात ज्यांनी लिहिलेला आहे, त्यांची वैचारिक पातळी ही किती वेगळी आहे, हे वेगळे सांगायला नको.

डॉ. कुळकर्णी हे उच्च शिक्षित आहेत. हे शिक्षण सहजासहजी मिळालेले नाही. त्यासाठी त्यांचे अथक प्रयत्न आणि स्वतःवरील दृढ विश्वास कारणीभूत आहेत. तसा त्यांचा जीवन प्रवास प्रेरक ठरावा असा दीर्घ स्वरूपाचा आहे. रत्नागिरीतील कोळोशी या गावापासून त्यांचा प्रवास सुरू होतो. पालघर, मुंबई येथे काही काळ स्थिरावतो. परिस्थितीशी झुंज देत स्वतःच्या अस्तित्वाला आकार देतो. स्वतः बुद्धी चातुर्याने, अंगमेहनतीने, संघाच्या संस्काराने, झोकून देण्याची वृत्ती, ध्यास आणि प्रज्ञा यांच्या जोरावर आपले स्थान अढळ करतो. अमेरिकेसारख्या अनेक देशांशी नाते जोडतो. शिक्षण हा एक विषय सांख्यिकी, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र यांच्या माध्यमातून सर्वदूर पोचवतो. व्यवस्थापनात शिक्षण, संघटन कौशल्य, यात स्वतःची शिक्षण पद्धती विकसित करून क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा करतो. शाळा, कॉलज, विश्वविद्यालय, कंपन्या, बँका, विमा यासारख्या संस्था त्यांच्याकडे सल्ल्याच्या स्वरूपात मदत घेतात. इतकेच नाहीतर आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून घेतला जातो. एनसीइआरटी, एससीइआरटी, इटीएस, आयएपीएल, एनआयबीएम, आयएमएफ, या सारख्या अनेक संस्था आहेत. येथे शिक्षण पद्धत, संशोधन पद्धत, ट्रेनिंग सिस्टीम, इंटेजिलंट कोशंट आणि इमोशनल कोशंट, इंडस्ट्रीयल रिलेशन, प्रकल्प, यांना विकसित करीत विविध पातळ्यांवर काम तर केलेलंच आहे, परंतु स्वतःच्या पद्धतीही निर्माण केल्या, स्वतःच्या कार्याच्या ठसा उमटविला. इतर विद्वानां–प्रमाणे परदेशाला आपले ज्ञान अर्पण करण्याची वृत्ती त्यांनी झिडकारली. स्वतःच्या देशाच्या ओढीने परत आले. भारतात करण्यासारखे अनेक उपक्रम आहेत, भेडसावणाऱ्या काही समस्या आहेत, त्यांच्यासाठी आपण काम केले पाहिजे, ही भूमिका कायम मनात होती. तिला न्याय देण्याचे कार्य त्यांनी केले. पाणी प्रश्न, वृद्धाश्रम, शिक्षण, समाजसेवा याकडे एका कार्यकर्त्याच्या नजरेने पाहिले. त्यात झोकून दिले. आपल्या ज्ञानाचा, क्षमतेचा पूर्ण वापर केला. मुळात कुळकर्णी हे शिस्तीतले कार्यकर्ते. देशसेवा हा पिंड. प्रसंगी शिक्षण सोडले. तुरुंगवास भोगला. माणसे पाहिली, जगाचा अभ्यास केला. जगभर शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञान देत राहिले. तरीही त्यात कुठे गर्वाची फुशारकी नाही. एक नम्रतेचा भाव त्यांच्याकडे आहे. ज्यांनी–ज्यांनी मदत केली, सहकार्य केले त्यांच्या विषयीची कृतज्ञेची भावना मनात सतत ठेवली. मनाने मोठा, तितकाच मोकळा, व्यासंगाचा प्रचंड आवाका असलेल्या व्यक्तीचा हा अनुभवाचा खजिना या पुस्तकातून वाचकांच्या हाती सुपूर्द झालेला आहे. स्वतःच्या निर्णयक्षमतेला पूर्णपणाने आणि विश्वासाने उपयोगात आणले तर माणूस उच्च दर्जाची प्रतिथयश अशी कामगिरी उत्तमपणे पार पाडू शकतो, याचे उदाहरण म्हणजे डॉ. कुळकर्णी.

मधु मंगेश कर्णिक यांची प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. ते लिहितात, 'कुळकर्णी यांना आधुनिक जगाच्या इतिहासाचे चांगले भान आहे. जागतिक पातळीवरील विविध विचारधारांमुळे घडून आलेले सामजिक–राजकीय बदल, परिवर्तन याचा त्यांनी अभ्यास केलेला आहे. ते भारतीय इतिहासावर, संस्कृतीवर आणि एकात्मेवर भाष्य करतात. ऋग्वेदातील 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामयाः' हे वचन त्यांना आठवते आणि 'अंतिमतः विश्वकल्याणासाठी महात्माजींचा सर्वोदयाचा किंवा पंडित दीनदयालाजींचा अंत्योदय विचार हा त्यांना महत्त्वाचा वाटतो.'

डॉ. कुळकर्णी स्वतःला एक स्वयंसेवक म्हणवून घेतात. ते तर सत्यच आहे. परंतु तेवढेच पुरेसे नाही. स्वयंसेवकाला काही मर्यादा असतात. त्याच्यावर नियंत्रण ठेवणारी आणखी वेगळी यंत्रणा पाठीशी उभी असते. इथे आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात घडणारे तसे प्रसंग आहेत. परंतु पुढे ते स्वतःच एक संस्था होतात. एकेक प्रकल्पातून नवीन नवीन काही घडवत जातात, जे सगळ्यांनाच दिशा देण्यास उपयुक्त ठरते. तरी ते स्वतःच्या आत्मकथेविषयी लिहितात, 'नव्वदी ओलांडलेल्या एका आंधळ्या म्हाताऱ्याची ही रडकथा नाही किंवा एका अति ज्येष्ठाची ही गर्वकथाही नाही. हे आहे एका यात्रिकाचे स्पंदन, एका साधकाचे गुंजन.'


आशयाला सूचक न्याय देणारे मुखपृष्ठ प्रगती गोलतकर यांनी साकारले आहे.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

# ग्रंथपान

**भाषाविचार**

**डॉ. दीपक पवार**




**भाषेचा समग्र विचार**

भाषा हा विषय चर्चेला आला तो इंग्रजीशी संपर्क आल्यापासून, म्हणजे इंग्रजांनी आपल्या देशावर वसाहतवाद सुरू केल्यापासून. मातृभाषेविषयी कळकळ असणाऱ्या मंडळींनी या भाषेचा होणारा परिणाम हा केवळ इंग्रजांच्या कारभारापुरता राहणार नाही, तो मराठी भाषेच्या मुळावर घाव घालणारा ठरणार आहे, याचा अंदाज तेव्हाच वर्तविला होता. परंतु अशी कळकळ असणारी माणसे बोटावर मोजण्याइतकीच असल्याने तो आवाज क्षीण ठरला असे नाही, वणवा पेटवण्यासाठी ठिणगी पुरेशी ठरते. परंतु आपली मानसिक गुलामी इतकी सुस्त आणि तितकीच प्रभावी आहे की, तिला पेटवण्यासाठी ज्वालाग्राही अग्निबाण निष्प्रभ ठरतील. तसेच झाले. जे कळकळीने प्रतिपादन करीत होते, त्यांची शक्ती ही कुठल्याही अग्निबाणापेक्षा अधिक होती, परंतु त्यांचा परिणाम शून्य ठरला. आज त्याचे कडवट परिणाम उजळपणे आपले अस्तित्व दाखवीत आहेत. मग त्याविषयीच्या कंठरवांना ऊत आला तो अलीकडच्या काळात, बैल गमावल्यानंतर ट्रॅक्टरच्या नावाने बोटे मोडण्यासारखा.

मराठीच्या चळवळीचे एक कार्यकर्ते, देशभराच्या भाषिक चळवळींशी जोडून घेतलेले अभ्यासक आणि संशोधक कार्यकर्ता अशी त्यांची ओळख आहे. मराठी अभ्यास केंद्राचे ते अध्यक्ष आहेत. 'कॅम्पेन फॉर लँग्वेज इक्वालिटी ॲण्ड राईटस्'चे संस्थापक सदस्य आहेत. त्यांनी पूर्ण केलेल्या संशोधनाचे नाव आहे, 'जागतिकीकरणानतरचं महाराष्ट्रातलं भाषेचं राजकारण'. 'मराठी भाषेची अश्वेतपत्रिका –(ना)मराठीचा विकास, (ना) महाराष्ट्राचा', 'शिक्षणाचे मराठी माध्यम – अनुभव आणि अस्वस्थ वर्तमान' (सहसंपादन), 'पोस्ट ग्लोबलायझेशन पॉलिटिक्स ऑफ लँग्वेज इन महाराष्ट्र' ही त्यांची ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहे. 'ऑब्झर्व्हर रिसर्च फाऊंडेशन'तर्फे भारत आणि पाकिस्तानातील भाषिक चळवळींच्या तुलनात्मक अभ्यासासाठी आणि पुराच्या दस्तवेजीकरण प्रकल्पासाठी त्यांना पाठ्यवृत्ती प्राप्त झालेली आहे. याशिवाय महाराष्ट्राचा इतिहास, संस्कृती, समकालीन महाराष्ट्र, भाषाधोरण, भाषेचे राजकारण या विषयांवर त्यांनी विविध वर्तमानपत्रांमधून स्तंभलेखन केलेले आहे. प्रस्तुत 'भाषाविचार' हे पुस्तक याच परंपरेतील आहे.

भाषाशास्त्रज्ञ अशोक केळकर यांनी भाषेची उत्पत्ती, समकालीन व्यवहार आणि भविष्यलक्ष्यी नियोजन याविषयी जे विचार मांडलेले आहेत, त्यांचा मागोवा लेखकाने येथे घेतलेला आहे. म. गांधींनी मातृभाषेतून भाषणांचा आग्रह धरला होता. शिक्षणही मातृभाषेतून हवे, याचा आग्रह धरला होता. इंग्रजी भाषेतून शिक्षण घेण्याचे दुष्परिणाम सांगताना ते सांगतात, 'इंग्रजी भाषेतून शिक्षण घेतलेल्या मुलांतून रवींद्रनाथ टागोर, सुभाषचद्र बोस, राममोहन रॉय निर्माण होणार नाहीत.' ज्ञानपीठ विजेते वि. वा. शिरवाडकर तर मराठीचा सर्वच स्तरावर आग्रह धरतात. स्वतःच्या भाषेचा अभिमान असणे वेगळे आणि दुसऱ्या भाषेतून शिक्षण घेणे वेगळे, हे दुटप्पी धोरण झाले. असे होण्याचे कारण काय? कुठलीही भाषा ही नुसती ज्ञानाची असून उपयोगाची नाही, ती पोटाची व्हायला हवी. अशा प्रश्नांचा उहापोह लेखकाने केला आहे.

कुठलाही विषय हा प्रश्न मांडून करून सुटत नाही. त्यासाठी उत्तरे देखील शोधावी लागतात. डॉ. दीपक पवार यांनी त्या दृष्टीने विचार समोर मांडलेले आहेत. ''सगळा समाज स्वभाषाशून्य अवस्थेत पडून राहतो. यातून बाहेर पडायचं तर सर्व भारतीय भाषांची विधायक ताकद एकत्र करून आपापल्या भाषेच्या जतन-संवर्धनासाठी एल्गार केला पाहिजे. इंग्रजीचं कचकड्याचं साम्राज मोडून पडायला वेळ लागणार नाही. सर्व राज्यांनी स्वतःचं ग्रंथनिर्मिती मंडळ सुरू केलं पाहिजे. सर्व विद्यापीठांना प्रादेशिक आणि इंग्रजी या भाषांतील शिक्षण अनिवार्य केलं पाहिजे. तर इंग्रजीतून उच्चशिक्षण घेणाऱ्यांना प्रादेशिक भाषा टाळून उच्च शिक्षण घेता येणार नाही, अशी व्यवस्था केली पाहिजे.''


संशोधकाची वृत्ती असलेल्या लेखकाकडून जे लिहिले जाते, त्यात केवळ विचारांची वावटळ असत नाही, त्यात असतो तो मूलगामी विचाराचा गाभा. त्या विचाराला अधिष्टान असते ते संदर्भांचे. संदर्भ हे तात्कालिक नाहीत तर सर्वांगीण असतात. काळाचा, व्यक्तींचा, संस्कृतीचा, मानसिकतेचा अभ्यास, अशा विविध टप्प्यांचा वेध त्यातून घेतलेला असतो. त्या सर्वांगीण अभ्यासाचे दाखले डॉ. दीपक पवार यांनी प्रस्तुत पुस्तकात दिलेले आहेत. त्यामुळे व्यक्त झालेले विचार हे भाषेशी नाळ जुळलेल्या कुठल्याही व्यक्तीला अंतर्मुख करतील असे आहेत. परंतु ज्यांना भाषेविषयी काही न्यूनगंड असेल, तर त्यांना त्यापासून मुक्त करण्याची क्षमता या लेखांमध्ये आहे. लेखन अभ्यास आणि संशोधनावर आधारित असल्याने यात आलेली भाषा संशोधकाची असणे स्वाभाविक आहे, आणि ती तशी असणेच योग्य. परंतु ती पाठ्यपुस्तकीय नाही. विषय मुळात मेंदूला आणि सहनशीलतेला आव्हान देणारा आहे. 'एखाद्या समाजात भाषेचे वाईट दिवस येण्याची खूण म्हणजे सुशिक्षित आणि पुढारलेला वर्ग जेत्यांच्या भाषेच्या कक्षेत शिरतो.' 'आपल्याकडे भाषांची हेळसांड होणं म्हणजे पर्यायाने इतिहास आणि संस्कृतीची हेळसांड होणं, हे लक्षातच येत नाही.' 'इंग्रजीच्या महामारीत प्रादेशिक भाषांना अपमृत्यू येत असताना सर्व गोष्टींबद्दल शून्यवादी होणं आणि पराभव स्वीकारणं हा एक मार्ग आहे किंवा प्रतीकात्मक बदलांनी पायवाट तयार करत करत त्याचा हमरस्ता होण्याची वाट पाहणं हा दुसरा मार्ग आहे. माझ्यासारख्या अभ्यासक कार्यकर्त्याला दुसरा मार्ग गरजेचा आणि महत्त्वाचा वाटतो.' ही त्यांची विधाने महत्त्वाची आहेत. भाषिक आत्मीयता असणाऱ्या प्रत्येकाने वाचावे असे हे पुस्तक आहे. त्यातून भाषिक चळवळीत सहभागी होण्याची प्रेरणा जागृत झाली तर उत्तमच!

मराठी भाषेची पाळेमुळे खोलवर रूजलेली आहेत. मार्गात आलेल्या आक्रमणांना, सामील झालेल्यांना आपल्या कवेत घेत ती पुढे विस्तरत गेली आहेत. वटवृक्ष डौलाने उभा आहे. परंतु आता आपण त्याच पाळामुळांची सोईस्करपणे छाटणी करीत मुळावरच घाव घालीत आहोत. प्रदीप म्हापसेकर यांची ही मुखपृष्ठाची कल्पकता अप्रतिम!

**मूल्य १८० रुपये  सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

**अतस्त**
**मधुवंती सप्रे**




**रेषेच्या आतबाहेर**

आपल्या भोवतीचे जग आपण किती सजगतेने पाहतो, त्यात माणूस नावाच्या घटकाकडे किती डोळसपणे पाहतो, रूढी परंपरा यांचा अन्वयार्थ किती उलगडून पाहतो, आणि या सगळ्यांचा परिणाम आपल्यावर काही होतो की, चालायचंच असं म्हणून सोडून देतो? जगण्यात असलेला विरोधाभास आणि आखून घेतलेल्या चौकटी यांच्या सीमारेषा पुसून टाकायच्या की त्यांच्यातच दडपून जगायचे, याचाही विचार कधी आपल्याला अस्वस्थ करतो की, त्याचेच वारसदार म्हणून बुजुर्ग काळाची झूल अंगभर पांघरून आपण वावरत राहणार? सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे या व्यवस्थेत ज्यांचा बळी जातो आहे, त्यांच्याविषयीची आपली भूमिका आपण कधी तपासून पाहणार आहोत? जे कुणी या विरोधात विवेकबुद्धीने उभे राहण्याचा प्रयत्न करतील त्यांना पाठबळ द्यायचे की, त्यांना बंडखोर म्हणून हिणवायचे? जगणे शहरी असो की ग्रामीण, जगणे हे जगणेच असते. या जगण्याकडे संवेदनशील लेखक त्याच्या नजरेने पाहतो तेव्हा तो नक्कीच अस्वस्थ होतो. त्याच्या लेखनाला आपोआप धार येते ती याच अस्वस्थेतून. त्यातून जी निर्मिती होते ती वाचकाला अंतर्मुख करणारी ठरते. अशीच अंतर्मुख करणारी साहित्यकृती घेऊन आल्या आहेत मधुवंती सप्रे, 'अंतस्त' या कथासंग्रहाच्या रूपात. या कथांना ललित कथा असे त्यांनी नाव दिलेले आहे.

मधुवंती सप्रे यांच्या नावावर कथा, कादंबरी, कविता, चरित्र, ललित, अशी विपुल साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. 'अक्षरगंध' या दिवाळीअंकाच्या संपादक आणि प्रकाशक म्हणूनही त्यांचा आपणांस परिचय आहेच. काही वेगळेपण जोपासाण्याचा, शोधण्याचा, हा त्यांच्या लेखनाचा गुण आहे. त्यांच्या या गुणाची प्रचिती देणारा 'अंतस्त' हा नवा कथासंग्रह आहे, असे हमखास म्हणता येते.

या कथासंग्रहात एकूण आठ कथा आहेत. त्यांच्याविषयी मनोगतात लेखिकेने स्पष्ट केलेले आहे, 'या पुस्तकातल्या आठ कथांमधल्या सगळ्या स्त्रिया मला प्रत्यक्ष भेटलेल्या आहेत. नवनिर्मितीच्या क्षणी त्यात मी माझी भर घातली अहे. लहानपणापासून पाहिलेल्या, भेटलेल्या स्त्रियांनी मला अस्वस्थ केले. गोठ्यातल्या गाई, म्हशींनाही याहून सन्मानाची वागणूक मिळे. पण घरात जन्माला आलेल्या मुली, दुसऱ्या घरातून घरी आलेल्या सुना, यांचा माणूस म्हणून कुणी विचार करीत नसे. गाय, म्हैस, बैल चरायला गेले कुणाच्या बागेत, शेतात घुसले आणि त्यांना ग्रामपंचायतीने कोंडवाड्यात कोंडले, तर शेतकरी लगेच पैसे किंवा धान्य भरून सोडवून आणीत असे. परंतु मुलीचा सासरी छळ होत होत असेल तर तिला कोणी सोडवीत नसे.'

'ती' या कथेतील वेणू हुषार असून तिला डॉक्टर व्हायचे आहे. परंतु तिच्या अपेक्षेप्रमाणे काहीच घडत नाही. याला कारण परंपरावादी भूमिका, 'पोरींना शिकून काय करायचंय! लग्न होऊन जाणार आणि शाळेचा खर्च कोण करणार?' यातून वेणूची परवड होते. वेणू कथेच्या शेवटी भेटते तेव्हा ती वेगळ्या वळणावर उभी असते. या कथेचा पट मोठा असल्याने फ्लॅशबॅक पद्धतीने लिहिलेली आहे. 'मुलगी' या कथेत मफतलालच्या घरातील स्त्रिया श्रीमंतीत आहेत, पण त्यांना स्वातंत्र्य नाही. घराबाहेरचे जग त्यांच्यासाठी नाही. या उलट घरकाम करायला येणाऱ्या गरिबाघरच्या रेणुका आणि महानंदा या कामाला वाघ आहेत. शिक्षण न घेताही त्या मजुरी करून पैसे आणतात. मग शिक्षण कशाला हवे? अशी दोन टोकांना एकत्र जोडणारी ही कथा आहे. 'सुनीती' या कथेतील सुनीती बॅरिस्टर, कलासक्त, बुद्धिमान, आहे. स्वतःच्या पायांवर ठामपणे उभी आहे. परंतु नवऱ्याने वेगळा संसार मांडला आणि सगळेच बदलले. वैभव असूनही अनाथ झाली. 'मैत्री' या कथेत फ्रान्सचा दौरा आणि भेटलेल्या ख्रिस्तीन, अलबेख्त, इझाबेला, मैत्रिणींच्या विषयी लिहिले आहे. देश बदलला तरी स्त्रीच्या जगण्यातले दुवे सारखेच आहेत. 'कुठे आहोत आम्ही' या कथेत सुशिक्षित वीराची रूढी परंपरामुळे झालेली तगमग दाखवलेली आहे. 'जो जे वांछील' या कथेत 'हेमंती' लग्न या विधीची नव्याने मांडणी करताना दिसते. नचिकेत तिला साथ देतो. ही कथा लग्नाकडे नव्या दृष्टीने पाहण्याच्या पर्यायावर आणून उभी करते. 'शोभेच्या कुंड्या' या कथेत गंगुताई आपला परंपरावादी दृष्टिकोन कायम ठेवण्यावर भर देतात.

या कथा आत्मनिवदेन स्वरूपात आलेल्या आहेत. त्या वाचकांसोबत संवाद साधतात. कथेतील प्रत्येक व्यक्तिरेखा वेगळी आहे परंतु ती लेखिकेशी जोडलेली आहे, असे वाटत राहते. परिणामी सहवेदनेचा स्पर्श तर आहेच, परंतु असेही वाटत राहते, या कथा नसून लेखिकेच्या चरित्राचे काही अंश आहेत. इतकी एकरूपता या कथांना लाभलेली आहे. असे असले तरी लेखकाकडे एक जो तटस्थपणा असावा लागतो, प्रत्येक व्यक्तिरेखेचे वेगळेपण दाखवण्याची अंगभूत कल्पकता असावी लागते. आपल्याला जे मांडायचे आहे, त्यातली सुस्पष्टता अधोरेखित करण्याची किमया साधलेली असेल तर कथेची उंची अधिक उंच होते. या सगळ्यांचा प्रत्यय या कथा वाचताना येत राहतो. लेखनातला सहजपणा, कथेच्या शेवटाकडे जाईपर्यंतची उत्सुकता, विचारांतील स्पष्टता, नेमकेपणा, यामुळे या कथा शेवटपर्यंत खिळवून ठेवतात. काही वेगळे वाचले, याचा आनंद देतात.


बहरात आलेली पानेफुले कधी अचानक फादींचा हात सोडून देतात तर काही अकाली आपला रंग हरवून बसतात, त्याचे कारण त्याच्या खोडाच्या आत असलेला परंपरेने ग्रासलेला पोकळपणा. आशयाच्या अंतरंगाशी नाते सांगणारे मुखपृष्ठ प्रज्ञा हरणखेडकर यांनी सजवलेले आहे.

**मूल्य १८० रुपये सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

**गर्जे मराठी**

**आनंद गानू, सुनीता गानू**



### अवकाश ज्यांनी मुठीत घेतले

'गर्जे मराठी' हे सुनीता गानू आणि आनंद गानू यांनी लिहिलेले पुस्तक. पुस्तक नव्हे चांगला भलामोठा जाडजूड असा ग्रंथच म्हणायाला हवा, असा हा दस्तऐवज आहे. हा ग्रंथ साकारण्याचे काम म्हणजे शिवधनुष्य उचलण्याचा प्रकार म्हणावा लागेल, इतका त्याचा आवाका मोठा आहे. 'सिद्धहस्त लेखक आणि संशोधनाची आवड व चिकाटी असलेल्या प्रज्ञावंताचेच हे काम असू शकते आणि हा ग्रंथ वाचून झाल्यानंतर त्यातल्या माहितीने जसे थक्क व्हायला होते, तशी लेखकांच्या उद्यमशील प्रज्ञेचाही आवाका पाहून मती थक्क होते. दोघेही आपापल्या क्षेत्रात बहुआयामी लौकिक प्राप्त केलेले. लेखनाची धाटणी सुलभ, सोपी, अनलंकृत असून त्या-त्या व्यक्तिरेखांच्या विचारांना, मतांना कुठे बाधा येणार नाही, याची दक्षता घेतलेली आहे. मुळात हा ग्रंथ लिहिला गेला आहे तो इंग्रजीतून. या ग्रंथाच्या अनुवादाचे श्रेय मेधा आलकारी व जी. बी. देशमुख यांच्याकडे जाते.

या ग्रंथाला व्यासंगी प्रस्तावना लाभली आहे ती डॉ. रघुनाथ माशेलकर यांची. ही प्रस्तावना म्हणजे गानू दाम्पत्याच्या कर्तबगारीला शाबासकीच म्हणायला हवी. याची मांडणी सुद्धा लक्ष वेधून घेणारी आहे.

या ग्रंथात एकूण तेहतीस असामान्य कर्तृत्ववान अनिवासी मराठी सरस्वती पूजकांच्या यशस्वी जीवनगाथा रेखाटलेल्या आहेत. हे सरस्वतीपूजक मराठी मुलखातील आहेत आणि जगाच्या कानाकोपऱ्यात आपल्या कर्तबगारीची पताका डौलाने फडकवत आहेत. लेखकांनी त्यांची वर्गवारी केली आहे ती अशी, ज्ञानोपासना, अर्थककारण, उद्यमशीलता, औषध आणि वैद्यकीय संशोधन, अध्यात्म, तंत्रज्ञान, नाटक आणि संगीत, आणि चीन, मॉरिशस, इस्राएल मधील मराठी समाज. यातली सगळी मंडळी ही शैक्षणिकदृष्ट्या गुणवत्ता, गुणवंत, प्रज्ञावंत, अशा अत्युच्च बिरुदावलीने सन्मानित आहेत. ती सर्जनशील आहेत, चिकाटी, ध्येय, निष्ठा या सूत्रांनी बांधलेली आहेत. आपापल्या क्षेत्रात सर्वोच्चस्थानी विराजमान झालेली आहेत. तरीही विनयशील, जमिनीवर पाय रोवलेली आहेत.

डॉ. विजय जोशी हे 'ऑर्डर ऑफ आस्ट्रेलिया' या सर्वोच्च गौरवाने सन्मानित आहेत. लोखंडाच्या खनिजापासून पोलाद निर्मितीच्या प्रक्रियेत जोड उत्पादन म्हणून निघालेल्या टाकाऊ मळीचा उपयोग वाहतुकीचे रस्ते आणि विमानांच्या धावपट्टी बांधण्यासाठी होऊ शकतो, या नावीन्यपूर्ण कल्पक प्रयोगाचे जनक.

अंतरिक्षयानाच्या नॉनडिस्ट्रक्टिव्ह टेस्टिंग-विषयीच्या समस्या सोडविणारे डॉ. अजय कोष्टी हे अभिमान वाटावा अशा प्रतिष्ठित नासाम ध्ये एक जबाबदार इंजिनीअर आणि विषयतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या संशोधनासाठी अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित केलेले आहे.

नील आर्मस्ट्रांग, चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा मानव, यांच्या मार्गदर्शनाखाली एरोस्पेस इंजिनीअरिंग या विषयात स्नातकोत्तर आणि पीएचडी पदव्या प्राप्त करण्याचे भाग्य ज्याना लाभले, बोईंग ७३७,७४७,७५७ आणि ७६७ ह्या प्रकारच्या विमानांकरिता एअरप्लेन मॅथ मॉडेल तयार करण्यासाठी आवश्यक उड्डाण चाचण्यांच्या माहितीचे विश्लेषण करण्याचे तंत्र विकसित करणारे, आतापर्यंत विमानांच्या व्यवहारातून ३०० अब्ज डॉलर किंमतीच्या विक्रीचे श्रेय ज्यांच्या नावावर आहे, ते आहेत डॉ. दिनेश केसकर. आज ते बोईंग इंटरनॅशनलचे वरिष्ठ उपाध्यक्ष पदावर विराजमान आहेत. व्यक्तिगत संबंध, भरवसा आणि ग्राहकाला तुमच्या सेवेतून मिळत असलेले समाधान, या सूत्रांवर अढळ श्रद्धा असलेले, 'दिवस असो की रात्र, तुम्ही मला साद घाला, मी तडक उठून तुमच्या समस्येचे निवारण करीन' हा विश्वास दिल्याने विक्री व्यवहारात यशस्वी ठरलेले डॉ. केसकर निष्ठा, प्राणिकपणा आणि विश्वास या गुणांचा आदर्श समोर ठेवतात.

डॉ. सदानंद जोशी हे ओळखले जातात ते तेल उत्पादनातील वाढीसाठी आडव्या विहिरीचे तंत्रज्ञान विकसित करणारे आणि त्यासाठी गणितीय समीकरण मांडणाऱ्या 'जोशी इक्वेशन' शोधाचे जनक. 'जोशी टेक्नॉलॉजीस इंटरनॅशनल' या तेलकंपनीचे संस्थापक. ४५००० सदस्य असलेल्या पेट्रोलियम इंजिनीअर्स सोसायटीचे वैशिष्ट्येपूर्ण लेक्चरर आहेत. डॉ. मिनोती आपटे यांनी स्वादुपिंडाच्या कर्करोगावर उपचारासाठीचे मोठे संशोधन केले आहे. त्यांच्या या कार्यासाठी त्यांना 'ऑर्डर ऑफ ऑस्ट्रेलिया मेडल'ने सन्मानित करण्यात आलेले आहे. जगभरात या विषयाला हात घालणाऱ्या त्या पहिल्या संशोधक आहेत. डॉ. समीर मित्रगोत्री यांनी इन्सुलिन सारखे औषध शिरेत सुईने टोचण्याच्या पद्धतीला विराम देत सुईविरहित औषध देण्याचे तंत्रज्ञान विकसित केले. रोग्याच्या शरीराला किंचितही इजा न करता त्वचेवर लावण्यात येणाऱ्या औषधी चकतीमधून ते पोचवण्याची सोय केली. त्यांनी लावलेल्या शोधांचे १५० पेटंट त्यांच्या नावावर आहेत. डॉ. मीना नेरूरकर या प्रसूती आणि स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत. अमेरिकेत अनेक वर्षे यशस्वी कारकीर्द पार पाडल्यानंतर त्या आपल्या आवडीच्या क्षेत्राकडे वळल्या. कथ्थक, भरतनाट्यम व कुचिपुडी ह्या प्रकारच्या शास्त्रीय नृत्यात प्रावीण्य मिळविलेल्या डॉ. नेरूरकर यांनी 'कलाभवन' नावाची निर्मिती संस्था स्थापन केली. तिच्यामर्फत जवळपास ३० नाटकांची निर्मिती केली. त्यापैकी काही नाटकांचे लेखन, दिग्दर्शन करून स्वतः त्यात भूमिका केल्या. यातून मिळालेले नऊ लाख डॉलरहून अधिक मिळालेले उत्पन्न त्यांनी लोककल्याण्यासाठी दिले. चीन हा देश आपल्यासाठी शत्रूवाच्या पक्षातला. परंतु तिथेही आपले लोक आहेत आणि ते उत्तमपणे आपला जम बसवून आहेत. अमित विनय वाईकर हे 'डोहलर फूड ॲण्ड बेव्हरेज इन्ग्रेडिएंटस' या कंपनीत वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. मॉरिशस, इस्त्रायल येथे असलेले अनेक प्रगत मराठी बांधव, यांचीही माहिती या ग्रंथात आहे.

मराठीचा झेंडा अटकेपार फडकविणाऱ्या कर्तृत्ववान मराठी माणसांच्या कर्तृत्वाची, प्रतिभेची, शिक्षणातून मिळवलेल्या प्रावीण्याची दखल घेणे, त्यापासून इतरांनी घेणे, हा हेतू समोर ठेवून या ग्रंथाचे लेखन झालेले आहे. तो हेतू नक्कीच सफल होईल, असा हा ग्रंथ आहे.

**मूल्य ६५० रुपये सवलतीत ४०० रुपये**


**ग्रंथाली**


## कर्तबगारीची पताका जगभर फडकत ठेवणाऱ्या अनिवासी मराठी ज्ञानवंतांचा प्रेरणादायी प्रवास...

### सुनीता गानू आणि आनंद गानू लिखित 'गर्जे मराठी' इंग्रजी भाग १ व २





गर्जे मराठी इंग्रजी
भाग १ व २ मिळून
मूल्य २२५० रुपये
सवलतीत १४०० रुपये,
टपालखर्च २०० रुपये




गर्जे मराठी भाग १
मूल्य ६५० रुपये
सवलतीत ४०० रुपये,
टपालखर्च ५० रुपये

**विश्वसंचारी**
**प्रवासाची गाथा**




मूल्य ७०० रुपये
सवलतीत ४०० रुपये,
टपालखर्च ५० रुपये

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.
Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, बुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.